

१२७८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. 282

REFBK-0007125

# हिमालयाची हांक

# हिमालयाची हांक

★

कुंदर दिवाण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८१०८ वि:
क्रमांक २८२ नों: दि:

REFBK-0007125

५१२५

ग्राम-सेवा-मंडळ, वर्धा

१९४८ ] [ मूल्य २ रुपये

प्रकाशक :

भाऊ पानसे

मंत्री, ग्रामसेवामंडळ

नालवाडी, वरधा

मुद्रक :

गो. भा. जोशी,

भास्कर मुद्रणालय, वरधा.

# प्रस्तावना

## आचार्य काकासाहेब कालेलकर

धैर्य आणि गांभीर्य हें जर भारतीय आदर्शांचे प्रधान गुण धरले तर हिमालय आणि सागर हे त्याचे मुख्य प्रतीक ठरतात. आणि हिंदुस्थान तर हिमालय आणि तीन सागर यांनीं अक्षरश: वेढलेला आहे. हिमालयाचें दर्शन परवां परवां करून आलेले कुंदरशास्त्री दिवाण प्रस्तुत पुस्तकाच्या प्रारंभींच म्हणतात, "हिमालय म्हणजे अुच्च, अुदात्त भव्य आणि दिव्य" यां पैकीं दिव्य हें भारतीय भक्तानें लावलेलें विशेषण आहे. भगवंताची विभूति म्हणून हिमालय स्वत: दिव्य आहेच. यक्ष, गंधर्व, किन्नर आणि त्यांचा राजा कुबेर हे तर हिमालयवासी आहेतच. पण सर्वच देवांनीं आपापले बंगले हिमालयांत बांधून ठेवले आहेत. आणि या देवगणाच्या दिव्य गर्दीला कंटाळून देवाधिदेव महादेव हिमालय ओलांडून मानस सरोवराच्या पलीकडे कैलासावर जाऊन राहिले आहेत!

हिमालयाच्या हांकेला ओ द्यावयाची म्हणजे केदार आणि बदरी या आतां सोप्या झालेल्या हरिहर-धामांपर्यंत जाअून भागावयाचें नाहीं. गंगोत्री, जमनोत्री, अमरनाथ, पशुपतिनाथ, खोजरनाथ वगैरे महादेवांचें दर्शन करून शेंवटीं कैलास-राण्याच्या चरणीं विलीन झाल्यावांचून आणि अुत्तरेच्या बाजूनें हिमालयाची दिव्य हांक अैकल्यावांचून हिमालयाची अुपासना पूर्ण होअूं शकत नाहीं.

महासागर आणि हिमालय या दोहोंचे गुण स्वत: मध्यें प्रगट करून जगाला चकित करून सोडणाऱ्या महात्माजींचें चिताभस्म घेऊन नुकतेच एक मंडळ हिमालयाची यात्रा करून परत आलें आहे. आणि त्यापैकीं कांहीं यात्रावीर कैलासपर्यंत जाण्यास निघालें आहेत. अशावेळीं राष्ट्रांतील अनेक आबाल-वृद्धांचें लक्ष हिमालयांतील तीर्थस्थानांकडे खिळून गेल्यास आश्चर्य नाहीं.

अशा असाधारण मुहूर्तावर ' हिमालयाची हांक ' प्रसिद्ध होत आहे. यामुळें महाराष्ट्री वाचक मनानें आणि ध्यानानें हिला ओ दिल्यावांचून राहणार नाहींत.

यात्रावीरांच्यासाठीं गंगोत्री, जमनोत्री वगैरे स्थानें आहेत च. पण सामान्य भाविक यात्राळूंची पोंहोंच हिमालयांतील पहाडांच्या आणि कांतारांच्या काचांतून गंगा जेथें प्रथमच बाहेर निघते त्या हरिद्वारापर्यंतच असते. तेथें पोहोंचलेल्या प्रत्येक यात्रेकरूनें कोणच्या-ना-कोणच्या रूपानें आपला भक्ति-पूर्ण काव्यानंद व्यक्त केलाच आहे. कुंदर शास्त्री येथील गंगादर्शनाचा आनंद खालील प्रमाणें व्यक्त करीत आहेत आणि त्याच्या शेंवटीं अेका लहानशा स्तोत्रानें स्वतःची भावना पुनीत करीत आहेत—

" देवतात्मा नगाधिराज हिमालयाचें सांनिध्य......ह्याचें अेक प्रतीकच होय । ( पृष्ठ ११ )

प्रवासी म्हटला म्हणजे पायावरोबर डोक्यानें हि प्रवास करावयाचाच. चालणाऱ्याचें डोकें चांगलें च झपाट्यानें चालूं लागतें आणि त्याला जगांतील सगळे प्रश्न सुचूं लागतात. यात्रेंत तऱ्हतऱ्हेचे लोक भेटतात, त्यामुळें पंच-रंगी दुनियेचा अनुभव हि येत असतो. त्यामुळें विचारांची धाव कोठेंहि वाहूं शकते. लेखकानें हल्लीं अतिशय गरमागरम चर्चेचा विषय हिंदी-उर्दू मोठ्या युक्तीनें प्रवास-वर्णनांत गोवला आहे. 'दीर्घं पश्यत मा ह्रस्वम्' या सूत्रावर जणूं भाष्य करीत असताना कुंदर लिहितात—

" चाळीस कोटि प्रजेच्या हिताच्या......ते जन आणि जनार्दन दोघांचे हि लाडके होतील. " ( पृष्ठ ३४)

अशा रीतीनें स्वतःचा शुद्ध अभिप्राय व्यक्त करून लेखकानें शास्त्री वृत्तीस जागून गीतेंतून फलश्रुति देखील जोडली आहे कीं माझें हें तत्त्वज्ञान

जे लोक स्वीकारतील ते कर्मबंधापासून मुक्त होतील आणि माझ्या मताचा जे अव्हेर करतील ते अडाणी लोक नाश पावतील.

केदारनाथचें दर्शन घेऊन अुचंबळलेल्या वृत्ति जरा शान्त होतां च माझें लक्ष मंदिराच्या कपाळावरील यावनीकलेच्या, ग्रीक आर्किटेक्चरच्या, गेबल कडे किंवा त्रिकोणांकडे गेलें होतें. श्री कुंदरनीं केदारनाथ या महादेवाच्या नांवावर खालीलप्रमाणें महत्त्वपूर्ण मल्लीनाथी केली आहे.

"केदारनाथ हें महादेवाचें नांव. त्याचा अर्थ काय ?............ आणि ज्ञान-कुठार आहे ।" ( पृ. ४८ )

भव्य सृष्टिनिरीक्षणाच्या आनंदातिशयांत लेखक मनुष्य आणि त्याचें खडतर जीवन याकडे दुर्लक्ष करीत नाहीं. पहाडी लोकांना तो म्हणतो, "शेती आणि दुकानदारी यांवर तुम्हां पहाडी लोकांचा निर्वाह होणें कठिण आहे. गढवाल मधून सैन्यांत पुष्कळ जवान भरती झालेले आहेत. त्या हि मार्गानें तुमचें जीवन चालतें हें खरें,पण तुम्हीं लोकरीची कताअी,मधुमक्षिका-पालन,पशु-संवर्धन, गोदुग्ध-व्यवसाय अि० अुद्योग-धंदे करावयाला पाहिजेत." (पृ. ५१). सामान्य शेतीच्या बरोबर जर फळांची बागायत पहाडी लोक करतील आणि तीं फळें चांगलीं टिकावीं म्हणून जर त्यांचे मुरब्बे करतील तर त्यांना पुष्कळच किफायत होअील. हिमालय ज्याप्रमाणें हिमाचें आलय आहे, त्याच प्रमाणें जर पहाडांतील असंख्य जलप्रवाहाचा अुपयोग केला तर कधींहि न खुंटणाऱ्या जलविद्युत् शक्तीचा हि तो आलय आहे. हिमालयांतील चीड, देवदार, सफेता, बान्झ वगैरे अिमारती आणि सुगंधी झाडांचा जर पूर्ण अुपयोग केला आणि नवीं नवीं झाडें लावून जर वृक्ष-समृद्धि कायम ठेवली तर या फक्त झाडांच्याच अुत्पन्नावर हिमालयाला समृद्धीचा स्वर्ग बनवितां येअील.

हिमालयाच्या पहाडांतून धडाधड अुड्या घेणाऱ्या ओढयांना विजेच्या मदतीनें जर गाडीला जुंपले तर दुर्गम हिमालयाला सुगम आरोग्य-भवनांच्या मालिकेचें रूप देतां येअील.

ग्रंथलेखक विनोबांचे शिष्य असल्यामुळें, आणि ते शंकराचार्यांचें निष्ठावान् भक्त असल्यामुळें जोशीमठाला गेल्या बरोबर त्यांना शंकराचार्यांचें सर्व जीवनकार्य आठवल्यास आश्चर्य कोणचें ? अैतिहासिक पुराव्याला बाजूला ठेवून ते म्हणतात—"जिजीविषेत् शतं समा: अि० श्रुतिवचनें मानणारे योगीश्वर ज्ञानी शंकराचार्य अितक्या अल्पवयांत समाधि घेतील हें संभवनीय वाटत नाहीं. संभवनीय हें वाटतें कीं ते १३२ वर्षांचे होअून समाधिस्थ झाले असावे.ते कोठल्यातरी रोगानें अकालीं मेले असें मानणें तर चूकच होअील (पृ.६४)". अैतिहासिक पुराव्यापेक्षां तार्किक अनुमानाला अधिक महत्त्व दिल्यास ज्ञानेश्वरांच्या, स्वामी विवेकानंदांच्या आणि अशाच किती तरी सत्पुरुषांच्या कालाचा निर्णय फार सोपेपणानें लागणें शक्य आहे.

गोसेवा-संघाचा सभासद म्हणून गव्येतर दुग्ध आणि दुग्धजन्यें न खाण्याचा नियम केव्हां पाळावा आणि केव्हां ढिला करावा या विषयींची सोडवणूक प्रत्येकानें नियम घेतानांच केलेली असते, पण मित्राच्या आग्रहामुळें चहा घेतल्याचा बचाव करण्यासाठीं "यमान् सेवेत सततम्, न नित्यं नियमान् बुध:" (पृ. ६५) या वचना पर्यंत धांव घेण्याची जरूर नव्हती.

अगदीं प्राचीन काळापासून जे जे लोक हिमालयाच्या यात्रेला गेले आहेत त्यांना त्या 'यात्रेंतील अडचणी दूर होतील तर किती चांगलें' असें वाटलें आहे. जेथें अेकरात्र राहिल्यावांचून गत्यंतर नाहीं, पण जेथें राहिलें असतां सकाळपर्यंत प्राण टिकणेंच शक्य नाहीं, अशा ठिकाणीं जुन्या

लोकांनीं गुहा किंवा लेणीं कोरलीं. पहाडांतून जेथें मार्गच नव्हता तेथें मार्ग तयार केला. जेथें पाणी नव्हतें तेथें बाण मारून पाणी काढलें किंवा पाणपोया उघडल्या. ऐतिहासिक काळांत महाराष्ट्री साध्वी अहिल्याबाओीनें हरद्वार पासून थेट रामेश्वर पर्यंत यात्राळूंच्यासाठीं निरनिराळया सोओी उत्पन्न केल्या. बाबा काली कमलीवाले अथवा विशुद्धानंद सरस्वती यांचे नांव तर हिमालयांतील प्रत्येक यात्रेकरूला मुखोद्गत असतें. पण ठिकठिकाणीं यात्रेच्या सोओीसाठीं कांहीं-ना-कांहीं करणाऱ्या लोकांची संख्या लाखांनीं मोजावी लागेल. पण त्यांनीं आपल्या नांवाचा मागमूसहि उरूं दिला नाहीं. भारतीय वृत्तीच्या या अज्ञात प्रतिनिधींना कोटिशः नमन असो.

पण प्रश्न असा अुठतो कीं त्यांनीं या सर्व सोओी अुत्पन्न करून पुण्य मिळविलें असेल—' असेल ' कां ? खात्रीनें त्यांना पुण्य मिळालें आहे. पण त्याबरोबर त्यांनीं यात्रेचें पुण्य कमी नाहीं का केलें ? यात्रेकरू पुण्याचे लोभी असतात. अमुक जागा अतिशय पवित्र आहे असें समजलें म्हणजे यात्रेकरूंच्या झुंडीच्या झुंडी तेथें लोटतात. अितक्या लोकांच्या हाल-अपेष्टा पाहून दयाळू लोकानां सोओी कराव्याशा वाटतात. त्यानंतर यात्रेकरूंना अत्यंत आवश्यक अशा वस्तु घेऊन दुकानदार दुकानें काढतात. खाणावळी उघडल्या जातात यात्रेचीं माहात्म्यें आणि चित्रें विकावयास येतात. पुरोहित तर तेथें असलेच पाहिजेत. त्यानंतर दानधर्माचा स्वीकार करणारे परोपकार-परायण तेथें न आले तर कसें चालेल ? समाजवादाचें नांवहि ज्यांनीं अैकलें नाहीं असे कित्येक लोक यात्रेकरूंचे जड खिसे हलके करण्याच्या कामाला झटूं लागतात. या सर्व प्रक्रियेचें चित्र शेवट पर्यंत रेखाटण्याची आवश्यकता नाहीं.

अशा रीतीनें आधुनिक संस्कृति प्राचीन काळापासून तीर्थ-स्थानाची मृगया करीत आली आहे. फ्रेन्च लेखक आनातोल फ्रान्सने आपल्या 'थाओी' या कादंबरीमध्यें खांबावर बसून तपस्या करणाऱ्या साधूच्या आसपास वस्ती कशी झाली याचें सुंदर चित्र रेखाटलें आहे.

हिमालयांतील तीर्थस्थानांत अत्यंत लोकप्रिय स्थान म्हणजे बदरी नारायण अथवा बदरी विशाल. आज तेथें आसपासचे सनातन पहाड आणि सहा महिन्याचा बर्फ यांखेरीज अलकनंदेच्या सोबतीला जुनें असें दुसरें कांहींच उरलें नाहीं. सगळा बाजार होऊन गेला आहे.

मध्यंतरीं अेक आकाशयान यात्रेकरूंना अगदीं थोडक्या काळांत बदरी नारायणची यात्रा करवून परत आणीत असे !!

काशी, रामेश्वर, हरद्वार, अुज्जैन, नाशीक, पंढरपूर, पैठण वगैरे सर्व स्थळें अशाच रीतीनें भ्रष्ट झालीं आहेत. त्यांचें माहात्म्य पहिल्या सारखें अुरलें नाहीं. तपोभूमि हिमालय आतां हळू हळू भोग-भूमि होअू लागला आहे. दार्जिलिंग, नैनिताल, मसूरी, सिमला, मरी, गुलमर्ग वगैरे स्थळें विलासी अिंग्र-जांनीं अिन्द्रपुरी प्रमाणें करून टाकिलीं आहेत आणि अुद्यां जेव्हां हिमालयांत पूर्व पश्चिम रेल्वे तयार होअील आणि जेव्हा ठिकठिकाणीं आकाशयानाचे अड्डे बांधले जातील तेव्हां हिमालयाचें सनातन पावित्र्य नष्ट झाल्यावाचून राहणार नाहीं. आपल्या धर्मांत सांगितलेंच आहे कीं दान देण्यानें पुण्य वाढतें पण दान घेण्यानें पुण्याचा क्षय होतो. शेवटीं प्रश्न असा अुत्पन्न होतो कीं दुसऱ्याचें पुण्य क्षीण करून स्वतःचें पुण्य वाढवण्याचा स्वार्थी प्रकार निरपवादपणें धर्म्य म्हणतां येअील का ?

आपल्या शास्त्रात असें हि सांगितलें आहे कीं पायीं प्रवास करणा-ऱ्याला आणि स्वहस्तें स्वयंपाक करून खाणाऱ्याला यात्रेचें सर्व पुण्य मिळतें. घोड्यासारख्या जनावरांच्या पाठीवर बसून केलेल्या यात्रेचें फळ अर्धेंच असतें. मनुष्याच्या पाठीवर बसून यात्रा केली तर यात्रेचें फारच थोडें पुण्य मिळतें. आणि दुसऱ्याच्या खर्चानें कुणाच्या तरी पाठीवर बसून ठिकठिकाणीं दानें घेत घेत केलेली यात्रा पूर्णपणें निष्फळ होय. पाणपोईतील पाणी पिण्याचें नाकारणारे हरिश्चंद्र, तारामती आणि रोहिदास या तिघांना वरील तत्त्व

अगदीं आत्यंतिक रूपानें पटलेलें होतें. पण या तत्त्वाचा कडकपणें अंमल करावयाचा म्हणजे बांधलेल्या रस्त्यानें चालणें हि अशक्य होईल. आणि शेतीवर निर्वाह न करतां जन्मभर ऋषिपंचमी करण्याचीच पाळी यावयाची

'हिमालयाचें माहात्म्य टिकणार नाहीं, हिमालय तपोभूमि उरणार नाहीं' असें म्हणतांना अेक गोष्ट आपण गृहीत धरतों कीं लोकांना हिमालय पवित्र असावा असें वाटतें. आजपर्यंत ही गोष्ट खरी असेल, पण यापुढें लोकांना तसें वाटत राहीलच अशी खात्री उरली नाहीं. हिमालयाची भव्यता कुणीहि काढून घेऊं शकत नाहीं. अेखादें भव्य दृश्य पाहिलें म्हणजे मनुष्याच्या काव्यमय आणि आध्यात्मिक वृत्ति उचंबळल्यावांचून राहत नाहींत. हिमालयाचें हें कार्य नेहमींच चालू असणार. त्यांत खंड पडावयाचा नाहीं. रोरिक सारखे चित्र साधक हिमालयांत येऊन राहणारच. पण जुना साधनामार्ग आणि जुनी देह-दंडनाची तपस्या यापुढें हिमालयांत टिकेलच अशी ग्वाही देतां येत नाहीं. आणि म्हणूनच हिमालयाच्या पावित्र्याविषयीं लोकांत जोंवर आस्था आहे आणि तेथें जाऊन तपःपूत होण्याची परंपरा तुटली नाहीं, तोंवर हिमालयाविषयीं वाटणारा उमाळा शब्द-बद्ध करून ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. हिमालयाविषयीं वाटणाऱ्या भावनांचा संग्रह करणें हें तांतडीचें काम आहे. हिमालयाच्या चरणीं वाहिल्या जाणाऱ्या श्रद्धांजलींची सरिता अजून आटली नाहीं असें निर्विवादपणें सिद्ध करणारें हें पुस्तक महाराष्ट्री वाचकांना आदराई वाटेल असा विश्वास वाटतो

जे लोक अेकदा हिमालयाची यात्रा करून आले आहेत. त्यांना हें पुस्तक पुन्हां अेकदां हिमालयाची स्मरणयात्रा घडवतें व त्यामुळें विशेष आदरणीय वाटतें.

# निवेदन

बदरी-केदार-यात्रेचा हा वृत्तांत "मौज" साप्ताहिकांतून लेख-मालेच्या रूपानें येऊन गेला आहे. त्या वेळीं तो पुष्कळांना आवडला होता. अनेकांनीं ती लेखमाला मागवून वाचली आहे. पुस्तकाकारांत काढण्याबाबत तेव्हां-पासून अनेकांनीं सुचविलें. प्रकाशकांनीं त्याची प्रकाशनार्थ मागणीहि केली. पुण्याच्या एका प्रकाशकाशीं त्याबाबत ठरलेंहि होतें. त्यांनीं पहिला फॉर्म देखील कंपोज केला होता. पण करार-भंगामुळें प्रकाशन काढून घ्यावें लागलें. हें पुस्तक वस्तुत: केव्हांच प्रकाशित व्हायला पाहिजे होतें. पण वरील आणि इतरहि कारणांमुळें तें आता होत आहे. "अकरणात् मंद-करणं श्रेय:" या न्यायानें हें अनकेश: 'मंदकरण' वाचक गोड करून घेतील अशी मी आशा करतो.

मौजकार, चित्रकार आणि प्रस्तावनाकार या सर्वांनीं जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

ब्रह्ममंदिर, गोपुरी
ऋषि-पंचमी
शके १८७०

कुंदर दिवाण

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | ... ... | पृ. |
| | निवेदन | ... ... | |
| १ | प्रस्थान | ... ... | १ |
| २ | गाडींत | ... ... | ३ |
| ३ | दिल्ली | ... ... | ५ |
| ४ | हरिद्वार | ... ... | ७ |
| ५ | हृषीकेश | ... ... | १४ |
| | नांव सेवा व करणी असेवेची | | १६ |
| | स्वैर निसर्ग-दर्शन | ... . ... | १७ |
| ६ | लक्ष्मण-झूला | ... ... | १८ |
| | मठांतील शंकराचार्य-जयंती | ... | २० |
| ७ | देव-प्रयाग | ... ... | २१ |
| | 'पाप-कर्माहं' चें 'पाप-कर्माणं' | ... | २३ |
| | सफाईदार हिंदी बोलणारा महाराष्ट्रीय | ... | २५ |
| ८ | श्रीनगर | ... ... | २६ |
| | यात्रेच्या पहिल्या दिवशींची चुकामूक | ... | २८ |
| | गढवाली आझाद हिंद सैनिकांचें 'जय हिंद' | | ३० |
| | चुकलेल्यांची पुनर्भेट व मार्गांतील प्राणसंकट | ... | ३१ |
| ९ | रुद्र-प्रयाग | ... ... | ३२ |
| १० | अगस्ति मुनि | ... ... | ३३ |
| | पंगुं लंघयते गिरिम् | ... | ३६ |
| ११ | गुप्तकाशी | ... ... | ३७ |
| १२ | रामपुर | ... ... | ३९ |
| १३ | त्रिजुगी नारायण आणि गौरीकुंड | ... | ४० |

| | | |
|---|---|---|
| १४ केदारनाथ | ... ... | ४३ |
| केदारनाथाला प्रेमाश्रूंचा रुद्राभिषेक | ... | ४५ |
| 'टाळ मृदंग दक्षिणेकडे, माझें गाणें पश्चिमेकडे' | | ४८ |
| शेतकरी देव केदारनाथ | ... | ४८ |
| संन्यासाचें सोंग व वैराग्याचें अंग | ... | ४९ |
| हे तर गांधींचे सत्याग्रहीच दिसतात ! | ... | ५१ |
| १५ उखीमठ | ... ... | ५२ |
| पुन्हां एकादां चुकामूक | ... | ५३ |
| १६ तुंगनाथ | ... ... | ५४ |
| १७ लालसांगा उर्फ चमोली | ... | ५६ |
| दिल्लीचे एक हौशी प्रवासी | ... | ५८ |
| वैशिष्ट्यपूर्ण व अभिमानी बंगाल | ... | ५९ |
| मेहतरांपासून पंड्यापर्यंत दिसणारा भीकमागेपणा | | ६१ |
| 'केरसुणी खापर खोरें, धन्य धन्य हीं अवजारें' | | ६२ |
| १८ जोशीमठ | ... ... | ६३ |
| बालासाहेबांच्या चहाचें प्रीतिपान | ... | ६५ |
| अलकनंदेची चंद्रप्रकाशांतील अद्भुत शोभा | ... | ६७ |
| १९ बदरीनाथ | ... ... | ६९ |
| अद्य मे सफलं जन्म | ... | ७० |
| श्राद्धविधीची ब्रह्मकपालशिला | ... | ७२ |
| हिमालयांतील हिमवासी साधु | ... | ७३ |
| व्यासांचा आश्रम व गणेशगुहा | ... | ७५ |
| २० अलकापुरी–वसुधारा ... | ... | ७६ |
| जय बदरी विशाल की | ... | ७८ |

२१ व्रीहिनदीचा गोणाताल ... ८०
'देव तारी तया मारील कोण' ... ८२
अप्रतिमल्ल खटमल आणि पूनमचंद यांचा पराक्रम ८४
यात्रेकरूंना लुटणारे पंडे व गुंडे ... ८७
तीर्थाटनांतील अंध कर्मठपणा व त्याची प्रतिक्रिया ८९
हरिद्वारच्या दीनदयालु शास्त्र्यांचा प्रेमाग्रह ... ९१
२२ दिल्लीच्या हरिजन कॉलनींत ... ९३
२३ यात्रेची सांगता ... ... ९६
२४ परिशिष्ट १—प्रवासाचा समस्त वृत्तांत ... ९८
२४ परिशिष्ट २—यात्रा-पथ-नकाशा ... १००

वैकुंठवासी आत्याबाईंच्या

**पवित्र स्मृतीस**

# हिमालयाची हांक

## प्रस्थान

तसा यात्रेला जाण्याचा माझा संकल्प नव्हता. पण आईची फार दिवसांची इच्छा होती आणि तिच्याबरोबर जाणें कोणीं तरी अवश्यच होतें. म्हाताऱ्या आईला यात्रेला घेऊन जाणें, आणि तेंहि पुनः हिमालयांत, सोपें काम नव्हतें. पण सोपें नव्हतें तरी धर्मरूप होतें. शिवाय किती आनंदाचें ? हिमालयाचें आकर्षण कोणाला वाटणार नाहीं ? आणि हिंदूंचें तर तें सर्वस्वच ! आमचा इतिहास, आमचीं काव्यें, आमचीं शास्त्रें, आमचा धर्म, आमची संस्कृति, किंबहुना आमचें गत आणि अनागत समग्र जीवन हिमालयाशीं निगडित आहे. आम्हांला हिमालय म्हणजे केवळ हिमाचें आलय नसून हिमवत् निर्मल, उज्ज्वल आणि सुंदर अशा सर्व सद्गुणांचें, तपाचें आणि ज्ञानाचें तें चिरंतन निलय आहे, शांतीचें माहेर आहे. हिमालय म्हणजे दिव्य, भव्य आणि उदात्त !

आम्ही अग्निरथांत चढलों बुधवार ता. १ मे १९४६ ला. पण आमची यात्रा सुरू झाली त्याच्या आदल्याच दिवशीं. तारीख १ मे ला यात्रारंभ करायला पंचांग आडवें आलें. तिथि अमावास्या, वार बुधवार आणि योग मृत्यु अशीं तीन अनिष्टें एकवटलीं होतीं त्या दिवशीं ! उरलेलीं दोन अंगें नक्षत्र व करण प्रतिकूल होतीं किंवा नाहीं, आठवत नाहीं. परंतु अनुकूल असतीं तरी अल्पमतांत ! त्यामुळें वृद्धांच्या आणि शास्त्राच्या संतोषासाठीं आम्हीं यात्रारंभ 'मंगळ' वारींच केला ! "हरीचिया दासा शुभ काळ दाही दिशा" हें अगदीं खरें; पण कोठल्याहि महत्त्वाच्या आरंभासाठीं मुहूर्त पाहणें म्हणजे निव्वळ थोतांड नव्हे.

मंगळवारीं तिसऱ्या प्रहरीं आम्हीं दत्तपूर-नालवाडी सोडली. देवतांचा आणि मित्रमंडळींचा निरोप घेतला. गोशाळेंतून जातांना मीं " ॐ मयोभूर् वातो अभिवातूस्राः" इत्यादि गोसूक्तानें मनोमन गाईंचाहि निरोप घेतला. हृष्टपुष्ट गाई प्रेमळपणें पहात जणूं 'शुभास् ते पन्थानस् सन्तु' म्हणत होत्या. आमचा पहिला मुक्काम रामनगरांत मावशीकडे झाला.

आमच्या बरोबर यात्रेला भाऊ पानसे, लक्ष्मणसिंह यादव, सीतारामजी कारेमोरे आणि इतरहि एक-दोन तरुण मित्र यावयाचे होते. परंतु या-नाहीं-त्या कारणानें एकहि आला नाहीं. हिमालय कितीहि दुर्लंघ्य असला तरी उंबर-घाटापेक्षां सोपाच म्हटला पाहिजे ! यात्रेहून परत आल्यावर भेटतांना अने-कांना आपण गेलों असतों तर बरें झालें असतें, असा खेद झाल्याशिवाय राहिला नाहीं. पण म्हणतात ना, 'दैव देतें पण कर्म नेतें' म्हणून, त्यांतली गत ! पण एकपरी हें बरेंहि झालें. परक्या मुलखांत आणि प्रवासांत कोणी साथीदार आजारी पडला तर त्याला सोडून जातां येत नाहीं. त्याच्या साठीं इतर सर्वांचाच खोळंबा होतो. आणि असा खोळंबा परवडणारा नसतो. दुसऱ्या गैरसोई सोडल्या तरी माणशीं १॥-२ रुपये रोजचा भोजन-खर्च अंगावर बसावयाचा ! अशीं उदाहरणेंहि मला पहायला मिळालीं आहेत. शिवाय आपलाच संघ मोठा असला म्हणजे आपण इतर यात्रेकरूंशीं साह-जिकच कमी संबंधांत येतों. आणि यात्रेच्या लाभांपैकीं महत्त्वाच्या अशा नव्या ओळखींना आणि तद्वारा नव्या विचारादिकांनाहि मुकतों. आमच्या-बरोबर महाराष्ट्रांतून नगर, नाशिक, पुणें आणि खानदेशकडची चांगलीं शें-पाऊणशें मंडळी होती. पण त्यांनीं कधीं बंगाली, पंजाबी, सिंधी आणि इतर यात्रेकरूंशीं ओळख करून घेतली, किंवा कांहीं विचारविनिमय केला, असें दिसलें नाहीं. हा माझ्या मतें मोठा तोटाच म्हटला पाहिजे. तथापि मित्र-मंडळी यात्रेंत बरोबर नाहींत ह्याचें वैषम्य मनांत राहूनच गेलें. मित्रांच्या

संगतींत सुख दुणावतें आणि दुःख उणावतें. संकटसमयीं दुःखांत आपल्या-बरोबर मित्र सांपडला नाहीं ह्याचा आनंदच होईल, पण आनंदोपभोगाच्या वेळीं मित्राची अनुपस्थिति विरस करते. हिमालयाचीं तीं सुन्दर सुन्दर दृश्यें पाहतांना मला आनंद झाला तो काय वर्णावा ! परंतु ह्या दिव्य आनंदाचे वांटेकरी व्हायला भाऊ आदि मित्र सोबतीला नाहींत ह्याचें वाईट वाटे.

## गाडींत

दुसरे दिवशीं सकाळीं स्नानादि आटोपून आम्ही वरधा स्टेशनवर आलों. थोड्याच वेळांत ग्रँड ट्रंक एक्स्प्रेस आली. लगबगीनें आम्ही एका डब्यांत चढलों. सुदैवानें जागा बरी मिळाली. आम्हांला निरोप द्यायला स्टेशनवर पुष्कळ मंडळी आली होती. आमची बहीण तर त्याच दिवशीं पॅसेंजर गाडीनें थोडा वेळ आधीं आली होती. तिला पाहून मला जरा नवलच वाटलें. कारण आदल्या दिवशींच तिला पत्र घातलें होतें आणि सकाळच्या पॅसेंजरशिवाय दुसरी गाडी नव्हती. तिची ही क्षिप्रकारिता मला आवडली. भेटीचा आनंद वेगळाच ! डॉ. महोदय आणि त्यांच्या पत्नी, अनसूया, देवीदास भाऊ आणि इतर बंधुबांधव निरोप द्यायला आले होते. त्यांच्या प्रेमाबद्दल मला कृतज्ञता वाटत होती. एकानें ताजें वर्तमानपत्र आणून दिलें, एकानें पाण्याची थैली भरून आणून दिली. ‘थँक्स्’ म्हणण्याइतका मी उथळ वा अरसिक नव्हतों. गाडी चालू लागली आणि माझ्या हातांत एक ‘जरूरीचें’ म्हणून पत्र ठेवण्यांत आलें. उघडून पाहतों तों त्यांत एक हिरवी नोट ! मला रकमेची जरूर नाहीं म्हणून मीं सांगितलें होतें आणि रक्कम घ्यायचें नाकारलें होतें. पण प्रेम अशी हार खात नसतें. अनुताईनीं आपला हट्ट अखेर पुरा केलाच ! गाडी जोरानें चालूं लागली आणि आश्र-माच्या इमारती मागें पडूं लागल्या. दृष्टीआड होईपर्यंत मी त्यांच्याकडे पहात होतों.

हिमालयाच्या गुरुत्वाकर्षणानें मी खेंचला जात होतों ! बदरीनारायणानें मला वेधिलें होतें !

"गमिष्ये दयितं तस्य बदर्याश्रम-मंडलम् ॥
यत्र नारायणो देवो नरश् च भगवान् ऋषिः ।
मृदु तीव्रं तपो दीर्घं तपाते लोक-भावनौ" ॥

[ ज्या ठिकाणीं भगवान् नारायण आणि नरऋषि लोक-कल्याणार्थ, स्वत:स सौम्य परंतु इतरांस खडतर वाटणारें असें तप दीर्घ काल आचरिते झाले, प्रभूंच्या, त्या प्रिय बदरिकाश्रम-प्रदेशाला मी जाणार आहें. ] हें आठवून हृदयांत उचंबळून येत होतें. आनंदाचे तरंग चालले होतें. पण ही हृदयाची तरंगिणी निम्नगा नव्हती. ती उत्तरवाहिनी हृदयगंगा उत्तुंग हिमाचलाकडे धांव घेत होती ! नागपूर स्टेशन आलें आणि गाडी थांबली. गाडीबरोबर विचारचक्रहि थांबलें. खिडकींतून बाहेर पाहतों तों मावशी आणि मंडळी निरोप द्यायला स्टेशनवर हजर ! तिनें कांहीं पाथेय आणलें होतें. तें ठेवून घेतलें, पण तेवढ्यानें तिचा संतोष झाला नाहीं. संत्र्याचा रस घेऊन आली. तें प्रेमामृत पिऊन आम्ही धालों. इतक्यांत हंसतमुख दत्तोपंत मोहनी आले. मोहनी स्वतः यात्रेस जाणार होते आणि मलाहि सोबत नेणार होते. पण "उत्पद्यन्ते विलीयन्ते, दरिद्राणां मनोरथाः" तशांतला प्रकार ! दरिद्र म्हणजे येथें साधन-संपत्ति-हीन असा अर्थ नाहीं समजावयाचा. दरिद्र म्हणजे सत्त्वहीन आणि सत्त्व म्हणजे निश्चयाचें बळ. ज्याच्यांत सत्त्व नाहीं; निश्चयाचें बळ नाहीं, त्याचे मनोरथ स्वप्नवत् विलीन झाल्यास काय नवल ? "क्रियासिद्धिः सत्त्वे भवति, न उपकरणे" ! शीळ वाजली, बावटा फडकला. पत्र पाठवीत चला, जिवाला जपा, प्रवास--वर्णन लिहा असें म्हणून मंडळींनीं आम्हांला निरोप दिला आणि गाडीनें फलाट सोडलें.

गाडी दरकोस दरमजल करीत निघाली; पण दर स्टेशन करीत नव्हे. ग्रँड ट्रंक एक्स्प्रेस ट्रेन—महामार्गावरील शीघ्रगामी रथमालिका—ती

किरकोळ स्टेशनांवर कशी थांबणार ! थांबल्याबरोबर तिच्यांतून जिवंत बोचकीं बाहेर पडत आणि नवीन भरत. प्रत्येक स्टेशनवर तोच तो तमाशा पहायला मिळे. चढणारांची आणि उतरणारांची दरवाजांत रेटारेटी व वाचावाची, खाबू आणि बाबू लोकांची गरम चाय आणि चिरूटसाठीं धडपड, भरीव छाती आणि पोकळ डोकेवाल्या खाकी डगल्यांची हडेलहप्पी, गरीब अडाणी लोकांची कुचंबणा आणि विटंबना. मला विशेष नवल वाटे तें मारीच आणि सुबाहु यांसारख्या 'सुशिक्षित' व 'पराक्रमी' लोकांचें. गरिबांची जराहि परवा नाहीं. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंपासूनच मुख्यतः रेलवे कंपनीला करोडों रुपयांचा नफा झालेला; पण तिनें त्यांची काय सोय केली आहे ? त्यांची स्थिति बोचक्यां (पार्सलां) पेक्षांहि वाईट !

स्टेशनांवरील आणि गाडयांतील गैरसोईबद्दल दोषाचा अर्धा वांटा रेलवे कंपनीला दिला, तरी बाकीच्या अर्ध्या वांट्याचे धनी आम्हीच होतों. उतारू इतके कांहीं गैरशिस्त आणि अमंगळपणें वागतात, कीं त्याला कांहीं सीमाच नाहीं. खिडकीशीं बसलेला गृहस्थहि विडयांचीं थोटकें, आगकाडया, केळयांचीं सालें वगैरे केरकचरा डब्यांत टाकील, इतकेंच नव्हे तर थुंकायलाहि कमी करणार नाहीं ! मग विडी-सिगारेटच्या धुराचे फूत्कार दुसऱ्याच्या तोंडावर जातात ह्याची तो परवाच कशाला करतो ? हा सर्व प्रकार पाहिला म्हणजे "पद्भ्यां नाक्रम्यते पन्था किमतः पातकं परम्" असे सहजच उद्गार निघतात. पाई चालतांना हा किळसवाणा उपद्रव तरी होत नाहीं. आगगाडींतून असला प्रवास करावा लागणें निःसंशय कुठल्या तरी पापाचेंच फळ आहे !

## दिल्ली

आमचा अग्निरथ न थकतां आणि न रुकतां सारखा धावतच होता. त्यानें मध्यंतरीं प्रसिद्ध नद्या आणि नगरें ओलांडलीं आणि दुसरे दिवशीं दुपारीं ११ ला, वरधा सोडल्या पासून २७ तासांनंतर, आम्हांला दिल्लीस आणून

सोडलें. मीं म्हटलें, 'दिल्ली चलो, दिल्ली चलो,' म्हणतात ती हीच का दिल्ली ? दिल्लीला पोंचलों होतों, तरी आमची 'दिल्ली' अद्याप दूरच होती !

स्टेशनहून हमाल करून आम्ही गांधी आश्रमाच्या खादी भांडारांत गेलों. १५ मिनिटांचा रस्ता. व्यवस्थापक कालकाभाईनीं आमचें स्वागत केलें. 'खादी-जगत्' च्या ताज्या अंकामधील माझा लेख नुकताच त्यांनीं वाचला होता. त्यांना तो फार आवडल्याचें दिसलें. 'क्या ही सुन्दर लिखा है, म्हणून ते उठले आणि आमच्या स्नाना-पानाची व्यवस्था करून दिली. सत्यन्‌ला गुरुकुल, कांगडी, चे माजी प्रमुख अभयदेव यांचेकडे अरविंद निकेतन, नई दिल्लीस जाऊन यावयाचें होतें. सत्यन् वरधेपासूनच आमच्याबरोबर होता आणि हृषीकेशपर्यंत यावयाचा होता. तो आपल्या कामाला निघून गेला आणि आईनें व मीं स्नानादि आटोपून थोडी विश्रांति घेतली. दिल्लीला या वेळेस थांबायचा आमचा विचार नव्हता. आम्हीं कालका-भाईना सांगून हरिद्वारचीं तीन तिकिटें काढवलीं होतीं. गाडी सायंकाळीं ६॥-७ ला निघायची होती; परंतु आम्ही ४ लाच स्टेशनवर हजर झालों. हरिद्वारचें 'स्वर्गद्वार' हि एक नांव आहे. हरिद्वारसाठीं गाडींत प्रवेश मिळवणें म्हणजे एकपरी स्वर्गांतच प्रवेश मिळवणें होतें तें ! तें सोपें कसें असणार ? हमालाला १॥-२ रुपये दक्षिणा दिली तेव्हां त्यानें आईला स्त्रियांच्या डब्यांत बसवून दिलें आणि सामानहि ठेवून दिलें. आम्हीहि एका डब्यांत शिरलों. जेमतेम महा मुष्किलीनें उभें राहतां आलें. उकाडा तर इतका होत होता कीं सांगतां सोय नाहीं. अंगांतून सारख्या घामाच्या धारा चालल्या होत्या आणि तहानेनें जीव व्याकुळ होत होता. माझ्याजवळ पंखा आणि पाण्याची थैली होती म्हणून वाटलें जीव वांचला आज माझा ! अशा प्रकारें १-१॥ तास गर्भस्थ जीवाची दशा अनुभवण्याची तपश्चर्या केल्यावर देव प्रसन्न झाला आणि गाडी एकदांची चालूं लागली. गाडी सुटेपर्यंत

डब्यांतील आणि डब्याबाहेरील यात्रेकरूंचें अक्षरशः युद्ध चालू होतें. एक-दोघांना तर चांगल्या दुखापतीहि झाल्या. मी मनांत म्हटलें, हरद्वार ( Hardwar ) म्हणजे खरोखरच hard war आहे तर !

## हरिद्वार

दुसरे दिवशीं म्हणजे ता. ३।६।४६ ला सकाळीं ७ वाजतां आम्ही हरिद्वारला पोंचलों. सकाळची वेळ होती, वातावरण प्रसन्न होतें. शीतल मंद सुगंध वायु वाहत होता. भक्तिनम्र मन गंगेच्या दर्शनासाठीं उत्सुक झालें होतें. स्टेशनवर टांग्यांत बसल्यापासून गुरुकुलमध्यें पोंचेपर्यंत चित्तांत एकच भाव लहरत होता :

> अनाथः स्नेहार्द्रां, विगलित-गतिः पुण्य-गति-दां
> पतन् विश्वोद्धर्त्रीं, गद-विगलितः सिद्ध-भिषजम् ।
> सुधा-सिन्धुं तृष्णाकुलित-हृदयो, मातरमयं
> शिशुः संप्राप्तस् त्वां अहमिह विदध्याः समुचितम् ॥

[ हे गंगे ! मी अनाथ, तूं मायाळू; मी नष्टलोक, तूं शुभलोक-दायिनी; मी पडणारा, तूं विश्वाचा उद्धार करणारी; मी रोग-पीडित, तूं सिद्धहस्त वैद्य; मी तृषार्त, तूं सुधा-नदी; तूं माउली तुला मी हा तान्हुला शरण आलों आहें. येथें आतां जें काय योग्य असेल तें तूं कर. ]

चित्त भावनिरुद्ध झाल्यामुळें आजूबाजूला चाललेल्या लोक-कोलाहलाचें, दर्शनीय दुकानांचें आणि घरांचें अथवा अवांतर गोष्टींचें कांहींच आकर्षण झालें नाहीं. टांग्यांतून उतरून सरळ आम्ही गुरुकुल विश्वविद्यालयाच्या अतिथि-शाळेंत गेलों.

गुरुकुल वस्तीपासून दूर रमणीय परिसरामध्यें गंगेच्या नदीतुल्य कालव्या-वर वसलें आहे. इमारती सुन्दर आणि भव्य आहेत. आंतील विशाल आवार वृक्षराजींनीं मंडित असून आदर्शवत् स्वच्छ आणि शान्त आहे. सरस्वतीच्या

उपासनेस हवें तसें हें शान्त, एकान्त आणि रमणीय असें स्थान आहे. आर्य-समाजाचे संस्थापक महर्षि दयानन्द-सरस्वती आणि स्वामी श्रद्धानंद ह्यांच्या पुण्याईचें हें फळ आहे. आधुनिक काळांत आर्य-समाजानें उत्तर हिंदुस्थानांत स्वसंस्कृति-रक्षणाचें जें महान् कार्य केलें आहे त्याची आपल्याकडे फार थोडयांना सम्यक् कल्पना असेल. 'न वदेद् यावनीं भाषां प्राणैः कण्ठ-गतैरपि' असा कटाक्ष ठेवणाऱ्या आर्यांचे वंशज आर्यावर्तांतच स्व-धर्म, स्व-भाषा, स्व-वेश, स्व-संस्कृति यांना पारखे झाले होते, होत होते. आज देखील परकीय संस्कृतीचें लागलेलें हें ग्रहण संपूर्ण सुटलेलें नाहींच. दयानंद-सरस्वतींनीं हें परकीय आक्रमण परतवून स्वसंस्कृतीचें संजीवन केलें आहे. वेद-विद्येला आधुनिक काळांत त्यांनींच प्रचलन दिलें आहे. वेदविषयक त्यांची ही कामगिरी अपूर्व आहे.

इमं मे गङ्गे यमुने सरस्वति, शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या ।
असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयाऽऽर्जीकीये शृणुह्या सुषोमया ॥

[ हे गंगे ! हे यमुने ! हे सरस्वति ! हे शुतुद्रि ( सतलज ) ! हे परूष्णि ( रावी ) ! असिक्नी ( चिनाब ) सहित असणारे हे मरुद्वृधे ! आणि वितस्ते ( झेलम ) सहित व सुषोमेसहित असणारे हे आर्जीकीये ! तुम्ही माझें हें स्तोत्र स्वीकारा, लक्षपूर्वक श्रवण करा. ]

म्हणून आम्ही ज्या 'सप्त सिन्धूं'चें स्तवन करतों, त्यांच्याच प्रदेशांत म्हणजे खऱ्या खऱ्या सिन्धु-स्थानांत, देवभाषा, देवलिपि, देवसंस्कृति विकृत, विस्मृत आणि तिरस्कृत झाली होती. तिचें त्या प्रदेशांत दयानंद ऋषींनीं पुनरुज्जीवन केलें आणि आर्य-समाजाचें संवर्धन. हें कार्य अद्यापि किती तरी व्हावयाचें आहे. पण झालें तेंहि कांहीं कमी नाहीं.

आमचें सामानसुमान अतिथिशाळेंत नीट ठेवल्यानंतर गंगेवर स्नानाला गेलों. कालवाच, पण केवढा प्रचंड ! कालव्याच्या दोन्ही तटांवर झाडी लावली आहे. त्यामुळें तट-बंदी मजबूत झाली आहे. शोभाहि मनोरम आहे.

उष्ण काळे, पण पाणी थंडगार! कपडे धुऊन घेतले आणि स्नानासाठीं पाण्यांत उतरलों. उतरलों मात्र, गंगेच्या त्या हिमशीतल जलानें शरीर गारठून गेल्यासारखें झालें. आणि पाण्याला ओढ किती! स्नानाला उतरलेली व्यक्ति वाहून जाऊं नये म्हणून सांखळींचें एक कडें केलें आहे. घाटहि पुष्कळ धन खर्चून चांगला बांधला आहे.

स्नानादि आटोपून आम्ही परत आलों आणि प्रातराश (सकाळची न्याहारी) करून फार्मसीचे प्रमुख श्री दीनदयालुशास्त्री यांचेकडे गेलों. ते स्थानिक कॉंग्रेस कमेटीचे एक पदाधिकारीहि आहेत. मला वाटतें, ते ब्रह्मचारीहि असावेत. त्यांच्याकडे खास जाण्याचें कारण, त्यांनीं उत्तराखंडाची यात्रा २।३ वेळां केलेली आहे. शिवाय ते मानस आणि कैलास यांनाहि दोनदां जाऊन आले आहेत. त्यांच्याकडून माहिती मिळवावी असा हेतु. तसा मी घरून निघतांनाच सर्व माहिती मिळवून निघालों होतों. पण ती माहिती कांहींशी जुनी झालेली होती. मी त्यांच्याकडे गेलों तेव्हां ते गुरुकुलच्या आवारांतील एका सडकेच्या दुतर्फा असलेल्या बहाव्याच्या झाडांच्या शेंगा वटूंकडून पाडवून घेत होते. फार्मसींत शेंगांपासून रेचक आदि औषधें तयार होतात. आम्ही नंतर फार्मसींत गेलों आणि त्यांनीं आम्हांला आमच्या जवळील नकाशावरून यात्रेबाबत कांहीं माहिती सांगितली, जी मला अगाऊच माहीत होती किंवा जिचें फारसें महत्त्व नव्हतें. हृषीकेश आणि देवप्रयाग येथील दोन कॉंग्रेस कार्यकर्त्यांनाहि आम्हांला मार्गांत साहाय्य देण्याबाबत त्यांनीं दोन पत्रें दिलीं. परंतु त्यांचें खास साहाय्य घेण्याचा आम्हांला प्रसंगच आला नाहीं. त्यांनीं केदारनाथ आणि बदरीनाथ ह्यांशिवाय तुंगनाथ व वसुधारा हीं दोन स्थानें अवश्य पहा म्हणून मला खास भलामण केली. फार्मसी पाहून आम्हीं परत आमच्या मुक्कामावर आलों.

फार्मसी (रस-शाळा) चांगली भरभराटींत असून तिच्यापासून प्राप्तिहि पुष्कळ होते असें कळलें. पाश्चात्त्य औषधांचा जसा मोठा व्यापार आहे तसा आणि त्याच पद्धतीवर आपल्याकडेहि सुरू झालेला आहे. ह्याबद्दल हर्ष करावा कीं शोक, हा प्रश्नच आहे. अन्न-वस्त्रां इतकेंच औषधहि माणसाच्या प्राथमिक गरजांत मोडूं लागलें आहे. ह्या वस्तूंचा जे लोक व्यापार करतात, ते जनतेला यथेच्छ लुटूं शकतात. ज्या औषधी व्यापाराबद्दल आम्ही पाश्चात्त्यांचा राग करतों तीच वस्तु आपल्या आयुर्वेदाभिमानी लोकांनींहि फायदेशीर् म्हणून आत्मसात् केलेली आहे. गांधीजी निसर्गोपचाराचे जे इतके हिमायती झाले आहेत त्याचें एक प्रमुख कारण म्हणजे कल्याणाच्या नांवाखर औषधांपाई जनतेची होणारी ही पिळवणूक होय. विद्यालयांनींहि हा व्यापार-आरंभिलेला पाहून अमळ नवल वाटतें. पण जेथें सरकार मद्यादिकांच्या व्यापारावर शिक्षणाचा खर्च काढतें, तेथें राष्ट्रीय शिक्षणसंस्थांनीं औषधांच्या व्यापारावर आपला कांहीं निर्वाह केला तर तें स्तुत्यच म्हटलें पाहिजे !

दुपारीं भोजनोत्तर थोडा विश्राम करून आम्ही ‘ हरिकी पायरी ’ चें दर्शन घ्यायला गेलों. तेथें गंगेला घाट बांधून एक प्रवाह घाटांच्या मधून खेळवला आहे. ह्या खेळवलेल्या प्रवाहावर पूल बांधला आहे. या घाटावरून त्या घाटावर त्यामुळें जातायेतां येतें. देवळें घाट व पूल ह्यांच्यामुळें प्रवाहाला कुंडाचें स्वरूप आलें आहे. ह्या कुंडाला ब्रह्मकुण्ड म्हणतात, आणि वस्तीकडील घाटाच्या पायऱ्या ती ‘ हरिकी पायरी ’ ब्रह्मदेवानें आपल्या कमंडलूंतील जलानें विष्णूचें पद धुतलें, शंकरानें तें पावन चरणोदक शिरसा धारण केलें, भगीरथानें त्याचा ‘मार्ग’ मोकळा केला आणि पातळांत नेऊन कपिल मुनींच्या नेत्राग्नीनें भस्म होऊन पडलेल्या आपल्या ६० हजार पूर्वजांचा, सगर-पुत्रांचा, उद्धार केला. तेव्हांपासून ही भगवती भागीरथी लोकोद्धाराचें कार्य अखंड करीत आहे. शिवालकांतून मुक्त होऊन गंगा प्रथम हरिद्वार येथें

मैदानांत येते म्हणून ह्याला 'गंगाद्वार' असें अन्वर्थक नांव आहे. पूर्वपरंपरेनुसार पांडवांनीं येथूनच ईशान्य दिशेस प्रयाण केलें, स्वर्गारोहण आरंभिलें, म्हणून ह्यासच 'स्वर्गद्वार' हि म्हणतात. केदारनाथची आणि बदरी-नारायणाची वाट येथूनच. म्हणून 'हर-द्वार' आणि 'हरि-द्वार' हींहि नांवें रूढ असून तीं अगदीं यथार्थ आहेत, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. आगगाडी-मोटारींच्या शापांतून हरि-द्वार, हृषीकेश हीं सुटलीं नाहींत. त्यामुळें इतर तीर्थ-क्षेत्रां प्रमाणें येथेंहि आनुषंगिक सर्व भले-बुरे प्रकार आले आहेत. तथापि देव-तात्मा नगाधिराज हिमालयाचें सांनिध्य आणि गंगामाईचें नयन-मनो-हर दर्शन भाविकाला संसाराचा क्षणभर विसर पाडल्याशिवाय रहात नाहीं. संध्याकाळचें 'हरिकी पायरी' वरील गंगेच्या आरतीचें दृश्य तर केवळ अपूर्व असतें. कसाहि दुःखी-कष्टी जीव असो, क्षणभर त्याचें देह-भान नाहींसें झालेंच पाहिजे ! संध्याकाळीं घाटावर कोठें कथा, कोठें भजन, कोठें पूजन चाललेलें असतें. शेवटीं आरती होते. परतीच्या यात्रेंत आरतीची अद्भुत शोभा मला पहायला मिळाली. मी कुंडांत पोहून मध्यभागीं जरा थाक घेतों तों आरतीला सुरवात झाली. आगेमागें आणि आजूबाजूला घाट, पूल आणि मंदिर भाविक स्त्री-पुरुषांनीं सर्व फुलून गेलें होतें. शेंकडों कंठांतून आरतीचें भाव-शुद्ध गायन होत आहे, अनेक घंटांचें तालबद्ध वादन चाललें आहे आणि जणूं ह्यानें प्रसन्न होऊन गंगा कुंडाच्या रंगणांत मोठ्या आनं-दानें नर्तन करीत आहे असें वाटलें. आणि वर पाहतों तों हें दिव्यसंगीत ऐकायला आकाशांत देवहि दाटी करूं लागलेले ! अंधार पडूं लागला होता आणि त्या अंधारांत दीपदानाच्या चिमुकल्या दीपनौका वाहिलेल्या पुष्प-द्रोणांसह नाचत आणि डुलत इतस्ततः फिरत होत्या. गंगेच्या वात्सल्यपूर्ण मुखाचें दर्शन करीत आणि करवीत त्या कृतकृत्य होत होत्या. दीपदान हें आम्हीं आमचें जीवन गंगामाईस अर्पण केलें आहे, हरिचरणीं वाहिलें आहे,

ह्याचें एक 'प्रतीक' च होय ! आरती संपल्यावर

अभिनव-विसवल्ली पाद-पद्मस्य विष्णोर्<br>
मदन-मथन-मौलेर् मालती-पुष्प-माला ।<br>
जयति जय-पताका काप्यसौ मोक्ष-लक्ष्म्याः<br>
क्षपित-कलिकलङ्का जाह्नवी नः पुनातु ॥

[ विष्णूच्या चरण-कमलाची अपूर्व विस-( कमलनाल-तंतु ) लता, शंकराच्या जटेवरील मालती ( चमेली ) च्या फुलांची माळ, किंबहुना मोक्षरूपी लक्ष्मीची विजय-पताका च शोभणारी ही कलि-मल-विध्वंसिनी – अधर्मरुचि-जनित सर्व पाप-पंक धुऊन टाकणारी– गंगा आम्हांला पुनीत करो. ]

असें स्तोत्र पुटपुटत मी परत पोंहून घाटावर आलों. पायऱ्यांजवळ पाण्यांत इतके मासे असतात कीं पाय ठेवायचा तो कित्येकदां त्यांच्या अंगावरच पडतो.

'हरिकी पायरी' पाहून आम्ही जवळच असलेल्या भीम-गोडा तीर्थाला गेलों. येथें एक कुण्ड असून लगतच्या डोंगर-कड्यांत पांच पांडवांचें मंदिर आहे. हिमालयांत अनेक ठिकाणीं पांडवांचीं स्मरणें आहेत. जेथें जेथें शक्तीचीं अचाट कामें आहेत तीं सर्व भीमाचींच ! पांडव भगवान् कृष्णाचे निःसीम भक्त. असें उत्कट सख्यभक्तीचें उदाहरण क्वचितच सांपडेल. भगवान् कृष्ण निजधामाला गेल्याचें कळल्याबरोबर क्षणांत साम्राज्य-लक्ष्मी सोडून देऊन पांडव हिमालयास चालते झाले कीं " जेथूनि मागें फिरणें नसे चि". हरिद्वार म्हणजे स्वर्गमार्गाचा उंबरठा. पांडवांचें स्वर्गारोहण येथूनच सुरू झालें, त्याचेंच हें स्मारक मी समजलों.

हरिद्वारला आणखी एक तीर्थ आहे—कनखल. हें गंगाकांठीं 'हरिकी पायरी'च्या उजवीकडे १–२ मैलांवर प्रवाहाच्या खालच्या बाजूला आहे. येथें दक्षेश्वर महादेवाचें मंदिर आहे. सती-पिता दक्षप्रजापतीचा बृहस्पति-सर्व

नांमक श्रेष्ठ यज्ञ येथेंच झालेला. या तीर्थाचें माहात्म्य असें कीं, कणमात्र गंगाजलाचा स्पर्श केला कीं 'पुनर्‌जन्म न विद्यते'. कनखल शब्दाची ही व्युत्पत्ति आहे. येथून गंगेच्या पलीकडे एक डोंगर दिसतो, त्याला 'नील-पर्वत' असें नांव आहे. कणानें जेथें काम भागतें तेथें मण कशाला, म्हणून मीं पंचार्द्र होऊन देवदर्शन घेतलें आणि निघालों. आईनें मात्र यथाविधि स्नानदानादि केलें. कनखलजवळून जो गंगेचा मोठा कालवा काढला आहे त्यावर गुरुकुल वसलेलें असून तें कनखल पासून १-१॥ मैलावरच आहे. आम्ही आमचें हरिद्वारचें तीर्थाटन आटोपून रात्रीला गुरु-कुलामध्यें वसतीला आलों.

# प्रकरण दुसरें

## हृषीकेश

दुसरे दिवशीं म्हणजे ता. ४।५।४६ ला आम्हीं हृषीकेशला जायचें ठरविलें. हिमालयांत जायचें म्हणजे थंडीचा पूर्ण बंदोबस्त केला पाहिजे. तेथें मधून मधून वृष्टिहि होत असते, त्यासाठीं बरसाती, छत्री, जलनिर्लेप कापड आदिहि पाहिजेच. प्रकाश आणि पाणी यांच्या सोईशिवाय मनुष्याची वसति कोठेंहि झाली तरी कष्टकरच होणार. करितां घ्या कंदील, घ्या बादली! आणि 'सर्वारंभास् तण्डुल-प्रस्थ-मूला:', तेव्हां दाळ-तांदूळ आणि मेवा-मिठाई न सांगतांच घ्यावयाची. देश परदेश आणि काल नियंत्रणाचा. अशा परिस्थितींत तर सर्व सामग्री आपली घरून घेतलेलीच बरी! अशा विचारानें आम्हीं पुरेसें सामान घेतलें होतें. पुरेसें होतें तरी फाजील मुळींच नव्हतें. पण इतकें ओझें वहायचें कसें? हिमालयांत सडका झाल्या तरी चढण किती! 'वाटे हळूं हळूं चाला, मुखाने रामराम बोला' असा उपदेश करायलाच नको! हिमालयांत अपोआपच होतें तें. राधाकृष्ण बजाज ह्यांनीं आपल्या अप्रकाशित बदरी-यात्रेच्या वृत्तांतांत लिहून ठेवलेलें माझ्या वाचनांत आलें होतें कीं पैदल यात्रेकरूनें आपल्याजवळ पावभरहि ओझें ठेवूं नये; आणि येथें माझ्याजवळ तर मणभरापेक्षांहि अधिक ओझें. ओझेकरी केल्याशिवाय इतकें सामान नेणें शक्यच नव्हतें. आणि माझा विचार, आणि आईचा हि, यात्रा करायचा होता, मौजेचा प्रवास नव्हे! त्यामुळें मी आपलें सामान कमी करायला बसलों. "यद् यद् आत्मवंश तु स्यात् तत् तत् सेवेत यत्नत:" असा मनूचा आदेश. आणि 'यद् वै मनुरवदत् तद् भेषजम्', म्हणून आपण अंगावर वाहूं शकूं इतकेंच घ्यावयाचें ठरविलें. अवजड हिंवाळी आणि बरसाती कोटांना रजा दिली. एक घोंगडी, एक पातळ एकेरी लोई आणि

कोशाची एक शाल एवढेंच आंथरूण-पांघरूण ठेवून बाकीचा सर्व बाड-बिस्तरा बाद केला. पायघोळ धोतर आणि आंगभर उपरणें यांना रजा देऊन दोन चड्डया आणि एकच सदरा व एक बंडी एवढाच पोशाख घेतला. मला पुस्तकांचा लोभ फार. पण तो सर्व सोडून मी फक्त एक भागवत आणि इतर दोन पुस्तकें तेवढीं बरोबर आणलीं होतीं. तींहि ठेवून दिलीं. माझ्या मतें माझा हा त्याग म्हणजे खरोखर संन्यास-पदवीचा होता. "वेदानपि संन्यसति, केवलम् अविच्छिन्नानुरागं लभते, स तरति स तरति" हें नारदाचें भक्ति-सूत्र मला तेव्हां आठवलें. एक बगलथैली शिवाजींनीं दिलेली आणि दोन हातथैल्या ह्यांत माझें सर्व सामान भरलें होतें. दोन हातथैल्यांची मी पडशी बनविली आणि खांद्यावर घेतली. बगलथैली चांगलीच जड होती. ती मला नेहमीं सव्यापसव्य करावी लागे. एका हातांत छत्री आणि दुसऱ्या हातांत कंदिलासह बादली. कंदील आणि इतर थोडें कांहीं सामान पुढें देव-प्रयाग येथें सोडलें. हें सर्व उपयुक्त सामान सोडल्यामुळें मला पुढें मार्गांत केव्हांहि पश्चात्ताप करायची पाळी आली नाहीं. सोडल्याबद्दल नेहमीं आनंदच वाटला. 'कस्य सुखं न करोति विरागः?' हरिद्वाराला आम्हीं दोन काठ्याहि खरीदल्या होत्या. मला काठीची गरज भासली नाहीं. माझी छत्री काठीचें काम देई, शिवाय वर्षा आणि आतप यांपासूनहि माझें रक्षण करी. 'कृपेची करिसि बरी साउली' म्हणून मी तिला मार्गांत किती किती तरी धन्यवाद दिले आहेत! दुसरी भूरि-धन्यवादार्ह वस्तु म्हणजे माझी पाणकुपी. 'मी तान्हेलों होतों आणि तूं मला पाणी पाजलेंस' असें मी तिला कृतज्ञतेनें सहजच म्हणूं शकतों! ह्या सामानाशिवाय विजेरी, मेणबत्त्या आणि कांहीं औषधेंहि घेतलीं होतीं. ह्या सर्वांचाच मला पुष्कळ उपयोग झाला. घड्याळ आणि झरणी हे सुशिक्षितांचे उपयुक्त अलंकारहि मजजवळ होतेच. त्यांचाहि कृतज्ञतेनें उल्लेख केला पाहिजे.

## नांव सेवा व करणी असेवेची !

हें सर्व सामान घेऊन आम्ही त्रिमूर्तिसत्यन्, मी आणि आई तांग्यानें हरिद्वारला मोटारीच्या अड्डयावर गेलों. पण तेथेंहि गर्दी होती. आमची डाळ शिजण्याचा संभवच नव्हता. त्यामुळें परत तांगा करून स्टेशनवर आलों. तिकिट मिळविण्याचें दिव्य सत्यन्नें केलें, पण गाडींत जागा मिळविण्याच्या दिव्यांतून आमची कोणाचीच सुटका होणारी नव्हती. त्यासाठीं आम्हीं फलाटावर जाऊन पुढची जागा घेतली. गाडी यायला बराच अवकाश होता. कांहीं यात्रेकरू एकमेकांचा परिचय करून घेत होते. पुष्कळ जण आपल्याच मंडळींचा घोकळा करून गप्पागोष्टी करीत होते. यात्रेकरूंत कित्येक हृषीकेशहून परतणारे होते, तर कित्येक पुढें जाणारे होते. स्त्रियांची संख्या पुष्कळच होती. बैरागीहि बरेच होते. मी इकडे तिकडे फिरून लोकांची मौज पहात होतों. इतक्यांत स्टेशनमास्तर आला आणि त्यानें सर्व यात्रेकरूंना दुसऱ्या फलाटावर जायला सांगितलें. त्याबरोबर उतारूंची जी तारांबळ उडाली ती सांगतां सोय नाहीं. मला नवल वाटलें, कीं हे रेल्वेचे अधिकारी यात्रेकरूंना कां नाहक सतावतात ! आधीं सांगितलें, या फलाटावर चला; आणि आतां म्हणतात, त्या फलाटावर ! असा प्रकार इतर देशांत नाहीं. येथील सर्व्हिसेस जनतेला पदोपदीं नाडणाऱ्याच आहेत हा अनुभव कोणाला नाहीं ? रेलवे, पोस्ट, कोर्ट, हॉस्पिटल कोठेंहि जा, एकजात हाच कटु अनुभव येत नाहीं का ? असें कां ? नांव सर्व्हिसेस म्हणजे सेवा आणि करणी असेवेची ! असल्या अधिकाऱ्यांविषयीं कवि म्हणतो :

> ' प्राप्य चलान् अधिकारान् शत्रुषु मित्रेषु बन्धु-वर्गेषु ।
> नापकृतं नोपकृतं न सत्कृतं किं कृतं तेन ।।

[ आज आहेत उद्यां नाहींत अशीं बेभरंवशाचीं अधिकार-पदें मिळालीं असतां ज्यानें आपल्या शत्रूंचा अपकार म्हणजे हानि, आपल्या इष्ट-मित्रांचा

उपकार म्हणजे लाभ आणि आपल्या बंधु-बांधवांचा सत्कार म्हणजे आदरातिथ्य केलें नाहीं, त्यानें काय केलें ? ]

मला वाटतें 'उदर-भरण' एवढेंच उत्तर देतां येईल; परंतु हें कांहीं उत्तर नव्हे ! असला पराक्रम तर कावळे आणि कुतरेहि करतात. त्यांत मनुष्यता नाहीं. लोक दुसऱ्या फलाटावर जाऊन बसले आणि गाडी आली. यात्रेकरूंसाठीं २।३ डबे होते. सर्व त्रिकार भरून गेले. बसलेल्यांना उठतां येईना आणि उभे असलेल्यांना हालतां येईना. हें वर्णन अतिशयोक्तीचें वाटेल, पण असा प्रकार होता खरा ! गाडींत चढतां चढतां आमचा पंखा, मुद्दाम वर ठेवला होता तो, पडला. ऊष्म्यामुळें प्राण कासावीस होऊं लागले. अखेर दुसऱ्याच्या हातांतला पंखा घेतला, तों तो आमचाच निघाला ! त्याचा वियोग खरोखरच आम्हांला असह्य होता !

## स्वैर निसर्गदर्शन

हृषीकेशला मर दुपारीं १२॥-१ ला पोंचलों. स्टेशनपासून गांव १॥ मैल दूर असेल. येथूनच आमच्या यात्रेला सुरवात झाली म्हटलें पाहिजे. ऊन चांगलेंच तापलें होतें. ओझ्यानें आणि उन्हानें आम्ही अगदीं थकून गेलों. बाबा कालीकमलीवाल्यांच्या धर्मशाळेचा तपास काढला आणि शाळेच्या सज्जांत सामान ठेवून त्यांच्या ऑफीसमध्यें जाऊन आलों. धर्मशाळा यात्रेकरूंनीं भरून गेलेली होती. ऑफीसकडून खोली मिळाली नाहीं. पण एका खोलींतील यात्रेकरूंनीं जागा दिली. झालें, त्यांची आमची सोबत थेट पुन्हां हृषीकेशला परत येईपर्यंत राहिली.

बदरीनारायणाचे पट वैशाख शुद्ध ( अक्षय ) तृतीयेला खुलतात आणि कित्येक भाविक यात्रेकरू त्या दिवशीं किंबहुना ४।६ दिवस आधींच तेथें जाऊन हजर होतात. आम्ही मात्र अक्षय तृतीयेला हृषीकेशला होतों. धर्मशाळेंत उतरलों आणि आमचा थकवाहि लवकरच उतरला. आमचें स्नानादिक

व्हावयाचेंच होतें. गंगेवर गेलों. येथील दृश्य हरिद्वारहून वेगळेंच. हरिद्वारला गंगाप्रवाह संथ वाटला तर येथें त्याचा वेग आणि खळखळाट प्रचंड होता. हरिद्वारला जरा कृत्रिम वातारण होतें. तेथें शहराच्या पार्श्वभूमीवर गंगाप्रवाह खेळत होता. तेथें घाट होतें. येथें घाट ना थाट. येथें होता स्वैर निसर्ग. समोर हिमालयाच्या रांगा दिसत होत्या आणि त्याच्या पायथ्याशीं गंगा वहात होती. गंगोत्रीच्या बाजूस वृष्टि झाल्यामुळें गंगेचें पाणी भगवें झालें होतें. आम्ही "रोगं शोकं पापं तापं, हर मे भगवति कलुषकलापम्" म्हणून कांठालगतच गुडघाभर पाण्यांत स्नानें केलीं आणि परत धर्मशाळेंत आलों. गंगाकुंडाला आणि राममंदिराला गेलों नाहीं. यात्रेहून परत आलों तेव्हां मात्र तेथें गेलों होतों. यात्रा, सुफळ करण्यासाठीं यात्रेकरू परतीच्या वेळींच विशेषतः, कुंडांत स्नानदानादि करतात.

## लक्ष्मण झूला

दुसरे दिवशीं ५।५।४६ ला सकाळीं आम्ही 'मुनिकी रेती' ह्या टिहरी गढवालच्या हद्दींतील वस्तीला मोटरचें तिकिट काढण्यासाठीं गेलों. हें स्थान हृषीकेश शहरापासून सुमारें १ मैल दूर आहे. तेथून पुढें १।१॥ मैलावर लक्ष्मण झूला-- नांवाचा गंगेवरील प्रसिद्ध पूल आहे. आणि तेथून जवळच मुनिकी रेतीच्या समोरच्या बाजूस गंगापार स्वर्गाश्रम नामक साधकांसाठीं बांधलेल्या इमारती आणि अलग अलग झोंपड्या आहेत. स्वर्गाश्रमाचें दृश्य फार सुंदर दिसतें. तेथें कित्येक साधु राहतात. त्यांच्या साधनेसाठीं विजनांत दूर दूर कुटि बांधून दिलेल्या आहेत. भोजनासाठीं ते स्वर्गाश्रमांत दुपारीं येतात. साधूंना एक वेळच भोजन मिळतें. स्वर्गाश्रमांत ग्रंथालय, वाचनालय, औषधालय इत्यादि सोई आहेत. मी तेथें गेलों तेव्हां सहजच थोर थोर साधकांची भेट घ्यावी अशी मला इच्छा झाली. एक तरुण साधु भेटले त्यांच्या जवळ पृच्छा केली. त्यांनीं उलट मी कोठला,

कोण इत्यादि माहिती घेतली आणि म्हणाले : "तुम्हांला येथें कोणाला भेटण्याची गरज नाहीं. तुम्ही विनोबा, बापूजी यांच्या सहवासांत राहिला आहां. तुम्हांला येथें मिळण्यासारखें विशेष कांहीं नाहीं." हा तरुण अगृहस्थ १-१॥ वर्षांपासून इकडे रहात होता. त्याला आमची चांगली माहिती दिसली. हिन्दीभाषी असून त्यानें विनोबांचीं गीता-प्रवचनें इत्यादि पुस्तकें वाचलेलीं होतीं. त्याला आमच्याकडील भौगोलीक माहीतीहि भरपूर दिसली. त्यानें मला तुम्ही नालवाडीला राहतां कीं दत्तपूरला, असा सवाल केला. तो ऐकून तर मी थक्कच झालों! कारण दत्तपूर म्हणजे अगदीं नवीन वसलेलें रीठ (ओस) गांव. त्याला कोणी आसपासचे लोकहि अद्याप नांवानें ओळखीत नाहींत. अशा स्थितींत ह्या दूरस्थ माणसाला ही माहिती कोठून? मला तरी प्रथम हिमालयांतील हें एक आश्चर्यच वाटलें. खरी गोष्ट अशी होती, कीं पूर्वीचा तो एक देशसेवक होता आणि वरधेस येऊन गेलेला होता.

स्वर्गाश्रमाच्या पुढें एक चार फर्लांगावर गंगातीरापासून जरा आंत एक साधारण वड आहे. त्या ठिकाणीं गोयनका नांवाचे एक मारवाडी सज्जन दरवर्षीं १-१॥ महिना कथा-कीर्तन करीत असतात. तेथेंहि सहज जाऊन आलों

मच्-चित्ता मद्-गत-प्राणा बोधयन्तः परस्-परम् ।
कथयन्तश्-च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥

[ त्यांचे सर्व मनो-व्यापार आणि प्राण-व्यापार ( म्हणजे कायिक वाचिक हालचाली) मजविषयींच होत असतात. परस्परांत माझीच प्रश्नोत्तररूपानें ज्ञान-चर्चा करीत आणि माझ्याच जन्म-कर्म-गुणांचें आणि तदर्थक नामांचें कथा-कीर्तन करीत ते निरंतर आपल्याच ठाईं तोष पावून रमत असतात. ] अशा भक्त-चरित्राचें तेथें नाटक चाललें होतें. क्षणभर तेथें बसून नौकेनें गंगा पार करून हृषीकेश गांवांत आलों.

## मठांतील शंकराचार्यजयंती

हृषीकेशच्या मुक्कामांत मी लक्ष्मण झुल्याला दोनदां गेलों. लक्ष्मण झूला पूर्वीं दोरखंडाचा होता. त्यावरून शिंक्यांत बसून जाणें धोक्याचेंच होतें. गंगेला कित्येक वर्षांपूर्वीं जो एक मोठा पूर आला त्यांत तो वाहून गेला. त्यानंतर कलकत्त्याच्या कोणा मारवाड्यानें आजचा पोलादी तारांचा भक्कम पूल बांधला आहे. ह्या पद्धतीचे झुलते पूल हिमालयांत ठिकठिकाणीं आहेत. झुल्यावरून गंगेची शोभा अपूर्व दिसते. प्रशस्त पात्र, वेगवती धारा, शांत वातावरण, हिमालयाचें सांनिध्य ह्या सर्वांचा चित्तावर कांहीं अनिर्वचनीय परिणाम होतो!

हृषीकेशला आणि आजूबाजूला मुनिकी रेती, लक्ष्मण झूला इत्यादि ठिकाणीं रामपंचायतनाचें माहात्म्य अधिक दिसलें. राम, भरत, शत्रुघ्न आणि लक्ष्मण यांचीं मंदिरें आहेत. हनुमंताचीं तर कैक असतील. माझी समजूत होती, हिमालयांत पांडव आणि कृष्ण ह्यांचींच स्मारकें असतील. परंतु रामाचींहि आहेत. आणि आहेत तींहि अगदींच थोडकीं नाहींत. देवप्रयागला आणि इतरत्र प्राचीन राममंदिरें आहेत. हीं बहुतेक शंकराचार्य-स्थापित मानलीं जातात.

लक्ष्मण झुल्याला जात असतां रस्त्यांत मुनिकी रेतीला शिवानंदांचा मठ लागला. तेथें थोडा वेळ होतों. मठाची मंडळी मुख्यतः दाक्षिणात्य आणि सुशिक्षित दिसली. येथून एक इंग्रजी मासिकहि निघतें. मठानें पुष्कळसे संस्कृत धर्मग्रंथ इंग्रजी भाषांतरादिकांसह प्रकाशित केले आहेत. कै. महादेवभाई १-२ दिवस येथें थांबले होते आणि त्यांना हें स्थान पसंत पडलें होतें असें कोणींतरी सांगितलें. मी तेथें गेलों तेव्हां मंडळी मठांत शंकराचार्यजयंती साजरी करण्यासाठीं जमली होती. मठांत चार महावाक्यें लावलेलीं होतीं आणि इतर सजावट होती. एक जण "चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर

पाहि माम्, चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर रक्ष माम्" ही धून रटाळपणें सांगत होता आणि इतर मागून म्हणत होते. पांच-दहा मिनिटें झालीं तरी धून संपेना तेव्हां मी कंटाळून उठलों आणि जवळच्या शिवालयांत गेलों, तेथें रुद्राभिषेक चालला होता. रुद्र म्हणणारे चांगले तयार दिसले नाहींत. तेथील सर्वच प्रकार निष्प्रभ वाटला. तेथील मंडळींपैकीं कोणाच्याच चेहऱ्या-वर मला ब्रह्मवर्चस् दिसलें नाहीं.

टिहरी दरबारनें श्रीबदरीनाथ ट्रॅन्सपोर्ट बस सर्व्हिस हृषीकेश ते कीर्तिनगर-पर्यंत ठेवली आहे. अर्थात् हा मोटार-रस्ता टिहरी गढवालमधून जातो. दरबारला ह्या बस सर्व्हिसपासून चांगली प्राप्ति होते. बसचें तिकिट आदल्या दिवशीं रिझर्व करावें लागतें. आम्ही ता. ५ ला गेलों होतों. आम्हांला तिकिट मिळालें ६ तारखेचें.

## देवप्रयाग

दुसरे दिवशीं म्हणजे ता. ६ मे १९४६ ला सकाळीं ६॥ च्या सुमारास आम्ही मुनिकी-रेतीला मोटारस्टँडवर गेलों तों तेथें उतारूंची तोबा गरदी होती. सामान कांट्यावर मोजण्यांत येत होतें. जरी सर्वांचीं टिकिटें रिझर्व झालीं होतीं तरी आपलें सामान प्रथम तोललें जावें ह्यासाठीं उतारू झगडत होते. लांचखाऊ नौकर लांच घेऊन क्रम सोडून कोणाचेंहि सामान आधीं मोजून देत. त्यामुळें फारच गोंधळ झाला. अखेर मलाहि त्यांत पडावें लागलें आणि झगडूनच सामान तोलवून घेतां आलें. आमची बस ७॥ च्या सुमारास सुटली आणि देवप्रयागला १२ च्या सुमारास पोंचली. हृषीकेश ते देवप्रयाग ४१॥ मैलांचा मोटार रस्ता आहे. हा रस्ता गंगेच्या पश्चिम अथवा उजव्या तीराच्या कांठाकांठानें गेला आहे. पूर्वतीराच्या कांठाकांठानें पैदल रस्ता आहे आणि तो ब्रिटिश हद्दींतून गेला आहे. हिमालयाच्या गढवाल प्रान्ताचे दोन भाग: एक टिहरी गढवाल आणि दुसरा ब्रिटिश गढवाल. उत्तरेस तिबेट,

दक्षिणेस गंगा आणि अलकनंदा, पूर्वेस मंदाकिनी आणि पश्चिमेस देहराडून जिल्हा अशा टिहरी गढवालच्या सीमा आहेत. टिहरी गढवालमध्यें यमुनोत्तरी व गंगोत्तरी हीं दोन धामें आलीं असून ब्रिटिश गढवालमध्यें केदारनाथ व बदरीनाथ हीं दोन आलीं आहेत. कैलास आणि मानस सरोवर हीं दोन यात्रा-स्थळें तिबेटच्या राज्यांत मोडतात.

देवप्रयाग येथें भागीरथी व अलकनंदा ह्यांचा संगम झाला आहे. उत्तरेकडून भागीरथी येते आणि पूर्वेकडून अलकनंदा. गांव मुख्यतः अलकनंदेच्या उत्तर तीरावर संस्थानी हद्दींत वसलेला आहे आतां ब्रिटिश हद्दींतहि गांव वाढत आहे. काली-कमलीवाल्यांची धर्मशाळा अलकनंदेच्या दक्षिण तीरावर अगदीं कांठाशीं असून तेथूनच पैदल यात्रापथ गेलेला आहे. कालीकमलीवाल्यांच्या धर्मशाळा बहुतेक सर्व प्रमुख स्थानीं असून त्या अगदीं मार्गावर आहेत. आम्ही प्रायः धर्मशाळांतच उतरत होतों. देवप्रयाग हा गांव समुद्रपृष्ठापासून १५५० फूट उंच असून सुन्दर आहे. त्याच्या तिमजली लाल रंगाच्या इमारती जणूं भागीरथींत व अलकनंदेंत आपलें प्रतिबिंब पहात आहेत असें वाटतें. संगमामुळें तर फारच शोभा आली आहे. "प्रस्रुत्वरीणां अति सिन्धुः ओजसा" म्हणजे 'प्रवाहांत सिन्धु ही सर्वांवर मात करते' असें म्हटलें तरी गंगा किंवा अलकनंदा सिन्धूला हार जातील असें वाटत नाहीं. इतका प्रचंड त्यांचा वेग आहे. नुकतीच जनलेली गाय वासराकडे जशी हंबरत आणि धांवत येते त्याप्रमाणें ह्या लोकमाता प्रचंड शब्द करीत धांवत आल्या आहेत. त्यांच्या प्रचंड आणि अखंड कल्लोळानें पृथिवी दुमदुमून द्युलोकहि भरून गेला आहे असें वाटतें. गंगोत्तरीकडे वृष्टि झालेली असल्यामुळें भागीरथीचें पाणी तांबूस झालेलें होतें. आणि अलकनंदेचें पाणी सिकता-मिश्र भुरकें होतें. पुष्कळ दूरपर्यंत दोन्ही प्रवाह न मिसळतां एकसाथ चालले होते.

संगमावर चांगला घाट बांधलेला असून क्षौर आणि श्राद्धादि तीर्थविधि येथेंच करतात. येथें श्राद्ध केल्यानंतर पुन्हा कुणाचें पिंडश्राद्ध करावें लागत

नाहीं, अशी समजूत आहे. श्राद्ध हा श्रद्धापूर्वक करावयाचा विधि असल्या-मुळें, आणि यात्रेला निघतांना 'कुठलाहि विधि मी करणार नाहीं, तुला जें काय करावयाचें असेल तें तूं करावेंस' असें आईला स्पष्ट बजावलें होतें त्यामुळें, मीं कुठेंच कोणाताहि विधि केला नाहीं. आईनें मात्र सर्व विधि केले.

## 'पापकर्माहं' चें 'पापकर्माणं'!

यात्रेकरू आल्याबरोबर पंडे लगेच जिल्हा विचारून यात्रेकरूंचे कोणी पूर्वज आलेले असल्यास त्यांचे नांव गांव काढून दाखवितात आणि आम्ही तुमचे पंडे आहोंत असा हक्क शाबीत करतात. तसा हक्क शाबीत झाला म्हणजे मग यात्रेकरू इतर पंड्यांच्या तावडींतून सुटतो. देवप्रयागचे पंडेच बहुतेक बदरीनाथचेहि पंडे आहेत. अलीकडे स्थापित झालेल्या बदरीनाथ-देवालय-व्यवस्थापक-समितीमुळें पंडे लोकांचें परंपरागत उत्पन्न बुडूं लागलें आहे. ब्राह्मणमात्र पंडा अशी स्थिति आहे. त्यांना अगदीं सामान्य ज्ञान असतें. बहुतेक यजुर्वेदी आहेत. एक पंडा यात्रेकरूला संकल्प सांगत होता त्यांत

"पापोऽहं पापकर्माणं पापात्मा पाप-संभवः।
त्राहि मां पुण्डरीकाक्ष सर्व-पाप-हरो हरिः॥"

[मज जीवाचा जन्म पापापासून झाला आहे. माझें मन पापी आहे. माझें कर्म पापी आहे. असा मी पापी आहें. हे पुंडरीकाक्षा! तूं आपल्या पावन-दृष्टीनें मला या पापापासून सोडव. तूं सर्व पाप हरण करणारा हरि आहेस] असा एक श्लोक आला. मीं त्याला सांगितलें–"बाबा, तूं हें चुकीचें सांगत आहेस. 'पापकर्माहं' पाहिजे, 'पापकर्माणं' नको." तो म्हणाला, आम्हांला असेंच शिकविलें जातें आणि त्याचें म्हणणें खरें दिसलें; कारण सर्वत्र असाच पाठ ऐकायला मिळाला. शुद्ध उच्चार, शुद्ध आचार

आणि शुद्ध विचार शिकवायला पाहिजे ब्राह्मणांनीं. पण आधीं त्यांना तर आला पाहिजे ना ! कोणीकडून चार पैसे मिळतील, हीच चिंता भटाभिक्षुकांना असते. अशा स्थितींत वेदाध्ययन आणि शास्त्राध्यन तरी कुठलें व्हायला ? ते यजमानांचे मिंधे झालेले असतात. त्यामुळें त्यांचें सारें तेज गेलें आहे. खऱ्या धर्मज्ञानाचा, आध्यात्मिकतेचा किंवा विद्येचाहि गंध त्यांच्यांत राहिलेला नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. येथें मला भिक्षुकावतार वामनाचें वचन आठवतें :

"पुंसो ऽयं संसृतेर् हेतुर् असंतोषो ऽर्थ-कामयोः ।
यदृच्छयोपपन्नेन संतोषो मुक्तये स्मृतः ॥
यदृच्छालाभ-तुष्टस्य तेजो विप्रस्य वर्धते ।
तत प्रशाम्यत्यसंतोषाद् अम्भसेवाऽऽशुशुक्षणिः ॥"

[ धर्म-ज्ञांच्या मतें जीवाच्या या संसाराचें कारण म्हणजे त्याची द्रव्य आणि कामवासना यांविषयींची असंतुष्ट-वृत्ति होय. आणि सहज-गत्या जें काय मिळेल त्याबाबत संतुष्ट-वृत्ति हें मोक्षाचें कारण होय.

अनायासें जें काय मिळेल त्यावर संतुष्ट-वृत्तीनें राहणाऱ्या ब्राह्मणाचें तेज वाढतें. आणि तेंच तेज असंतुष्ट-वृत्तीमुळें, पाण्यानें अग्नि विझावा त्या प्रमाणें, नाश पावतें.]

'असंतुष्टो द्विजो नष्टः' हें आहे ह्याचें तात्पर्य. मला पुष्कळ सज्जन पंडे, तरुण आणि वयस्क, भेटले ज्यांनीं ह्या विचारांचें अनुमोदन केलें. हेंच आशा-स्थान आहे. गढवालमध्यें ह्यासाठीं देव-प्रयाग, उखी-मठ, जोशी-मठ, इत्यादि ठिकाणीं असा प्रयत्न होत आहे. पण जें काय पहायला मिळालें त्यावरून ती चळवळ नसून निव्वळ वळवळ आहे असें म्हटलें पाहिजे.

## सफाईदार हिंदी बोलणारा महाराष्ट्रीय

देवप्रयागला मी श्रीलाल थपल्याल नांवाच्या पंड्यांच्या परिचयांत आलों. त्यांना त्यांच्या राजकीय चळवळीमुळें टिहरी दरबारनें हद्दपार केलें आहे. ते एक तरुण उत्साही काँग्रेस कार्यकर्ते आहेत. त्यांची कांहीं तसल्याच विचारांची मित्रमंडळीहि आहे. दोन दिवसांत त्यांच्याशीं चांगलाच घनिष्ठ परिचय झाला. मी महाराष्ट्रीय असून हिंदी इतकें सफाईदार बोलतो ह्याचें त्यांना आश्चर्यच वाटलें. ते म्हणाले, तुम्ही खास हिंदीभाषी वाटतां, महाराष्ट्रीय म्हणून भाषेवरून ओळखतां येत नाहीं. खुद्द गढवालची भाषा हिंदी नाहीं. हिंदीची एक बोली गढवाली आहे. तिचे कांहीं उच्चार बंगालीसारखे आहेत. ते एक दिवस ( तारीख ७ ला ) मला संगमाच्या अगदीं समोर असलेल्या द्वीपतुल्य स्थानीं एका बंगाली साधूकडे घेऊन गेले होते. सदर बंगाली संन्यासी रामकृष्ण मिशनचा नव्हता. उच्च पदवीधर असून १-१॥ वर्षांपासून येथें राहत होता. त्याचा येथील वास पाहून मला

"उपह्वरे गिरीणां, संगथे च नदीनाम्, धिया विप्रो अजायत ॥"

—'पर्वतांच्या गुहांत आणि नद्यांच्या संगमावर ध्यान करून ( साधक ) विप्र म्हणजे ज्ञानवान् झाला आहे.' हें वेदवचन आठवलें. संध्याकाळची प्रार्थना येथें करून आम्ही परत धर्मशाळेंत आलों.

धर्मशाळेंत रहायला स्वतंत्र खोली, आंथरायला सतरंजी किंवा जाजम, रांधायला भांडींकुंडीं, जळण आणि साधु-संन्याशांना सिधासामग्री मिळते. कांहीं ठिकाणीं औषध-पाण्याचीहि सोय असते. ह्या सर्व सुखसोई बहुतेक वरिष्ठ वर्गाच्या यात्रेकरूंनाच मिळतात. इतरांना मिळूं नयेत असा निर्बंध नाहीं. पण त्यांच्यांत इतकी हुशारीच नसते. गबाळ आणि बावळट लोकांना ते कोठेंहि गेले तरी, विपत्ति ही ठेवलेलीच!

देवप्रयागला राममंदिर असून तें आद्यशंकराचार्यांनीं स्थापिल्याची आख्यायिका आहे. ह्याचा उल्लेख मागें आलाच आहे. मीराबाईच्या बदरीनारायणाच्या दिंडींत असलेले श्री. सीतारामभाऊ चौधरी हे मला अचानक रामचन्द्राच्या मंदिरांत भेटले. ते चारी धामांची म्हणजे उत्तरा-खंडांतील जमनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बदरीनाथ यांची पैदल यात्रा करायला निघाले होते. हृषीकेशहून ते पैदलच आले होते. चालण्याचा फार त्रास झाला, भयंकर चढ आहे, म्हणत होते. त्यांचा पुढीलहि रस्ता गंगेच्या कांठाकांठानें गेला होता. आमचा देवप्रयागपासून अलकनंदेच्या कांठानें विभागला.

## श्रीनगर

तारीख ८ ला दुपारीं २ च्या सुमारास आम्हीं देवप्रयाग सोडलें. आमची बस वळणें घेत चालूं लागली. वळणें फार आणि पुन्हां केव्हां केव्हां तीव्र येत. टिहरी दरबारनें आपल्या राज्यांतून जो मोटार-रस्ता तयार केला आहे, मुनिकीरेतीपासून कीर्तिनगरपर्यंत आणि इतरत्र, तो तितकासा चांगला नाहीं. परंतु ब्रिटिश गढवालमधील मोटार-रस्ते प्रशस्त, सरळ आणि किमान उतारचढाचे असे आहेत. बहुतेक लॅन्सडौनपासून पौडी श्रीनगर करून मोटार-रस्ता थेट चमोलीपर्यंत गेला आहे. तूर्त चमोली हेंच मोटार-रस्त्याचें टर्मिनस म्हणजे शेवट असलें तरी १०-५ वर्षांच्या अवधींत थेट बदरीनाथ-पर्यंत मोटार-रस्ता तयार होईल असें दिसतें. 'इकडे पर्वत, तिकडे दरी' अशा रस्त्यानें बस जात असतांना दरींतील शेतें फार मनोहर दिसत होतीं. मधून मधून वनश्री-मुखमंडनभूत आम्रवृक्षहि दिसत होते. वसंतऋतु असल्या-मुळें पुंस्कोकिलांचा पंचमालाप ऐकूं येत होता. शेतें पायऱ्यापायऱ्यांचीं लहान-मोठीं अशीं होतीं. हिमालयांत माझी कल्पना होती त्यापेक्षां पुष्कळच अधिक शेती दिसली. मुख्यतः गव्हाजवाचीं पिकें निघतात. पिकें वर्षांतून

दोन निघतात. कारण वृष्टि बरीच होते. गुरेंढोरेंहि बरीच आहेत. पण ठेंगू. गाईंना दूध नाहीं म्हटलें तरी चालेल. दूध बहुतेक म्हशींचेंच. पुष्कळ दिवसपर्यंत मी गाईच्याच दुधाचा आग्रह राखला. पण अखेर मला तो यात्रेपुरता तहकूब करणेंच इष्ट वाटलें. अस्तु. आमची बस २१ मैलांचा प्रवास करून ३॥ च्या सुमारास कीर्तिनगरला पोंचली. मोटार-स्टँडजवळील धर्मशाळेंत सामान ठेवून मी अलकनंदेचा पूल ओलांडून एकटाच श्रीनगरला तीन मैल चालून गेलों. रुद्रप्रयागसाठीं बस मिळते काय, ह्याची चौकशी केली. पण ती सर्वोपलभ्य नाहीं असें पाहून तिचा नाद सोडला आणि कालीकमलीवाल्याच्या धर्मशाळेंत गेलों. तेथें व्यवस्थापकाकडून खोली मिळवली. आमची इतर मंडळीहि ऊन उतरल्यावर ५॥ च्या सुमारास धर्मशाळेंत आली. आम्ही एकूण ६ जण होतों. मी, आई, दोन सिंधी गृहस्थ आणि दोन सिंधी स्त्रिया.

उद्यांपासून म्हणजे ता. ९ पासून आमची खरी यात्रा सुरू व्हायची होती. रात्रीं पाऊस आल्यामुळें आमची यात्रा कशी काय होते ह्याची जरा चिंताच वाटत होती. पण 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान् पूर्ण करी मनोरथ' असा विश्वास बाळगून आम्ही ठरल्याप्रमाणें सकाळीं ५ वाजतां प्रार्थना आटोपून चालायला सुरवात केली. आमच्याबरोबर मागें पुढें इतरहि बरेच यात्रेकरू होते. पण हो, यात्रेला निघण्यापूर्वीं श्रीनगरची थोडी माहिती दिली पाहिजे. श्रीनगर हें गढवालमधील सर्वांत मोठें शहर असून समुद्र-सपाटीपासून १६०० फूट उंच वसलेलें आहे. येथें पोष्ट,-तार-ऑफिसें, डांक बंगला, हॉस्पिटल, पोलिस-स्टेशन, हायस्कूल, आदि सर्व सोई आहेत. कमलेश्वर आणि किलकिलेश्वर महादेवाचीं येथें मंदिरें आहेत. सिद्ध-पीठ म्हणून हें प्रसिद्ध आहे. गढवालची ही एके काळीं राजधानी होती. आद्य शंकराचार्यांनीं भद्रकालीला नरबळि देण्याची प्रथा येथेंच राजाकडून बंद करवली

असें म्हणतात. जवाहरलाल आदि पुढारी गढवालमध्यें येतात तेव्हां मध्यवत, सर्व-सोई असलेलें ठिकाण म्हणून येथेंच सभा होतात. येथें काँग्रेस कमिटी असून तिचें कार्य बरें चालतें असें दिसलें. रोज सायंकाळीं सर्व लोकांच्या माहितीसाठीं ताज्या महत्त्वाच्या बातम्या धर्मशाळेच्या दरवाज्या शेजारीं फळ्यावर लिहून ठेवल्या जातात. मला ही पद्धति पुष्कळ उपयुक्त वाटली. भुलाभाईच्या स्वर्गवासाची बातमी मला येथेंच समजली. नगर चांगलें प्रशस्त असून नांवाप्रमाणेंच 'श्री-नगर' आहे. एका बाजूनें नदीचा वेढा आणि दुसऱ्या बाजूनें डोंगराची रांग ह्यांच्या दरम्यान ऐसपैस मैदानांत हें आटपाट नगर वसलेलें आहे. लगतच्या डोंगरावर चीडचे वृक्ष–ज्यांपासून–टरपेनटाईन–तेल–निघतें–विरळ विरळ दिसले. हे वृक्ष सामान्यत: १००० फूट उंचीपासून वर चांगले भरभराटतात.

आमचें शौचमुखमार्जनादि आटोपलेंच होतें. तेव्हां श्रीनगरच्या बाहेर पडल्यानंतर जें पहिलें दुकान लागलें तेथें आम्हीं दूध बटाटे घेतले आणि प्रातराश आटोपला. सामान्यत: हिमालयांतील दुकानांवर दूध, चहा, मिठाई, बटाट्याचीं भजीं हीं सर्वत्र मिळतात. दूध बहुतेक निर्भेळच असतें.

## यात्रेच्या पहिल्या दिवशींची चुकामूक

श्रीनगरहून पुढचें मोठें शहर म्हणजे रुद्रप्रयाग. हें १८ मैलाचें अंतर. आम्ही पहिलाच दिवस असल्यामुळें किती चालणें झेपतें तें पाहून चालणार होतों. दुपारचा मुक्काम ८।९ मैलावर असलेल्या खांखरा चट्टीवर करावयाचा विचार होता. भट्टीसेरा ते खांखरा ३।३॥ मैलाचें अंतर, परंतु भट्टीसेरा-पासून सुमारें १ मैल अगदीं खडी चढाई होती. मी संबंध चढाई मध्यें कोठेंहि न बसतां पार केली. सामान्यत: चढाईत माझा हाच क्रम होता. चढाच्या माथ्यावर मात्र मागें राहिलेले सोबती येईपर्यंत विसांवा घेतला. ह्या चढाच्या चोटीवरून पलीकडील डोंगरांच्या रांगा फारच सुंदर दिसत

होत्या. परंतु हिमाचें तर दर्शनच नव्हतें. सोबतची मंडळी आल्यानंतर त्यांनींहि थोडी विश्रांति घेतली आणि आम्हीं सगळे जण परत मार्ग-क्रमण करूं लागलों. स्वाभाविकच सोबतच्या स्त्रियांपेक्षां आणि वृद्धांपेक्षां माझी चाल जलद असल्यामुळें त्यांच्यांत आणि माझ्यांत वारंवार पुष्कळ अंतर पडे. त्यामुळें त्यांना पुढील खांखरा चट्टीवर मी थांबतों, तेथें या, तेथेंच दुपारचें भोजन आपण करूं, असें सांगून पुढें निघालों. १०॥-११ च्या सुमारास खांखरा चट्टीवर मी पोंचलों. एका धर्मार्थ आयुर्वेदिक दवाखान्याच्या शेजारीं पोष्टाची पेटी पाहून प्रभाकरजींना सेवाग्रामचे पत्त्यावर एक पत्र लिहिलें, आणि जरा पलीकडे असलेल्या दुकानावर जाऊन मंडळींची वाट पहात बसलों. परंतु १२ वाजले, १ झाला तरी त्यांचा पत्ता नाहीं असें पाहून मी जरा चिंतित झालों. जेवण नाहीं खाण नाहीं, सोबत्यांचा पत्ता नाहीं, आणि त्यांच्या बरोबर म्हातारी आई ! ह्या पहिल्याच दिवशींच्या विचित्र अनुभवामुळें आधींच तापलेलों दुःखानें पुन्हां संतापलों. मागें राहिलेल्या आमच्या मंडळीचे मुखिया होते पूनमचंद. परंतु ह्या प्रसंगामुळें ते 'पूनम-चंद' असूनहि सूर्यापेक्षांहि अधिक तापदायक झाले. अखेर रुद्र-प्रयागहून श्रीनगरकडे जाणाऱ्या एका वाटसराकडून कळलें, कीं सिंधचे थरपारकर जिल्ह्याचे ४।५ लोक रुद्र-प्रयागकडे पुढें गेले आहेत. तेव्हां तीन वाजतां मीहि तिकडे निघालों. ह्या उन्हाच्या प्रहरीं बहुतेक सर्व यात्रेकरू विश्रांति घेत होते. रस्त्यानें बहुतेक मीच एकटा चाललों होतों ऊन खूपच कडक होतें. मधून मधून पाण-कुपीचें ओझें कमी करीत होतों. सोबतीला खालीं खोल अलकनंदा आणि वर उंच ललाटंतप सूर्य, अशा थाटांत एक तासभर चालत नाहीं तों आकाश मेघांनीं भरून आलें आणि वृष्टि सुरू झाली. उन्हासाठीं उघडलेली छत्री पावसापासून बचाव करूं लागली. आतप-त्रच वर्षा-त्र झालें ! वृष्टि चांगलीच जोराची होती. सामान-सुमान भिजणार म्हणून भय वाटत होतें. वृष्टि बंद नव्हे पण मंदहि होत नाहीं असें

पाहून डोंगरकड्याच्या निवाऱ्याला थोडा वेळ थांबलों आणि वृष्टि किञ्चित् मंद झालेली पाहून चालूं लागलों.

## गढवाली आझाद हिंद सैनिकांचें 'जय हिंद'

जवळपास कोठें चट्टी किंवा एखादें शेतघरहि दिसत नव्हतें. पण थोडें दूर गेल्यावर एक रस्त्यालगत झोंपडें लागलें. तेथें अगाऊच पुष्कळ यात्रेकरू थांबले होते. मींहि तेथें आसरा घेतला. कांहीं गढवाली शेकोटी पेटवून गुडगुडी पीत होते आणि आझाद फौजेंतील एक मुक्त सैनिक सुभाषबाबू आणि त्यांचें कार्य, आपला अनुभव, जपानी शिक्के आदि गोष्टी आपल्या गढवाली भाईंना मोठ्या अभिमानानें सांगत होता आणि लोकहि कान देऊन ऐकत होते. त्याच्याजवळ आझाद हिंद फौजेचे बिल्ले वगैरे होते. परतीच्या वेळीं याच सैनिकाशीं आणि येथेंच पुन्हा भेट झाली आणि त्याकडून आम्ही गाईचें दूध घेतलें. तो ह्या आडरानांतील एकाकी दुकानाचा मालक होता आणि सुटून आल्यापासून सदर धंदा करीत होता. सदर माजी सैनिक देशप्रेमानें भरलेला आणि दिलदार होता. गढवालमध्यें असे आझाद हिंद फौजेंतील माजी सैनिक किती तरी आहेत. आणि त्यांच्यामुळेंच मुख्यतः 'जय बद्री विशालकी' या जयघोषाइतकाच 'जयहिंद' हा घोषहि सर्वत्र ऐकू येतो आणि ठाईठाईं लिहिलेला आढळतो, हें येथें नमूद्लें पाहिजे.

## चुकलेल्यांची पुनर्भेट व मार्गांतील प्राणसंकट

पाऊस ओसरल्याबरोबर आमचा पांथ-समागम संपला आणि यात्रा चालू लागली. आतां संध्या-समय झालेला होता आणि रुद्रप्रयाग २-२॥ मैल होतें. मला आईला भेटायची आणि सोबत्यांना गांठायची उत्कंठा लागलेली होती. त्यामुळें बाहेरील सृष्टि-शोभा किंवा आंतील क्षुत्-क्षोभाकडे लक्ष न देतां मी चाललों होतों. किंबहुना चालणें चालत होतें. लवकरच सडकेच्या

एका बाजूला लाल झंडया दिसूं लागल्या त्यावरून मीं ओळखलें कीं कोणती तरी चट्टी आली आहे. येथें आपली मंडळी थांबली असतील काय, असा विचार मी करतों इतक्यांत पूनमचंदजींनीं 'महात्माजी, महात्माजी' म्हणून मला हांक मारली आणि आपण एकदांचे भेटलों ह्याचा मला संतोष झाला. ही गुलाबराय चट्टी होती आणि रुद्रप्रयाग येथून फक्त एक मैल राहिलें होतें. मी चट्टींत जाऊन बसलोंमात्र, आई आमची सोबती मंडळी आणि इतर यात्रेकरू माझ्याभोंवतीं जमले आणि कोठें होतां, तुमची आमची चुकामूक कशी झाली इत्यादि प्रश्नोत्तरें अर्धा तास चाललीं. पण आईनें कांहींच खाल्लें नव्हतें आणि माझेंहि जेवण झालें नव्हतें त्यामुळें प्रथम आम्ही त्याच तयारीला लागलों. आईनें दूधबटाटे घेतले आणि मी खवळलेल्या वैश्वानराला खिचडीची आहुति दिली. आहुतींत अन्नशुद्धि भरपूर होती. कारण, आमच्या गोशाळेंत तयार झालेलें देव-दुर्लभ गो-घृत आम्हीं मुद्दाम सोबत वागाविलें होतें. भोजनादि आटोपून आम्ही सायं-प्रार्थना केली आणि देह निद्रेच्या स्वाधीन केला.

पण झोंपीं जाण्यापूर्वीं दुपारच्या प्रवासांतील एक प्रसंग येथें सांगितल पाहिजे. रस्त्यानें मी एकटा चाललों होतों. पाऊस पडत होता. झपाझप पावलें टाकित मी नाकाच्या शेंड्यासमोर, इकडे तिकडे न पाहतां, चालण्याशीं गांठ ठेवली होती. इतक्यांत माझ्या कानावर मोठा धाडधाड आवाज आला. वर पाहतों तों एक भला मोठा धोंडा थेट शिखरावरून सुटला होता आणि १-१॥ मिनिटांत जमीनदोस्त होणार होता. आणि मी जर धूम ठोकली नसती तर मलाहि जमीनदोस्त करणार होता. पण कृपा नारायणाची कीं अगदीं थोडक्यांत मी बचावलों. माझ्यापासून फक्त पांच फुटाच्या अंतरावर तो प्रचंड गिरिखंड चूरचूर झाला. हा प्रसंग मीं आईला सांगितला नाहीं. तिला त्यामुळें नसती चिंता लागली असती. हे एकंदर भयावह अनुभव पुढील यात्रेबाबत आम्हीं सावध व्हावें एवढ्यासाठीं नारायणानें पहिल्याच्च दिवशीं दिले असें म्हटलें पाहिजे.

## रुद्रप्रयाग

दुसरे दिवशीं म्हणजे ता. १० ला पहांटे ५ ला आम्हीं कूच केलें. लवकरच रुद्रप्रयाग आलें. गांवांत न थांबतां आम्ही केदारनाथला जाण्यासाठीं अलकनंदेचा पूल ओलांडून पलीकडे, जेथें अलकनंदा व मंदाकिनी मिळतात तेथें, संगमावर गेलों. मंदाकिनी-खोऱ्याचें हें प्रवेशद्वार. संगम गांवापासून किंचित् बाजूला आहे. तरी तेथें कालीकमलीवाल्यांची धर्मशाळा असून इतरहि थोडीशी वसति आहे. जवळच रुद्रनाथाचें मंदिर आहे. येथें नारदानें



रुद्रप्रयाग : मंदाकिनी–अलकनंदा संगम

रुद्रदर्शनासाठीं तपश्चर्या केली अशी आख्यायिका आहे. येथून केदारनाथ ४८ मैल असून बदरीनाथ ८८ मैल आहे. कांहीं लोक ज्यांना केवळ बदरीयात्रा करायची असते त्यांना अलकनंदेचा येथील पूल ओलांडावा लागत नाहीं. ते सरळ अलकनंदेच्या दक्षिण-तीरानें जातात. परंतु अधिकतर यात्रेकरू दक्षिणावर्त परिक्रमा करून आधीं केदारनाथ करून मग बदरीनाथला जातात. अस्तु. अलकनंदा आणि मंदाकिनी यांच्या संगमावर घाट फारसा

चांगला नाहीं. दृश्यंहि देवप्रयागासारखें नयन-मनो-हर नाहीं. आईनें स्नान-दान आणि देव-दर्शन यथाविधि केलें आणि मीं केवळ जलस्पर्श करून मंदिरांत रुद्राचें दर्शन केलें आणि महिम्नापैकीं कांहीं भाग म्हणून स्तुति केली. येथें आम्ही फार तर ४५ मिनिटें असूं.

रुद्रप्रयागाला एक १८।२० वर्षे वयाचा रजपूत तरुण मला भेटला आणि तुमच्याबरोबर येतों म्हणाला. तो ४।६ मैल माझ्याबरोबर होता. त्याच्या पासून ओझें वाहण्याची पहाडी पद्धति मीं शिकून घेतली. ह्या पद्धतींत ओझें पाठीवर राहतें, ओझ्याला विशिष्ट रीतीनें बांधलेल्या दोराचे दोन फासे खांद्यावर घेतले जातात. आणि ओझ्याच्या बुडापासून दोहों बाजूनीं आलेली पट्टी डोक्यावर घेतली जाते. ह्या पद्धतीनें मण, दोन मण वजनाचींहि ओझीं पहाडी लोक थोड्या प्रयासानें वाहूं शकतात. मोठमोठ्या ट्रंका, पोतीं बिस्तरें इत्यादि सर्व प्रकारचें सामान तर वाहतातच पण मोठमोठीं लांकडें देखील. मीहि ह्या पद्धतीनें माझी बगलथैली बांधून कांहीं दिवस वाहिली. लष्करांत देखील सामान वाहण्याची पद्धति अशीच आहे.

रुद्रप्रयागला अलकनंदा सोडून आम्हीं मंदाकिनीचा कांठ धरला. ही रस्ता परत चमोली येथें अलकनंदेला येऊन मिळेपर्यंत चांगलीच कसोटी करणारा आहे. चढ उतार पुष्कळ आहेत. पण पार्वती शोभाहि अप्रतिम आहे. ही शोभा पहात पहात दुपारीं एका चट्टीवर स्नान भोजनादि केलें आणि थोडी विश्रांति घेऊन आम्ही रात्रींच्या मुक्कामासाठीं अगस्तिमुनि चट्टीवर गेलों. तेथें आम्हीं थोडा दिवस असतांनाच पोंचलों. बाबा काली-कमलीवाल्यांच्या धर्मशाळेंत उतरलों.

## अगस्ति मुनि

अगस्त्य मुनींनीं येथें तपश्चर्या केली आणि येथेंच वातापि व इल्वल ह्या दोन ब्राह्मण-भक्षक राक्षसांना त्यांनीं जिरवलें, अशी कथा आहे. हें एक

चांगल्या ऐसपैस सपाट मैदानांत समुद्रसपाटीपासून ३००० फूट उंचीवर वसलेलें मोठें गांव आहे. येथें विमानावतरणाची सोय आहे, अथवा होती. तेथें एक हायस्कूल असून मन्दाकिनीच्या खोऱ्यांतील सर्व गांवांना हेंच सोईचें आहे. किंबहुना दुसरें नाहींच. एक शिक्षक धर्मशाळेंतच राहत होते. त्यांच्याशीं राजकारण, समाजकारण, इत्यादिविषयीं चांगली चर्चा झाली. ते इतिहासाचे विशेष अभ्यासी होते. त्यांचीं व माझीं मतें पुष्कळशीं जुळलीं. हिंदुमुसलमान-समस्या, हिंदीउर्दू-झगडा इत्यादि बाबतींत त्यांचे विचार गांधी-विचाराहून वेगळे होते, पण विचारणीय होते. काँग्रेसमधील मुसलमान लीगच्या फक्त दहा वर्षें मागें आहेत. अर्थात् दहा वर्षांनंतर हेच लीगला मिळतील, असें त्यांचें म्हणणें. काँग्रेसमधील मोठमोठ्या मुसलमान व्यक्तींचा सुद्धां मुळींच भरोसा नाहीं असेंहि त्यांचें म्हणणें होतें. पण मीं त्यांना ह्याबाबत इतकेंच सांगितलें कीं, काँग्रेसमध्यें मसलमान राहोत अगर न राहोत त्यांच्या बाबतींत जोंपर्यंत काँग्रेसचें धोरण पूर्णपणें निःपक्षपाती आणि न्याय्य आहे, जोंपर्यंत ती मसलमानांच्या धमकावणीला आणि आमिषाला बळी पडून आपलें शुद्ध राष्ट्रीय आणि लोकशाहीचें स्वरूप सोडत नाहीं तोंपर्यंत तिला भिण्याचें थोडेंहि कारण नाहीं. 'दीर्घं पश्यत मा ह्रस्वम्' हें सूत्र आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. चाळीस कोटी प्रजेच्या हिताचा आणि तोहि केवळ आजच्यापुरता नव्हे तर आगामी शेंकडों वर्षांसाठीं आम्हांला विचार कर्तव्य आहे. केवळ तात्कालिक लाभाकडे लक्ष देऊन जर आम्ही आज भलताच निर्णय केला तर त्याचे भयानक परिणाम भावी पिढ्यांना भोगावे लागतील. हीच गोष्ट हिंदी-उर्दूच्या बाबतींतहि. आपणाला येथें सर्वांना नांदावयाचें आहे हें विसरून चालणार नाहीं. हिंदुसंस्कृतीची गंगा आणि मुस्लीम संस्कृतीची यमुना ह्या दोन्ही सारख्याच पूज्य आणि पवित्र आहेत. पण ह्या दोहोंचा संगम हा त्या दोहोंहूनहि अधिक पवित्र आहे, असें नाहीं का ? इंग्रजी संस्कृतीची सरस्वती ह्या त्रिवेणींत मिसळली आहे

आणि तशी ती राहील. धारा दोनच दिसतील. कबीर आणि नानक, अकबर आणि सदृश हिंदू राजे ह्यांनीं ही संस्कृति – संगमाची अथवा गंगाजमनी संस्कृतीची कल्पना केली असून ती पुष्कळशी सफलहि झाली आहे. परंतु त्या कल्पनेचें संवर्धन नीट झालेलें नाहीं. ह्याचें एक मुख्य कारण म्हणजे ह्या वस्तूचें समाज नेत्यांनाच सम्यक दर्शन झालेलें नाहीं, हें आहे. त्यामुळें तिचें बौद्धिक आकलनहि नीट झालेलें नाहीं तथापि हिंदुस्थानचा भाग्यविधाता लोकांच्या नकळत आणि पुष्कळदां त्यांच्या अज्ञानजन्य अतएव घोर विरोधालाहि न जुमानतां संस्कृति-संगम घडवून आणीत आहे. हें ओळखून जे ह्या ईश्वरी कार्यास साधनीभूत होतील, निमित्तमात्र होतील, ते जन आणि जनार्दन दोहोंचेहि लाडके होतील. भारतभाग्य–विधाता गीतेंत म्हणतो आहे:

ये मे मतं इदं नित्यं अनुतिष्ठन्ति मानवाः ।
श्रद्धावन्तो ऽनसूयन्तो मुच्यन्ते ते ऽपि कर्मभिः ॥
ये त्वेतद् अभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।
सर्व-ज्ञान-विमूढांम् तान् विद्धि नष्टान् अचेतसः ॥

[ जे तत्त्वज्ञांचा हेवा न करतां माझ्या ह्या मताप्रमाणें निरंतर आचरण करीत राहातात ते श्रद्धावान् लोक देखील कर्म-बंधापासून मुक्त होतात, परंतु जे तत्त्वज्ञांचा हेवा करून माझ्या ह्या मताचा अव्हेर करतात ते बेभान लोक पुरे अडाणी आणि नाश पावले म्हणून समज. ]

माझें हें मत त्यांना ऐतिहासिक दृष्टया पटवून दिलें. त्यांना त्याचा प्रतिवाद करतां आला नाहीं. आज वरून दोन जमातींत कितीहि विरोध दिसो, विरोधाच्या धुक्याचा हा सागर सत्यसूर्यापुढें टिकायचा नाहीं, हे निश्चित. ह्या भाग्य-स्त्रोताच्या विरुद्ध जे जातील ते दुःख पावतील, ह्यांत शंकाच नाहीं. तेच प्रगतीच्या घड्याळाचे काटे मागें सारीत आहेत.

इतिहासाच्या ओघाला ते उलटवूं पहात आहेत. पण त्यांत अखेर यश यायचें नाहीं, हें ठरलें आहे. ज्याला डोळे आहेत तो हें पाहूं शकतो. अस्तु. अशा गोष्टी करायला मिळाल्यामुळें सदर शिक्षक माझ्यावर फार खूष होते. मी वर्धेहून आलों आहें हें ऐकून तर ते विशेषच प्रसन्न झाले. त्यांनीं वरधा-शिक्षणविषयींहि पुष्कळशी माहिती घेतली आणि वरधेला येण्याविषयीं आपला मानस कळविला. ते एक हिंदीचे चांगले कवि आहेत. त्यांनीं आपलीं विडंबन-कवनेंहि मला म्हणून दाखविलीं. मला तीं पुष्कळच चांगलीं वाटलीं. रात्रीं आमचीं भोजनें झाल्यावर खानदेशांतील दोंडाईचे गांवचे गांवचे कोणी महाराज आणि मंडळी ह्यांचें भजन झालें. आमच्या शिक्षक-मित्राकडे तबला-पेटी असल्यामुळें भजनी मंडळींनाहि चांगला उत्साह होता. भजन खरोखरच अप्रतिम झालें. महाराजांचा कंठ मधुर असून आलापादिकांत ते खूपच तरबेज दिसले. चांगलें प्रहरभर सांप्रदायिक पद्धतीनें भजन झाल्यावर मंडळी झोंपली.

## पङ्गुं लङ्घयते गिरिम्

दुसरे दिवशीं ११।५।४६ ला सकाळीं नित्याप्रमाणें आम्हीं ५ वाजतां प्रार्थना करून निघालों. दुपारीं बहुतकरून चंद्रापुरी चट्टीवर आम्हीं स्नान-भोजनादि केलें आणि थोडीशी विश्रांति घेऊन पुन्हां निघालों. संध्याकाळीं प्राय: रोज पाऊस पडत असल्यामुळें दुपारीं आम्ही लवकरच निघत होतों. शिवाय मित्र वाल्यापैकीं म्हातारी चंपाबाई फारच हळू चालत असे, त्यामुळेंहि लवकर निघणेंच भाग पडे. आम्हीं मुक्कामावर पोंचल्यावर प्राय: अर्धा पाऊण तासानें मागाहून ती येऊन पोंचे चालतांना.

> " बल दाओ मोरे बल दाओ प्राणे दाओ मोर शकति
> सकल हृदय लुटाये तोमारे करिते प्रणति. "

हे बंगाली पद मी प्राय: म्हणत असें आणि चंपाबाईला उत्साह देत असें.

चंपाबाई बालविधवा, निपुत्रिक, धार्मिक वळणाची आणि चांगली बहुश्रुत होती. तिच्या पुष्कळच गोष्टी आमच्या वैकुंठवासी आत्याबाईशीं जुळणाऱ्या होत्या. त्यामळें तिच्याविषयीं मला एक प्रकारें विशेष आपुलकी वाटे. ती ६० वर्षें वयाची म्हातारी दळणावर आणि शिवणटिपणावर आपला चरितार्थ चालवते. त्यांतून होणाऱ्या कमाईतून ती अल्पस्वल्प दान-धर्म करते आणि अतिथि-अभ्यागताचा आदरसत्कार करते. त्या कमाईच्या रकमेंतून च तिची ही यात्रा होत होती. ही म्हातारी हळू चाले, थकून मध्येंच बसेहि, पण ठरलेल्या मुक्कामावर, मागाहून कां होईना, येऊन मिळे. तशी ती बरीच मजबूत होती. आईहि तिच्याइतकीच म्हातारी आणि अशक्त, पण तिची चालण्याची शक्ति चांगली निघाली. घरीं तिला दत्तपूरहून नालवाडीला पाईं चालवत नव्हते पण येथें ती मोठमोठे पहाड ओलांडून जाई. हें सामर्थ्य तिचें नव्हतें. 'करविता धनी वेगळा चि' होता. 'पङ्गुं लङ्घयते गिरिम्' ह्याचें तें प्रत्यक्ष उदाहरणच झालें मला. श्रद्धाबळच अखेर खरें बळ आहे. तें नसेल तर इतर बळें लटकींच पडायचीं.

## गुप्त काशीचें गुप्तदानमहात्म्य

आमचा रस्ता उत्तरोत्तर उंच उंच चढत होता. आम्ही गिरिकाननाची आणि नदीनाल्यांची शोभा पहात, केदारनाथाचा जयजयकार करीत घाट चढत होतों. ११॥ मैलाचा बिकट घाट चढून अखेर संध्याकाळच्या सुमारास आम्ही गुप्तकाशीला आलों. दिल्ली, हृषीकेश, देवप्रयाग इत्यादि ठिकाणीं आम्हांला भेटलेला पंडा गोकुळप्रसाद आमची वाटच पहात होता. त्यानें आम्हांला एका दुकानांत उतरविलें. आम्ही अगदीं थकून गेलों होतों. पण गोकुळप्रसादचे समवयस्क मित्र आले त्यांच्याशीं गोष्टी करण्यांत थकवा केव्हा निघून गेला तें मला कळलेंहि नाहीं, गोकुळप्रसादनें माझ्या पांडित्याचा आगाऊच बोलबाला केला असल्यामुळें एका तरुण नवशिक्षितानें मला

संस्कृतांतच प्रश्न विचारला, विचाऱ्याचें संस्कृतचें ज्ञान ह्याहून फारसें अधिक असल्यामुळें मी सरळ हिंदींतच उत्तर दिलें आणि संभापण केलें, त्या सर्व तरूण विद्यार्थ्यांना चांगले शिकून खरेखुरे पंडित व्हा, नांवाचे पंडे राहूं नका, असा उपदेश केला आणि त्यांनींहि मला तसें वचन दिलें, जवळच उमठाला संस्कृत-विद्यालय होत असून तेथें आम्ही नांवें दाखल केलीं आहेत, असें त्यांनीं सांगितलें,



## मंदाकिनी दरी–गुप्तकाशी

गुप्तकाशी हा गांव रुद्रप्रयागहून २४ मैलांवर असून इतकेंच अंतर येथून केदार नाथाचें आहे, समुद्र सपाटीपासून ४८५० फूट उंचीवर एका प्रशस्त गिरि-शृंगावर हा वसलेला आहे, ह्याच्या पूर्वेस खोलच खोल दरींत मंदाकिनी असून तिच्यापलीकडे निम्न भूमिकेवर उमठ हा गांव वसलेला आहे, गुप्तकाशीची शोभा अपूर्व दिसते, येथे चन्द्रशेखर आणि अर्धनारीनटेश महादेवाचीं दोन मंदिरें असून एक स्वच्छोद कुंडहि आहे, मंदाकिनी हें गंगेचेंच एक नांव आहे (तथापि ही मंदाकिनी गंगेहून वेगळीच आहे) आणि गंगेच्या कांठीं गुप्तकाशीस चंद्रशेखर आहे म्हणून कदाचित् ह्यास

काशी असें नांव पडलें असावें, आणि ही काशी अज्ञात, अप्रसिद्ध म्हणून गुप्तकाशी, पंडयांना विचारलें असतां ते कांहींच उलगडा करूं शकले नाहींत, गुप्तकाशी नांवामुळेंच कीं काय येथें गुप्तदानाचें माहात्म्य सांगून यात्रेकरूंना गुप्तदान करायला सांगतात. तसें तर उत्तरखंडाच्या यात्रांत बहुतेक सर्वत्रच गुप्तदान करण्यास सांगितलें जातें.

## ' टॅव्हेल लाइट ' असें सांगणारें रामपुर !

दुसरे दिवशीं ता. १२ ला आम्ही सकाळीं नित्यक्रम आटोपून निघालों. आमच्याबरोबर येथून परत नालाचट्टीला बदरीनारायणाच्या रस्त्यास लागेपर्यंत गोकुळप्रसाद हा पंडा होता. रुद्रप्रयागपासून मंदाकिनीच्या कांठानें आमची वाट सारखी उंच उंच चढत होती. ह्या चढाचा कळस अखेर केदारनाथालाच होतो. हा चढ समुद्रसपाटीच्या वर सुमारें २००० फूट उंचीपासून सुरू होऊन १२ हजार फूट उंचीपर्यंत चढत गेला आहे, ह्या वरून किती बिकट आणि खडी चढाई आहे ह्याची कल्पना येईल. आज आम्ही दुपारी व्यूंगचट्टीला स्नानभोजनादि केलें. येथें आमच्या सिंधी मित्रांचें बरेंचसें सामान मीं ठेवून दिलें. कारण पुढें चढाई बिकट होती, ' ट्रॅव्हल लाइट ' ही सूचना इथल्य इतकी इतर कोठेंहि अधिक लाभाची नसेल, पण जेव्हां मी धनिकांना चरबीच्या ओझ्यानें धापा टाकतांना आणि त्यांच्या ओझेकऱ्यांना किंवा कंडी-दंडी-वाल्यांना ओझ्यानें दबलेले पाहीं, तेव्हां मला त्या दोघांची कींव आल्याखेरीज रहात नसे, इतकें सामान नेण्याची खरोखर गरज नसतेच, गरज असते तितिक्षेची आणि समाधान वृत्तीची. यात्रेला इतकें प्रचंड सामान बरोबर नेण्याची खरोखर माणसाला लाजच वाटली पाहिजे, ' कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ' ह्या आचार्यांच्या उक्तीची महती अशा प्रसंगानें सहजच चित्तांत ठसते, रात्रीचा मुक्काम रामपूरला झाला. ही चट्टी चांगली मोठी आहे. सर्व प्रकारच्या सोई आहेत. डाकबंगला

आहे, सरकारी दवाखाना आहे, येथें दुकानदारानें रात्रींच्या उतारांबद्दल आमच्याकडून माणशीं दोन आणे घेतले. अशी पद्धति इतरत्र आढळली नाहीं. चूल चौका, झोंपण्याची जागा इत्यादींची व्यवस्था चांगली असल्या-मुळें दोन आणे देणें कांहींच वाटलें नाहीं. खरें म्हणजे दोन आण्यांत इतकी व्यवस्था ठेवल्याबद्दल त्याचे आभारच मानले पाहिजेत, येथें माझा घसा आल्यामुळें मी दवाखान्यांतून थ्रोटपेंट करवून आलों, संध्याकाळच्या वेळीं येतांना नित्याप्रमाणें आम्हांला पावसानें गांठलें होतें. चढहि पुष्कळ होता, त्यामुळें आम्ही थकून गेलों होतों, रात्रीं भोजन करून निजतांना काढा करून घेतला. दुसरे दिवशीं दुपारीं त्रिजुगी नारायण करून गौरीकुंडला रात्रीं मुक्काम करावयाचा असा विचार केला आणि हरिस्मरणपूर्वक झोंपीं गेलों,


## त्रिजुगी नारायण आणि गौरीकुंड

दुसरे दिवशीं ता, १३ ला प्रातःस्मरणादि आटोपून थरमॉस रिकामा केला आणि मार्गारूढ झालों. आज सुमारें पांचशें सातशें फूट उंचावत गेलेला चढ चढावयाचा होता. सकाळीं निघतांना चांगली थंडी होती. पण चढाईच्या श्रमानें लवकरच घाम फुटून माझा सदरा ओला चिंब झाला. मध्यंतरीच्या किरकोळ चढ्या ओलांडून आणि १॥-२ मैलांची खडी चढाई चढून आम्ही दुपारीं ११ च्या सुमारास त्रियुगी नारायणास पोंचलों, त्रियुगी नारायणाचा रस्ता गौरीकुंड-केदारच्या रस्त्यापासून डाव्या हातास सुमारें ३-४ मैल आहे, ३-४ मैलच पण चांगलीच कसोटी करणारा आहे, केव्हां केव्हां एक फर्लांग म्हणजे मैलांपेक्षांहि भारी वाटे, 'दीर्घ श्रान्तास योजन' ह्या धम्मपदांतील वचनाची तेव्हां मला आठवण झाली आणि त्याची अन्वर्थताहि पटली. अस्तु. हा गांव समुद्रसपाटीपासून सुमारें ७००० फूट उंचीवर वसलेला असून येथें नारायणाचें मंदिर आहे. याला त्रियुगी नारायण म्हणतात. त्रियुगी म्हणण्याचें कारण तो कालगणनेच्या आरंभापासून आहे असें सुच-

विण्याचा दिसतो. चालू युग कलि हें चौथें आहे अर्थात पूर्वीं तीन युगें झालीं आणि तेव्हांपासून हा नारायण म्हणून त्रियुगी नारायण म्हणावयाचा अथवा भूत, भविष्य, वर्तमान ह्या तिन्ही कालीं तो असतो म्हणूनहि त्रियुगी ह्या विशेषणाची उपपत्ति लागूं शकेल. मंदिर सामान्य असून मूर्ति अष्ट-धातूची सुमारें फूट-सव्वाफूट उंचीची आहे. मूर्तीच्या समोर सभामंडपस्था-नीय भागांत एक होमकुंड पेटलेलें असून त्यांत एक मोठी खांदी जळत होती. हा अग्नि अखंड, अनेक युगें झाली, जळत आहे. त्रेतायुगांत भगवान् शंकराच्या लग्नाच्या वेळीं प्रथम ह्या होमाग्नीची स्थापना झाली, अशी आख्यायिका आहे. त्या होमाग्नीचें भस्म परम पवित्र समजलें जातें. मंदि-राच्या समोर आणि बाजूला मिळून चार कुंडें असून तीं ब्रह्मा, विष्णू, महेश आणि सरस्वती ह्यांची मानलीं जातात. जलस्पर्श करून मीं दर्शन केलें आणि देवाच्या द्वारीं क्षणभर बसून षट्पदी आळविली व परत आलों. गांवाची वसति दीड एकशें घरांची. दुकानें बेताचींच. माशा अपरंपार. खरें म्हणजे एकहि चट्टी निर्मक्षिक तर राहोच, पण अल्पमक्षिकाहि आढळली नाहीं. माशांचें कारण मुख्यत: जिकडे तिकडे थुंकणें, ओल आणि उघडीं खाद्यें व मळच होय. माशांच्या उपद्रवामुळें, क्षणभरहि सुखानें, शांतीनें खाणें-पिणें, किंवा निजणें-बसणें जमलें नाहीं. येथें बटाटे सहा आणे शेरा-प्रमाणें मिळाले, जे इतरत्र दहा आण्याखालीं मिळाले नाहींत. आईनें बटाटे व दूधच घेतलें; मी सिंधी मित्रांकडे भोजन केलें. भोजनोत्तर १५।२० मिनिटें विश्रांति घेऊन आम्हीं पुढें निघालों.

गौरीकुंड—केदारनाथाच्या रस्त्याला लागण्यासाठीं क्रमिलेलाच रस्ता परत क्रमावा लागला नाहीं. प्रथम कांहीं वेळ उतार उतरून मग चढाई लागली. आधींच थकलेले होतों, त्यांत ही चढाई. त्यामुळें सायंकाळीं गौरीकुंडला पोंचलों, त्या वेळीं आमच्यांत फार थोडें त्राण उरलें होतें.

आम्हांला बसल्यानंतर खरोखर उठणें मुष्किल होतें. परंतु 'देव-बलात्कारा-मुळें पोटपूजेसाठीं हातपाय हलवणेंच आलें. गौरीकुंडला गौरीचें देवालय असून गौरीकुंड व तप्तकुंड अशी दोन कुंडें आहेत. मीं दिवसभरांत स्नान केलेलें नसल्यामुळें, येथें संध्याकाळीं तप्तकुंडांत स्नान केलें. तप्तकुंड हें मंदाकिनीच्या अगदीं तीरालगतच असून त्यांत गोमुखांतून एक सळसळत्या पाण्याची धारा पडते. त्या पाण्यांत गंधकाचा गंध येतो. नदीच्या पाण्यांत त्याच्या हिमशीतलतेमुळें उतरवत नाहीं, तर तप्तकुंडांत त्याच्या दाहकतेमुळें मी कुंडांत उतरलों, आणि अत्युष्णता सहन न होऊन तसाच वर आलो



त्रियुगी नारायण देवालय.

वर पायऱ्यावर बसून लोट्यानें स्नान केलें. पुष्कळ नरनारी भाविकपणें कुंडांत उतरून व्यवस्थित स्नान करीत होतीं. कांहींनीं तर तप्तधाराहि मस्तकांवर घेतली ! परंतु इतकी साहसी भक्ति करणें मला अगत्याचें वाटलें नाहीं. रात्री आत्मारामाला गरम गरम खिचडी निवेदन करून हरिस्मरण पूर्वक झोंपीं गेलों. रात्रीं येथें थंडी बरीच पडते. म्हणून गोकुळप्रसादानें आमच्यासाठीं एक कोरी रजई आणली होती. तिचें तीन आणे भाडें पडलें

पण तिच्या गरमीमुळें रात्रीं झोंप चांगली झाली. हें स्थान समुद्रसपाटी पासून ६८०० फूट उंच असून पार्वतीचें जन्मस्थान मानलें गेलें आहे. येथून केदारनाथ ७ मैल राहतें.

## हिमानें गारठलेलें केदारनाथ

दुसरे दिवशीं ता. १४ ला सकाळीं नित्याप्रमाणें ५ ला प्रार्थना आटोपून आम्ही केदारनाथाच्या वाटेस लागलों. रुद्रप्रयागपासूनच केदारनाथानें आम्हांला वेधिलें होतें. परंतु येथून आमची उत्कंठा अधिकच वाढली. शिवचा महिमा गात आणि जय जय करीत आम्ही निघालों. मन्दाकिनीची आणि गौरीगुरु हिमालयाची शोभा अपूर्व दिसत होती. आजूबाजूच्या गिरिशृंगांवर आणि त्यांच्या दऱ्यांत रुपेरी हिमाचें दर्शन अद्‌भुत होतें. आतांपर्यंत हिमालयांत हिमाचें आम्हांला दर्शन झालें नव्हतें. प्रथम येथें 'हिमालया' नें आम्हांला आपले पाय दाखविले. उत्तरोत्तर जसजसें आम्ही चढत गेलों तसतसें अधिकच मनोहर दृश्य दिसूं लागलें. शरीर शीर्ण झालेलें पण मनोरथ वेगवान् होता. मन तर केव्हांच केदारनाथाला पोंचलें होतें ! पण शरीर तसें कसें जाणार ? पक्षी एका झेपेंत जाईल तेथें मुंगीला पोंचायला वेळच लागणार ! 'शनैः पर्वत-लङ्घनम्' ची आतां प्रतीति येत होती. एरव्हीं माझी गति ताशीं ४ मैलाची, पण येथें ताशीं मैल सव्वामैलावर जात नव्हती. तरूण आणि म्हातारे ह्यांच्यांतहि फार अंतर पडत नव्हतें. दुपारीं ११ च्या सुमारास मध्यंतरींच्या एक दोन चट्टया तात्पुरतीं दुकानें-ओलांडून मी आणि आई केदारनाथला पोंचलों. आमच्या मागून अर्धा एक तासानें इतर सोबती आले. रस्त्यांत एका दरींत लोळत असलेली हिमानीं आम्हांला लागली होती, पण येथें तर तिन्ही बाजूस हिमश्रेणी होत्या. हिमजला नदी, हिम-वात आणि हिमालय; सर्व कांहीं हिमेछ-हिंवानें गारठलेलें-होतें. चंडर मध्याह्न सूर्याचे प्रखर किरणहि येथें सौम्य आणि शीतल झालेले होते. आम्ही

आता समुद्रसपाटीहून ११,७८९ फूट उंच स्थळीं केदारनाथला होतों. म्हणजे गौरीकुंडहून सुमारें २००० फूट उंच केदारनाथ मंदाकिनीच्या विस्तृत दरींत प्रशस्त उपत्यकेवर वसलेलें आहे. उत्तरेस मागच्या बाजूस महापथ नामक पर्वत श्रेणी असून पूर्वेस व पश्चिमेसहि दोन पर्वतपंक्ति आहेत. केदारनाथ इतर जमुनोत्री, गंगोत्री, व बदरीनाथ या धामांप्रमाणें सहा महिने बर्फांत बुडालेलें असतें. हीं चारी धामें-जमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ व बदरीनाथ एकाच पर्वतराजाच्या मांडीवर पण एका मागें एक अशीं वसलेलीं आहेत. त्यांच्यांतील सरळ अंतर थोडेंच आहे. केदारनाथहून बदरीनाथ सरळ विहंगम–मार्गानें २०-२५ मैल पण मंदाकिनीच्या आणि अलकनंदेच्या कांठानें गेलेला धोपट मार्ग १०१ मैलांचा आहे. कांहीं कांहीं माहीतगार तपस्वी गंगोत्रीहून सरळ हिमालयाच्या कडेकडेनें बदरीनारायणास जातात. बदरीनारायणास असा एक तपस्वी मला भेटला होता. अस्तु. केदारनाथ गांव अगदीं छोटा असून फार तर शेंपाउणशें घरांची वसति असेल. बाजारहि साधारणच. निसर्गाची शोभा मात्र अपूर्व. पण त्याला विसदृश असा हा गाव पाहून मी आपल्या मनात म्हटलें, हें चित्र पहा, आणि हें चित्र पहा. कोठें ती निसर्गरूप ईश्वर कला आणि कोठें ही भिकार मानवी अवकळा ! आकाश-पाताळाचें अंतर !

मंदाकिनीचा छोटासा पूल ओलांडूनच केदारनाथ गांवांत प्रवेश होतो. पुलाजवळच स्नानें होतात. चांगला घाट नाहीं. पण स्नानाची सोय केलेली आहे. आम्ही स्नानें करूनच केदारनाथ गांवांत प्रवेश केला. मंदाकिनी जवळूनच उगम पावलेली असल्यामुळें तिचें पात्र येथें निरुंद आणि उथळ आहे. पण वेग फार. पाण्यांत उतरलेला माणूस वाहून जाऊं नये म्हणून एक मजबूत पहार प्रवाहांत रोवलेली आहे. तिला धरून मीं स्नान केलें. स्नान म्हणजे दंडस्नान. पहार धरली, एक-दोन वेळां डोकें बुडविलें आणि ताडदिशीं

बाहेर आलों. हिमजलामुळें रक्त गोठतें कीं काय असें वाटलें. वर येऊन जोरजोरानें आंग चोळलें आणि पुसलें. केसांत बरीच रेती अडकली होती. नदीचें जल पांढऱ्या रेतीनें भरलेलें होतें. त्यामुळें आणि हिमामुळेंहि तें पांढुरकें दिसत होतें. स्नानामुळें अंगांत भरलेली हुडहुडी काढण्यासाठीं आम्ही तडक मुक्कामावर गेलों. गोकुलप्रसादनें एक माडीवरील दालन आम्हांस दिलें होतें. जमिनीवर सतरंजी आंथरलेली होती. त्याला आम्ही तावडतोब रजया आणि शेगडी घेऊन यायला सांगितलें आणि थोडक्याच वेळांत त्यानें दोन्ही वस्तु आणून दिल्या. शेगडी मिळाली पण लांकडें इतकीं सर्दावलेलीं होतीं कीं तीं पेट घेत ना. प्रयासानें पेटवला पण तो अग्निहि लौकरच अगदीं गारठून गेला. शेवटीं रजई घेऊन थोडा वेळ पडलों आणि थोडी ऊब आल्यावर पूजासाहित्य घेऊन मंदिरांत देव-दर्शनाला गेलों. आता थोडा झिमझिम पाऊस सुरू झाला होता. देव दर्शन लवकरच करणें जरूर होतें. कारण दुपारचा पट-बंध होण्याची वेळ झाली होती.

## केदारनाथाला प्रेमाश्रूंचा रुद्राभिषेक

केदारनाथाचें मंदिर बदरीनाथपेक्षां चांगलें भव्य असून प्राचीन आहे. मंदिराच्या समोर एक चांगलें ऐसपैस फरस—बंद आणि जोतेंदार आंगण आहे. बहुतकरून देवळाचा सभामंडप बांधण्यासाठींच तें तयार केलें असावें. त्या आंगणांत उभें राहून आजूबाजूचें सृष्टि-सौंदर्य कांहीं अपूर्व दिसतें. पूजा-साहित्य घेऊन जेव्हां आम्ही आंगणांत आलों तेव्हां समोर मंदिराच्या द्वारांत मंदिराच्या वहिवाटदार रावळाचा मुनीम प्रत्येक यात्रेकरूकडून तीन पैसे रावळाचा कर म्हणून वसूल करतांना दिसला. आंत गेल्यावर पूजेप्रित्यर्थ दिलेली दक्षिणा प्रायः पंड्यांना मिळते. रावळाच्या माणसानें मला अडवलें नाहीं. पण आमचे सिंधी मित्र पूनमचंद यांना अडवलें व तीन पैसे मागूं लागला. पूनमचंद यांना कसेंसेंच वाटलें. देवाच्या दरबारांत शिरायला कर

कसला ? त्यांनी असल्या देवाच्या दर्शनाला जायच्याच इनकार केला ! मला त्यांचें करणें मनापासून आवडलें. पण नंतर त्यांनाहि जाऊं देण्यांत आलें. बदरीनारायणाच्या मंदिरांत हा प्रकार नाहीं. अस्तु. नंदिकेश्वराचें दालन ओलांडून आम्ही गाभाऱ्यांत गेलों. तेथें यात्रेकरूंची गर्दी होती. रेटारेटीशिवाय आंत जाणेंच शक्य नव्हतें. गोकुळप्रसादाच्या कृपाप्रसादानें आम्ही केदारनाथाच्या चरणांशीं पोंचलों. हें एक स्वयंभू लिंग आहे. हा अनघड महादेव त्रिकोण-मूल ३-४ फूट उंचीचा पिरमीड (सूच्यग्रस्तंभ) आहे. त्याच्या चारी बाजूस पंडे बसले होते. आणि यात्रेकरूंकडून विधि करवीत होते. यात्रेकरू केदारनाथाला लोणी चोपडीत होते आणि आलिंगन देऊन जात होते. माझा विचार रुद्राभिषेक करावयाचा होता. पण त्या भाऊ गर्दींत हें कसलें जमतें ? शिवाय रुद्रपाठी तरी तेथें चांगला मिळाला पाहिजे ना ? अखेर ज्याहून सुंदर दुसरें स्तोत्र नाहीं-महिम्नो नापरा स्तुतिः-



केदारनाथाचें मंदिर

त्या महिम्नस्तोत्रानें केदारनाथाला आळविलें. स्तोत्र म्हणतां म्हणतां डोळ्यांतून दोन प्रेमाश्रू गळाले आणि तोच माझा रुद्राभिषेक झाला ! महिम्न मला लहानपणापासून पाठ. त्याची अर्थगुरु गंभीर भाषासरणी, दिव्य आणि भव्य

कल्पना-वैभव आणि ज्ञानभक्ति-प्रकर्ष अद्‌भुत आहेत ! महिम्न म्हणतां म्हणतां समाधीचा अनुभव आल्यास नवल नाहीं. शिव-प्रसाद घेऊन, अमृत-समद्रांत खोल बुडून निघाल्याप्रमाणें परमाह्लाद-युक्त होऊन, मी घरीं परतलों. शिवालयांत माझ्या हातून केदारनाथाला आलिंगन देण्याखेरीज कोणताच पूजोपचार झाला नाहीं.

आत्मा त्वं, गिरि-जा मतिः सह-चराः प्राणाः, शरीरं गृहं,
पूजा ते विषयोपभोग-रचना, निद्रा समाधि-स्थितिः ।
संचारः पदयोः प्रदक्षिण-विधिः, स्तोत्राणि सर्वा गिरो,
यद् यत् कर्म करोमि तत् तदखिलं शंभो तवाराधनम् ॥

[ हे शंभों ! तूं आत्मा आहेस. बुद्धि ही पार्वती, प्राण हे तुझे गण,शरीर हें घर, विविध विषयांचा उपभोग हीच तुझी पूजा, निद्राच समाधि, पद-प्रचार हीच तुझी प्रदक्षिणा आणि सर्व बोलणें हींच तुझीं स्तोत्रें होत. तात्पर्य, जें जें कांहीं मी करतों तें तें सर्व हें शंभो, हे आत्मरूपा !तुझेंच अराधान होय. ]

अशी सहज--समाधि; व्युत्थान--निरपेक्ष समाधि, लागेल तो सुदिन !

आईला आज ( ता. १४ ) नृसिंह--जयन्ती--निमित्त उपवास असल्या-मुळें जेवावयाचें नव्हतें. आम्ही बाजारांत जी पक्की रसोई मिळाली तिच्यावरच निर्वाह केला. इंधन मिळणें दुरापास्त म्हणून दुकानांतून घेऊन खाणेंच भाग होतें. महागाई खूपच होती. गोकुळप्रसादासह प्रसाद ग्रहण करून आम्ही रजया पांघरून पडून राहिलों. बाहेर झिमझिम पाऊस पडत होता. थंडी मी म्हणत होती. मी आपला वेळ बहुतेक पांढऱ्यावर काळें करण्यांत घालविला. अर्थात् तीन एक विस्तृत पत्रें लिहिलीं.

## 'टाळ मृदंग दक्षिणेकडे, माझें गाणें पश्चिमेकडे !'

रात्रीं मंदिरांत आरतीला गेलों. या वेळचा थाट कांहीं और होता. पिंडीवर शंकराचा मुखवटा चढवला असून सजावट केलेली होती. शंख, झांज, तास, तुरे वाजत होते. भक्तगण 'टाळ मृदंग दक्षिणेकडे, माझें गाणें पश्चिमेकडे' ह्या नामदेवाच्या उक्तीप्रमाणें आरती म्हणत होते. पुजारी पंचारती ओवाळून केदारनाथाचें दर्शन करवीत होता. शिस्त, पद्धत, विधि अभावानेंच झळकत होतीं. शंकराच्या मंदिरांत पूर्ण संकर दिसला. महादेवाची ही महत्ता आहे कीं, तो आपल्या भक्तांचे हे सर्व प्रकार निमूटपणें सहन करतो. अस्तु. आरतीवरून परत येऊन आम्ही ईशस्मरणपूर्वक शयन केलें.

केदारनाथ हें प्रसिद्ध द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. तें स्वयंभू आहे. तेव्हां त्याची स्थापना कोणी केव्हां केली, हा प्रश्नच चूक ठरायचा. तथापि मंदिर पांडवांनीं बांधलें अशी आख्यायिका आहे, आणि शंकराचार्यांनी त्याच्या पूजा-अर्चेची व्यवस्था लावून दिलेली आहे. नंदिकेश्वराच्या दालनांत पांच पांडवांच्या मूर्ति बाजूच्या भिंतीवर उठावदार कोरलेल्या आहेत. पांडवांनीं स्वर्गारोहण येथून केलें, अशी समजूत आहे. केदारनाथाला सहा महिनेच वसति असते. कार्तिकीपासून जेष्ठापर्यंत सहा महिने तेथें केवळ हिममय असतें. या हिमकाळांत भगवान् केदारनाथाच्या पंचमुखी चल मूर्तीचें पूजन उखीमठला होतें.

## शेतकरी देव केदारनाथ

केदारनाथ हें महादेवाचें नांव. त्याचा अर्थ काय ? महादेव हा महाजनांचा म्हणजे आम जनतेचा देव आहे. आम जनता वैश्य म्हणजे शेतकरी, गोवारी अशीच असल्यामुळें तिचा देवहि शेतकरी असणें स्वाभाविक आहे. केदार म्हणजे शेत आणि त्याचा स्वामी तो अर्थात् शेत–मालक, शेतकरी झाला.

महादेवाचीं इतर नांवें तो शेतकरी असल्याचेंच सुचवितात. उदाहरणार्थ, वृषभध्वज, पशुपति, खंड-परशु इत्यादि. बैलाशिवाय आणि कुऱ्हाडीशिवाय शेतकरी कसा असणार ? 'जो श्रमी त्याला काय कमी ? ' म्हणून त्याचें कोठार नेहमीं धनधान्यानें पूर्णच असणार. त्यामुळें त्याच्या गृहलक्ष्मीचें नांव अन्नपूर्णा. कोणी कितीहि धनवान् असला तरी भुकेची वेळ झाली म्हणजे त्याला अन्नपूर्णेलाच शरण गेलें पाहिजे. म्हणून तर कुबेर शिवाचा भक्त बनला आहे. असा शेतकरी व गोवळी देव अन्न आणि दूधदुभतें देऊन जगाचें कल्याण करतो. म्हणून त्याला शं-कर हें नांव मिळालें आहे. केदारनाथाचींच हीं सर्व गुण-विशेषणें आहेत. पण मूळ नांव लोपून इतर नांवेंच अधिक प्रचारांत आलीं असें म्हटलें पाहिजे. पण हा सामान्य शेतकरी नाहीं. ही संबंध सृष्टिच त्याची शेती आहे. जीवच त्याचा पशु आहे. माया अन्नपूर्णा आहे आणि ज्ञान कुठार आहे.

दुसरे दिवशीं ता. १५।५।४६ ला सकाळींच आम्हीं केदारनाथ सोडलें. मंदिर उघडावयाचें होतें. म्हणून हृन्मंदिरांत नित्य संस्फुरणाऱ्या केदारनाथाला मनोमन नमन करून आणि त्यालाच प्रदक्षिणा करून आम्ही निघालों. गौरीकुंडला ९ वाजतां पोंचलों. गौरीकुंडहून केदारनाथला चढतांना सहा तास लागले, तर उतरतांना तीन-साडेतीन तास लागले.

## संन्यासाचें सोंग व वैराग्याचें अंग

मार्गांत एक बंगाली आधुनिक संन्यासी स्वामी सेवानंदागिरी भेटले. रस्ताभर नाना विषयांवर चर्चा झाली. त्यांना इंग्रजी, संस्कृत बेताचेंच येत होतें. धर्मादि ज्ञानहि फारसें खोल नव्हतें. त्यांची एकंदर तऱ्हा पाहून "संन्यासाचें सोंग आणूं येईल सांग । वैराग्याचें अंग आणितां नये " ह्या ज्ञानदेवाच्या वचनाची आठवण झाली. खरें म्हणजे संन्यासाचें सोंगहि त्यांनीं नीट केलेलें नव्हतें. क्षौर न करतां केस राखले होते. एकभुक्ति नव्हती.

छत्री, जोडा- इत्यादि उपचार होते. ह्याचेंहि मला कांहीं वाटतें ना; पण मनांत जो बोध आणि विराग पाहिजे तो दिसला नाहीं. त्यांच्यापेक्षां त्यांचा गृहस्थ सोबती कविराज बरा होता. साहसी, कणखर, मर्द. आपल्यापेक्षां बळानें आणि बुद्धीनें जो श्रेष्ठ असेल त्या बरोबर आपण चालणार आणि बोलणार असें तो म्हणे. 'कभी दूध घना, कभी मुठ्ठीभर चना, तो कभी वह भी मना' ही म्हण त्याच्याच तोंडून मीं ऐकली. आणि तशी त्याची वृत्तिहि होती. त्यामुळें त्याचें माझ्याशीं मैत्र होतें. आणि पुढें बदरीनाथपर्यंत बहुतेक आम्ही बरोबर होतों. संन्याशी हमेशा मागेंच पडे. त्याची आणि बाया-बापड्यांची जोडी होई. कविराजला या संन्याशाचें बायांबरोबर बोलणें चालणें तीव्र नापसंत असे. पण त्याला स्वप्नांतील आदेशाप्रमाणें यात्रेंत सोबती म्हणून हा संन्याशी मिळाला असल्यामुळें त्याचा तो अनादर करीत नसे. संन्याशाचा भोजनादि खर्चहि त्यानेंच केला. अस्तु. केदारनाथला चालले्ले अगस्तमुनिचट्टी येथील मिडलस्कूलचे एक हेडमास्तरहि रस्त्यांत भेटले. अर्धा तास त्यांच्याशीं गोष्टी झाल्या. ते सेवाग्रामला वरधा-शिक्षण-पद्धति समजून घेण्यासाठीं येऊं म्हणाले. यात्रेकरूंकडून शाळेला मदत मिळविण्याच्या कामावर निघाले होते. मी त्यांना सांगितलें, तुम्ही चांगला प्रचार केल्यास दानाचा ओघ तुमच्याकडे वळेल आणि पैसा रगड मिळेल. त्यांनीं त्याप्रमाणें योग्य प्रचार सुरूहि केला आहे. उखीमठला एक संस्कृत विद्यापीठ होत आहे. त्याशीं ह्यांची स्पर्धा दिसली. संस्कृत-विद्येचें पुनरुज्जीवन व्हायला पाहिजेच. पण त्यासाठीं इतर आधुनिक शिक्षणाचा संकोच करण्याची गरज नाहीं. पण 'जुनें तें सोनें' अशी लोकांत समजूत रूढ झालेली असल्यामुळें संस्कृत विद्येसाठीं जें आर्थिक साहाय्य मिळत आहे, तें मिडल स्कूलला मिळत नसावें. पण जुन्या पुराण्यावर आतां निभाव लागणार नाहीं, हें ओळखायलाच पाहिजे. जीर्ण विचारांची कांत टाकल्याखेरीज हिंदुसमाजाला नवजीवन येणार नाहीं. मूठभर शहरी लोकांवरून सबंध समाजाची कल्पना

करणें चूक होईल. शहरी सुशिक्षित लोकांतहि पुष्कळ जीर्ण कल्पना अद्याप वसत आहेत. ग्रहणें आणि तन्निमित्त स्नानें हीं दोन्हीं कार्यें दाखवितात ? सुशिक्षितांच्या सुशिक्षेशीं हें कितपत जुळतें ?

क्र. ७९२४

## ‘हे तर गांधींचे सत्याग्रहीच दिसतात!’

केदारनाथहून गौरीकुंडला येऊन तप्तकुंडांत आम्हीं स्नानें केलीं आणि लगतच्याच कालीकमलीवाल्यांच्या धर्मशाळेंत पाक-सिद्धि करून भोजनें केलीं. थोडी विश्रांति घेऊन संध्याकाळीं फाटाचट्टीला रात्र काढली. फाटाचट्टीवर धर्मशाळेंत न उतरतां गावांत शिरल्याबरोबर लागलेल्या दुकानांत दुकानदाराच्या आग्रहावरून उतरलों. प्रथम त्यानें आम्हांला जेथें जागा दिली होती तेथून तो आम्हांला उठवून कोपऱ्यापासून आंथरुणें लावायला सांगू लागला. पण आमची ७ मैलांची चाल झालेली असल्यामुळें अगदीं थकून गेलेलों होतों, आणि त्याच्याच सांगण्यावरून तेथें आंथरुणें पसरलीं होतीं, म्हणून हलायचें नाकारलें. पुष्कळ खटपट करूनहि आम्ही हाललों नाहीं हें पाहून तो म्हणाला, हे तर जणूं गांधींचे सत्याग्रहीच दिसतात ! पण जेव्हां त्याला कळलें कीं खरोखरच मी गांधींचा माणूस आहे, तेव्हां त्याला आणि इतरांनाहि मोठी मौज वाटली आणि आमच्या या भांडणाचा शेवट गोड झाला. मग मित्रत्वानें आमच्या पुष्कळ गप्पागोष्टी झाल्या. केवळ शेती आणि दुकानदारी यांवर तुम्हां पहाडी लोकांचा निर्वाह होणें कठीण आहे. तेव्हां तुम्ही लोंकरीची कताई, मधुमक्षिकापालन, पशु-संवर्धन, गो-दुग्ध-व्यवसाय इत्यादि उद्योगधंदे करायला पाहिजेत, असें सांगितलें. आणि त्यांनाहि तें पटलें. पहाडी लोकांना उद्योगी झाल्याखेरीज गत्यंतरच नसतें. त्यामुळें ते कुठला तरी उद्योग करीत असतातच. आळसाची प्रवृत्ति खूप कमी दिसली. गढवालमधून सैन्यांत पुष्कळ जवान भरती झालेले आहेत. त्याहि मार्गानें त्यांचें जीवन चालत आहे.

## उखीमठचें उषेचें काष्ठमंदिर

दुसरे दिवशीं ता. १६-५-४६ ला नित्याप्रमाणें प्रातःस्मरण करून आम्ही निघालों. आणि दुपारचा मुक्काम भ्यूंग उर्फ भीमचट्टीला केला. दुकानदाराकडे ठेवलेलें सामान परत घेतलें, आणि भोजन व विश्रांति करून उखीमठसाठीं रस्ता चालूं लागलों. थोडा मार्ग चालून गेल्यावर नालाचट्टी लागली. येथें थोडा पाऊस सुरू झाला होता, आमचे कांहीं सोबतीहि यावयाचे होते, आणि येथून बदरीनाथचा रस्ता फुटत होता, म्हणून अर्धा तास थांबलों. गोकुलप्रसाद पंडा आमच्या सोबत होताच. त्याला बदरीनारायणाला येण्याची इच्छा होती. पण वाट-खर्च कोणीं द्यायचा ? त्याची अपेक्षा होती मीं द्यावा. पण मला तें शक्य होतें, तरी आवश्यक न वाटल्यामुळें थोडी बिदागी देऊन गुप्तकाशीला त्याला रवाना केलें. २०।२२ वर्षें वयाचा तरुण होता तो. नम्र स्वभावाचा. त्यानें आम्हांला बरी मदत केली. तो गेल्यावर आम्ही बदरीच्या वाटेनें चालूं लागलों. सुमारें १॥ मैलाचा वळणावळणाचा अवघड उतार उतरून मंदाकिनीच्या पुलावर आलों. केदारनाथपासून २४ मैलांचें हें अंतर बहुतेक उतरत गेलें आहे. येथून पुढें चढण सुरू झाली. ही चढण थोड्याशा अपवादानें थेट तुंगनाथापर्यंत सुमारें १६ मैल चढतच गेली आहे. तेथून पुढें चमोलीपर्यंत रस्ता कांहींसा समान आहे. मंदाकिनीच्या पुलापासून थोडें दूर पश्चिम तीरावर संस्कृत-महाविद्यालयाची जागा असून कांहीं बांधकामहि चाललेलें दिसलें. १॥ मैलाची बिकट चढण चढून आम्ही सहाच्या सुमारास सायंकाळीं उखीमठला पोंचलों.

सामानसुमान धर्मशाळेंत लावून आम्ही देव-दर्शनाला मंदिरांत गेलों. मंदिराच्या आवारांतच डाकघर आणि तारघरहि दिसलें. कोणी गायक हार्मोनियमवर गात होता. केदारनाथाच्याशिवाय इतरहि बऱ्याचशा देवमूर्ति मंदिरांत आहेत. बाणासुराची कन्या उषा हिचेंहि एक काष्ठमंदिर आहे.

ह्या विलासिनीचें दर्शन आम्हांला कशाला करायला पाहिजे ? मीं तर दुरूनहि नमस्कार केला नाहीं. बाणासुर शंकराचा निःसीम भक्त. त्याचें कृष्णाशीं त्या पोरीसाठीं युद्ध झालें. त्यांत प्रत्यक्ष भगवान् शंकर बाणाच्या बाजूनें लढले. शेवटीं बाणाचा पराभव झाला. इत्यादि भागवती कथा आहे. ती पुष्कळांस ठाऊक असेलच. हें स्थान समुद्र सपाटीपासून ४३०० फूट उंच असून येथें डाक-तारघर, पोलिस स्टेशन, दवाखाना, डाक बंगला इत्यादि सर्व सोई आहेत. गांव चांगला मोठा आहे आणि बाजार हि बरा आहे. येथें मला 'हिंदुस्तान टाइम्स' वाचायला मिळालें. त्रिमंत्री-शिष्टमंडळाशीं चाललेल्या वाटाघाटीचें वृत्त आशानिराशांच्या सीसॉवर आम्हांला खेळवीत होतें. धर्मशाळेंत आळंदीकडील एक गृहस्थ भेटले. ते सेवाग्राम आश्रमामध्यें सध्यां असलेल्या श्रीपति बाबांचे स्नेही. त्यांच्या सूचनेवरून सेवाग्रामला एक पत्र लिहिलें. आळंदीकरांची भेट प्रवासांत पुन्हां झाली नाहीं. रात्रीं दूध आणि बटाटे ह्यांवरच निर्वाह केला. गौरीकुंड सोडल्यानंतर मार्गांत आम्ही यात्रेची खूण म्हणून एक छान लांकडी कमंडलु आणि दोन लांकडी वाटया घेतल्या होत्या. ह्या वस्तु ओल्या लांकडाच्या असल्यामुळें वाळून तडकण्याचा संभव होता. म्हणून सरसूच्या तेलानें—इकडे सरसूचें तेलच खाण्यांत वापरतात—त्या चांगल्या चिंब करून ठेवल्या. तेल आठ आण्याचें पावभर मिळालें. जवळ जवळ हें सर्व तेल तीन लांकडी भांडयांना जिरलें. असे कांहीं उद्योग आम्हांला रात्रींच करावें लागत. रात्रीं हा उद्योग करून हरिस्मरणपूर्वक झोंपीं गेलों.

## पुन्हां एकदां चुकामूक

दुसरे दिवशीं म्हणजे ता. १७।५ ला आम्ही नित्यक्रम आटोपून सकाळीं सुमारें ५ ला निघालों. आमच्या बरोबर ते दोघे संन्यासी आणि गृहस्थ बंगालीहि होते. प्रथम आम्हांला कांहीं दूर समान मार्ग लागला. त्यानंतर

बराच उतार लागून मग चढ सुरू झाला. उताराच्या टोंकाला एक चट्टी होती तिच्यावर आम्ही प्रातराश आटोपून चढणीसाटीं तयार झालों. चढानें आमची चांगलीच कसोटी पाहिली. चढ चढून आम्ही दुपारीं ११॥ च्या सुमारास पोथीबासा चट्टीवर आलों. माझ्या सोबत दोघे बंगाली तेवढे होते. इतर साथी मंडळी मागेंच होतीं. ही चट्टी रस्त्यापासून जरा बाजूला असल्यामुळें ती मंडळी पुढें सरळ वाणियाकुण्ड चट्टीला गेलीं. मी इकडे वाट पहात राहिलों. अखेर त्यांची आशा सोडून दिली. बंगाल्यांबरोबर भोजन केलें. आणि थोडी विश्रांति घेऊन वाणियाकुण्डला दुपारीं तीन वाजतां पोंचलों. तेथें धर्मशाळेंत आई आणि मंडळी भेटलीं. आईनें भोजन केलें नव्हतें तिला खूपच त्रास झाला होता. पाऊस लागला होता. येथून पुढें पुन्हा तिला सोडायचें नाहीं असा निश्चय केला. माझी चुकामूक झाल्यामुळेंहि ती कष्टी झाली होती.

तिला शिधा-सामग्री आणून दिली तेव्हां तिनें कांहीं करून खालें. पाऊस सुरू होता. आणि आमचा एकूण कार्यक्रम बिघडला होता म्हणून रात्र वाणियाकुंडलाच काढली. वाणियाकुंड हें स्थान अंदाजें समुद्रसपाटीपासून ७ हजार फूट उंचीवर वसलेलें असून सभोंवार गगनचुंबी देवदार वृक्षांची झाडी आहे. स्थान फारच रम्य वाटलें. उंचावर आणि झाडींत वसलेलें असल्यामुळें, त्याचप्रमाणें वारंवार वृष्टि होत असल्यामुळें, येथें चांगलीच थंडी असते. आम्हांला धर्मशाळेंत तळमजल्यावर खोली मिळाली होती. आणि तिच्यांत ओलहि होती. त्यामुळें कंबलवन्त होतों, तरी रात्रीं आम्हाला शीत बाधलेंच !

## नांवाप्रमाणें उत्तुंग असलेलें तुंगनाथ

तारीख १८-५-४६ ला सकाळीं नित्याप्रमाणें आमची यात्रा सुरू झाली. पण पन्धरा मिनिटें होत नाहींत तों आमच्या मंडळींतील सिंधी म्हातारी

चंपामाई हिनें रस्त्यावरच बैठक मारली. थंडीनें तिचें अंग गारठून गेलें होतें. पण पूनमचंदजी आणि मंडळी यांना तिची काळजी घ्यायला सांगून आई व मी पुढें निघालों. दोन मैल खडी चढण चढून गेल्यावर चोपता चट्टी लागली. येथून एक रस्ता तुंगनाथला चढत जातो आणि दुसरा डोंगराच्या पायथ्यानें पुढील चट्टीला. आईला येथेंच ठेवून माझा विचार तुंगनाथला जाऊन यायचा होता. पण आईनेंहि माझ्याबरोबरच चालायचें ठरविलें. तीन मैलांची विकट चढण असूनहि ती माझ्यापासून अर्धा फर्लांग-पेक्षां अधिक मागें केव्हांहि राहिली नाहीं. आकाश मेघांनीं भरून आलें होतें. दूरवर धुकें पसरलें होतें. देवदार वृक्षांचा सुगंध सर्वत्र पसरला होता. चढण्याच्या श्रमामुळें अंगांतून घाम फुटला होता. आणि वरून झिमझिम पाऊस सुरू झाला होता. यात्रेकरू स्त्री आणि पुरुष, बाल आणि वृद्ध उठत बसत तुंगनाथाचा, केदारनाथाचा जयजयकार करीत मार्ग कापीत होते. दुपारीं सुमारें ११ च्या सुमारास आम्ही नांवाप्रमाणेंच उत्तुंग असलेल्या तुंगनाथाला पोंचलों. दुकानदारानें माडीवर गवताच्या बिछायतीवर आम्हांला बसविलें. चार ओलसर काटक्या आणून शेकोटी केली. आणि तिचा धूर खात आणि ऊब मिळविण्याचा व्यर्थ प्रयास करीत आम्हीहि थोडी विश्रांति घेतली. येथें आकाशगंगा आहे. आकाशगंगा म्हणजे डोंगरमाथ्यांतून येणारी पाण्याची एक धार आई तिचें स्नान करून आली. मी आपलें दुकानदारानें दिलेल्या गरम पाण्यानें स्नान केलें. स्नान करून आम्ही तुंगनाथाच्या लिंगाचें दर्शन घेतलें. मंदिर खुजें असून त्याचा घाट कांहींसा ओरिसांतील देवळांसारखा वाटला. हें स्थान मानस व कैलास सोडून इतर सर्व धामांपेक्षां उंच आहे. समुद्र-सपाटीपासून १२५०० फूट उंच आहे. येथून गंगोत्री, केदार आणि बदरी यांचीं गिरिशिखरें त्याचप्रमाणें हिमालयाचें एक प्रसिद्ध शिखर दिसूं शकतें. थोडा वेळ भगवान् सूर्यनारायणानें दर्शन दिल्यामुळें आम्हांला त्याचा आभास झाला, असें म्हणतां येईल. हलवायानें तयार केलेली पक्की रसोई खाऊन

विश्रांति न घेतांच आम्ही उतरायला सुरवात केली. आलों त्याच रस्त्यानें उतरलों नाहीं. उताराचा रस्ता दुसऱ्या बाजूनें २ मैल २ फर्लांग उतारच उतार आहे. आणि तोहि भयंकर. तो उतरून आम्ही खालच्या चट्टीला आलों. तेथें पूनमचंद वगैरे आमच्या सिंधी मित्रांची चौकशी केली असतां ते पुढें गेल्याचें कळलें. पण शोध करतांना बंगाली मित्र भेटले. त्यांना सोबत घेऊन आम्ही दर कोस दर मजल करीत संध्याकाळीं अगदीं थकले भागलेले मंडलचट्टीला कालीकमलीवाल्यांच्या धर्मशाळेंत पोंचलों. तेथें पूनमचंद आमचें स्वागत करायला हजर होतेच. चंपामाईची भेट घेतली. तिची प्रकृति चांगली होती. तिला केवळ शीत-बाधा झाली होती. अग्नीची उपासना केल्यावर ती दूर झाली आणि ती सिंधी मित्रांबरोबर येथें आली. ती चांगली आहे हें पाहून मला हायसें वाटलें. रात्रीं एकमेकांच्या हकीकती ऐकून आणि ईश्वराचे आभार मानून आम्ही झोंपीं गेलों.

## 'लालसांगा' चमोलीहून गरुडगंगाचट्टीस

दुसरे दिवशीं ता. १९-५-४६ ला नित्याप्रमाणें सकाळीं निघून दुपारीं अकराच्या सुमारास आम्ही चमोलीला धर्मशाळेंत पोहोंचलो. मार्गांत आम्हांला विशेष श्रम झाला नाहीं. शेवट शेवट थोडा रस्ता अलकनंदेच्या काठानें गेला. पुढेंहि येथून अलक-नंदेच्या कांठानेंच जावयाचें होतें. अलक-नंदेचा पूल ओलांडून चमोलींत प्रवेश होतो. हा पूल लाल रंगाचा म्हणून चमोलीला लाल-सांगा असें एक नांव पूर्वी प्रचारांत होतें. सांगा म्हणजे पूल. हें चांगलें मोठें शहर असून येथें सर्व सोई-मोटाररस्ता, तारघर, डाकबंगला, पोलीस-स्टेशन, दवाखाना, हायस्कूल इत्यादि आहेत. हें समुद्र-सपाटीपासून ३१५० फूट उंच वसलें आहे. येथून बदरीनाथ ४७ मैल असून हा सबंध रस्ता एकंदरींत चढत गेला आहे. आज दुपारीं आम्हीं प्रवास न करतां कपडे धुणें आणि विश्रांति घेणें यांतच वेळ काढला.

पाऊस असल्यामुळेंहि जाणें शक्य नव्हतेंच. यात्रेंत ठिकठिकाणीं पाणी जरी मिळत असलें, तरी सर्वत्र धुण्याची सोय नसते आणि असली तरी ज्यांना दोन्ही वेळां चालायचें असतें त्यांना कपडे वाळवायला अवकाश कुठला ? यात्रेंत आमचे कपडे बेहद्द मळले आणि घामटले होते. मला सदोदित कापडी बाइंडिंगमधें राहण्याची संवय नसल्यामुळें आणि यात्रेंत पैशाच्या जोखमीमुळें बंडी नेहमीं अंगांतच ठेवावी लागायची त्यामुळें पुढें परततांना माझ्या कपड्यांत व अंगावरहि लाजिरवाण्या उवा झाल्या होत्या. तथापि त्याचें मुख्य कारण संगति-दोषच असावा. कारण स्वच्छतेच्या बाबतींत मी शक्य ती काळजी घेतच होतों. 'सारस्वत' असल्यामुळें सरस्वतीप्रमाणें मीहि शुभ्र वस्त्रावृतच. आणि शुभ्र वस्त्र असतें बोलकें. "मी मळलों, मला धू" असें बजावल्याशिवाय तें रहात नाहीं.

दुसरे दिवशीं ता. २०-५-४६ ला प्रातःकृत्य आटोपून नारायणाच्या दर्शनासाठीं उत्सुक, आदले दिवशींच्या विसाव्यानें ताजेतवाने झालेले, मोठ्या हुरुपानें निघालों. अलकनंदेचा पूल पार करून रस्त्याला लागलों. किती तरी सहयात्री होते. आणि दुसरें कोणी नसलें तरी अलंकानंदा तर होतीच ना सोबतीला ! तिचा नागमोडी स्वैर प्रवाह, तिच्यांतील म्हशाप्रमाणें बसलेले प्रचंड शिलाखंड, तिचा अखंड निदान आणि तिचें हरिपादरजोपहारी निर्मल जल—सर्वच कांहीं रमणीय आणि पावन होतें. नारायणाचें स्मरण आणि तिचें दर्शन करीत – स्पर्शन करायला ती फारच खोल होती – आम्ही मार्ग आक्रमीत होतों. दर्शन करून परत निघालेले आणि दर्शनाला चाललेले यात्रेकरू 'जय बदरी-विशाल-लालकी जय' म्हणून एकमेकांना उत्साहित करीत होते. घोड्यांवरून आणि मेंढरांवरून लमाणासारखे लोक मालाची वाहतूक करीत होते. त्यांच्यांतून पुष्कळदां मार्ग काढणें बिकट होई. मधून मधून भूतानचे (म्हणजे भूत-स्थानचे) रहिवासी भोटिये लोकहि भेटत.

परंतु सर्वांत जास्त जर कांहीं वारंवार दृष्टीला पडत असेल तर ती म्हणजे 'शुद्ध शिलाजित' ची इंग्रजी, उर्दू आणि हिंदी जाहिरात. ह्या जाहिरात-वाल्यानें मोक्याची अशी एकहि जागा मला नाहीं वाटत वायां जाऊं दिली असेल ! ही जाहिरात थेट बद्री नारायणाच्या देवळापर्यंत लावलेली होती. मला वाटलें, बहुतेक हा लोभी जाहिरातदार देऊळ आणि देव ह्यांना देखील सोडायचा नाहीं. मूर्तीच्या कपाळावरच झक जाहिरात चिकटवून दिली असती म्हणजे छान झालें असतें ! प्रत्येक यात्रेकरूला—अर्थात् आंधळे सोडून—ती पाहणेंच भाग पडलें असतें. असो. दुपारीं ११ ला आम्हीं पीपल कोठीला स्नान भोजनादि करून विश्रांति घेतली आणि ४ मैल रस्ता कापून रात्रींचा मुक्काम गरुडगंगाचट्टीवर केला.

## दिल्लीचे एक हौशी प्रवासी

येथें एक दिल्लीचे बाला नांवाचे जंटलमन भेटले. ते यात्रेकरू नव्हते. ते एक हौशी प्रवासी होते. त्यांच्याशीं धर्म, समाज, अर्थ, राष्ट्र, स्वराज्य इत्यादि विषयांवर इंग्रजींतून आणि कांहीं हिंदींतून चांगली चर्चा झाली. त्यांच्या मतें वेदकालीन आर्य हे साम्राज्यवादी होते. त्यांनीं अनार्यांवर म्हणजे मूळच्या हिन्दुस्थानच्या प्रजेवर आपली सत्ता आणि संस्कृति लादली आहे. परलोक वगैरे ते मानत नव्हते. मनुष्य मेला कीं संपला. आपल्या संततीच्या रूपानेंच काय तो मरणोत्तर जगतो म्हणतां येईल. त्यानें समाज-हितासाठीं आपला देह वेंचावा. हाच त्याचा मोक्ष. असें त्यांचें धर्मविषयक मत होतें. आणि सदरप्रमाणेंच इतर बाबतींत. मीं त्यांना सांगितलें कीं अशाप्रकारें वेदाचें अध्ययन हें सामाजिक दृष्टीनें होऊं शकतेंच. पण आम्हांला वेद पूज्य आहे तो कांहीं त्या काळचा इतिहास वा समाजस्थिति जाणण्याचें साधन म्हणून नव्हे. घुसळून लोणी व ताक अलग होतात. ताक पुष्कळच होतें आणि तेंहि चांगलेंच आहे. पण सारग्राही मनुष्य तर नवनीतच घेईल.

वेदांचें सार आत्मज्ञान आहे, धर्मज्ञान आहे. ही अध्यात्मविद्या सोडून वेदांत अवांतर गोष्टींचा शोध करणें म्हणजे वाण्याच्या दुकानीं खिळे मागण्यासारखें आहे. शिवाय आजची एखादी कल्पना घेऊन—उदाहरणार्थ मार्क्सवाद--तिच्या दृष्टीनें वेदाची मीमांसा करीत बसणें असमंजसच म्हणावें लागेल. सदर प्रमाणें इतर बाबींवरहि माझें म्हणणें त्यांनीं ध्यानपूर्वक ऐकून घेतलें आणि तें जरी त्यांनीं कबूल केलें नाहीं तरी तें त्यांना चिंत्य खासच वाटलें. विनोबा, गांधीजी ह्यांच्याविषयींहि चर्चा झाली आणि विनोबांनीं धर्म-विषयावर लिहिण्याऐवजीं आर्थिक, सामाजिक, राष्ट्रीय इत्यादिविषयीं लिखाण करावें, असें त्यांनीं सुचविलें. स्वराज्यशास्त्र आणि अनेक स्फुट लेख ह्यांमध्यें त्यांनीं त्या विषयांचा परामर्श घेतला असला तरी त्यांचें म्हणणें मला उपादेय वाटलें. पण मला उपादेय वाटून उपयोग काय ? एकेकाचा एकेक स्वभाव ठरलेला असतो. आणि ' स्वभावस्तु प्रवर्तते '. ही स्वाभाविक प्रवृत्ति कोण कशी थांबविणार ? आणि खरोखरच थांबविण्याची गरज तरी काय ? सिंहानें गर्जना करावी हेंच उत्तम. त्यानें मांजरीप्रमाणें म्यॉंव म्यॉंव केलेलें आपल्याला तरी आवडेल का ? असो. अशा प्रकारें आमची बरीच चर्चा झाली. त्यांनीं आपल्या जवळील हिमालयाच्या या भागाचा एक उत्तम नकाशाहि दाखविला आणि आपण लोकपाल, हेमकुंड, पुष्पदरी, दुर्मीताल वा गोणाताल पाहणार आहोंत, असें सांगितलें. त्यांची इच्छा मीं त्यांच्याबरोबर या स्थळीं यावें अशी होती. मला शक्य झाल्यास पाहूं म्हणून मीं त्यांना सांगितलें. रात्रीं भोजन त्यांचेकडेच झालें.

## वैशिष्टपूर्ण व अभिमानी बंगाल

भोजनानंतर थोडा वेळ आपल्या बिन्हार्डी धर्म-शाळेच्या तळमजल्यावर येऊन एका बंगाली वैराग्याकडून रामप्रसाद ह्या बंगाली भक्त-कवीचें कालीमातेवरील एक बहारदार पद ऐकलें. रामकृष्ण परमहंसांना रामप्रसादाचीं

भजनें फार आवडत. भजनाचा अर्थ तर सुन्दर होताच, पण वैराग्यानें तें गाइलेंहि अतिशय भावपूर्णतेनें. बंगाली गायनपद्धति ही हिंदुस्थानी गायन-पद्धतीहून ह्या दृष्टीनें खरोखरच सरस आहे. बंगाल्यांची संस्कृति ही सर्वच बाबतींत स्वतंत्र आहे. त्यांची लिपी, त्यांची उच्चारपद्धति, त्यांचें काव्य आणि साहित्य, त्यांचें संगीत आणि चित्रकला, त्यांचा स्वतंत्र बंगाली सन आणि पंचाग, त्यांचा आहार आणि विहार सर्वच वैशिष्ट्यपूर्ण असून त्याबद्दल त्यांना अभिमान वाटत असल्यास नवल नाहीं. आधुनिक काळांत बंगालमध्यें जितके थोर पुरुष अनेक क्षेत्रांत होऊन गेले, तितके दुसऱ्या कोणत्याहि प्रांतांत झालेले नाहींत. तथापि त्यांना 'ग' ची बाधा झालेली आहे, त्याचें मात्र वाईट वाटल्यावांचून राहत नाहीं. त्यामुळेंच कीं काय कोण जाणे, त्यांच्यावर एका मागून एक अनेक संकटें येतच आहेत. असो, ह्या काशी–निवासी एकपाद साधूची रजा घेऊन हरिस्मरणपूर्वक देह शय्येच्या स्वाधीन केला, आणि झोंपीं गेलों.

दुसरे दिवशीं ता. २१-५-४६ ला आम्हीं गरुडगंगा सोडली. गंगा हें एक सामान्य नांवच झालें आहे. कोणतीहि नदी असो तिला गंगा म्हण-ण्याचा रिवाज पडला आहे. मुख्यतः गंगेविषयींची आणि एकूण सर्वच प्रवाहांविषयींचीहि पवित्र भावना हेंच त्याचें मुख्य कारण आहे. रोज आपणांस परम पवित्र गंगेचें स्नान घडावें अशी भावना असल्यामुळेंच आपण आपल्या स्नानाच्या टबाला 'गंगाळ' म्हणजे गंगालय असें नांव ठेवलें आहे. शिवाय व्युत्पत्तीनेंहि गंगा नदी हें समीकरण जुळणारें असेंच आहे. नदी म्हणजे नाद करणारी आणि गंगा म्हणजेहि गं गं असा गोंगाट करीत जाणारी, अर्थात् नदीच. गंगा शब्द ध्वन्यनुकरणात्मक आहे. नदी शब्द नद् धातूपासून व्युत्पादिलेला आहे, इतकाच फरक.

गरुडाचें इकडे बरेंच माहात्म्य आहे. पुष्कळ ठिकाणीं त्याचीं मंदिरेंहि आढळलीं. लोकांत ' गरुड भगवान् की जय ' असा जयजयकार करण्याची चालहि आहे. आणि ती योग्यच आहे. गरुडध्वजाच्या दर्शनाला जायचें तर गरुडाचा जयजयकार केलाच पाहिजे ! नदीमात्र गंगा, त्याप्रमाणें ' प्रयाग ' हा शब्दहि संगममात्रासाठीं रूढ झाला आहे. इकडे कितीतरी प्रयाग आहेत. मग त्यांच्या कांठीं एकही याग झालेला का नसेना ? असो.

## मेहतरापासून पंड्यापर्यंत दिसणारा भीकमागेपणा

गरुडगंगा सोडून आम्ही ८ मैल मार्ग कापला आणि हेलंग वा कुमारचट्टीला ११ वाजतां येऊन पोंचलों. स्नान–भोजनादि आटोपून थोडी विश्रांति घेतली आणि जोशीमठला सायंकाळीं ६ च्या सुमारास पोंचलों.

मार्गांत बदरीनाथाचा डंका वाजवून ४ पैसे मागणारे लोक, हलक्या आवाजांत 'पाई-पैसा दो' म्हणून मागणारीं चट्ट्यांवरील मुलें आणि क्वचित् ' तुम्हारे पूजनको भगवान् बना मन मंदिर आलीशान ' एवढा चरण गाऊन आणि नाचून पैसे मागणाऱ्या स्त्रियाहि आढळल्या. हा प्रकार याच भागांत आढळला, असें नव्हे. तो इकडे सर्वत्रच आम रिवाज दिसला. हा भीक-मागेपणा मेहतरापासून तों पंड्यापर्यंत बोकाळला आहे. प्रत्येक चट्टीवर जिल्हा कौन्सिलनें वा प्रांतिक सरकारनें मेहतरांची नेमणूक केलेली आहे. त्यांना रहायला एक सुरेख पक्कें घर बांधून दिलेलें आहे. मासिक ३० ते ५० रुपये पगार आहे. आणि इतक्या उपर हे लोक प्रत्येक यात्रेकरूकडून दोन दोन चार चार पैसे वसूल करीत असतात. कांहीं देतात, कांहीं देत नाहींत. पण कित्येक ठिकाणीं तर हे मेहेतर पैसे दिल्याखेरीज शौचालाच जाऊं देत नाहींत, असाहि अन्याय आढळून येतो. मी अर्थातच कोणालाहि पैसा दिला नाहीं. मी त्यांना सांगें, "बाबांनो, तुम्ही चांगले पेशेवाले लोक आहां, असा भीकमागेपणा काय करतां ? हें तुम्हांला शोभत नाहीं. तुम्हांला पगार पुरत

नसेल तर तुम्हीं हें काम स्वीकारूं नका. अथवा अधिक वेतनासाठीं झगडा. त्यांत तुम्हांला आम्ही सहानुभूति दाखवूं आणि शक्य तें साहाय्यहि देऊं." पुष्कळांस हें पटे आणि ते मागत नसत. पण यात्रेकरूंनीं खोट्या धर्मभावनेनें अथवा तात्पुरत्या सोईसाठीं असल्या सेवेकरी लोकांना आणि इतरहि पहाडी लोकांना लांचखाऊपणा आणि भीकमागेपणा शिकविला आहे.

## 'केरसुणी खापर खोरें धन्य धन्य हीं अवजारें'

चट्टीवर आणि मार्गांत पाण्यासाठीं सरकारनें दुरून नळ आणलेले आहेत. त्यांना तोटी नसते आणि २४ तास पाणी वाहत असतें. कित्येक नळ हजार आणि त्याहूनहि अधिक फूट लांबीचे, केव्हां केव्हां डोंगर–माथ्यावरूनहि आणलेले असतात. त्यांतून नैसर्गिक स्रोतांचे स्वादु, शीतल, निर्मल, पहाडी जल अष्टौ प्रहर वाहत असतें. प्रत्येक चट्टीवर 'फ्लॅग्ड एरिया' म्हणजे (लाल) झंडयांनीं निश्चित केलेली जमिनीची पट्टी स्त्रियांसाठीं आणि पुरुषांसाठीं अशी अलग अलग निर्धारित असते. येथील मळ-सफाई भंगी करीत असतो. चट्टीच्या सडकाहि तो झाडून साफ ठेवतो. ही सफाईची व्यवस्था नसती तर किती भयानक गलिच्छता पसरली असती, सांगवत नाहीं. ही व्यवस्था असूनही पहाडी लोकांच्या आणि यात्रे-करूंच्याहि जेथें तेथें थुंकण्याच्या आणि असल्याच इतर अमंगल संवईमुळें चट्टयांवर अतोनात माशा असतात. त्यांच्यामुळें मनुष्य पिसाळून जातो. मळमूत्र, थूंकपिंक, खरकटेंबरकटें इत्यादि जर कोरडया मातीनें झांकलें गेलें आणि कोणताहि खाद्य पदार्थ जर माशांना बसायला उघडा सांपडला नाहीं, तर माशांचा हा उपद्रव पुष्कळच सह्य होईल. पण असल्या सदुप-देशाला त्याचा अतिक्रम झाला असतां प्रत्यक्ष दंडाचें भय असल्याखेरीज पुसतो कोण ? रोगादिकांचा दंड होतच असतो; पण तो सामान्य माणसाला दिसत नाहीं. आणि त्यामुळें तो असा दंड खुशाल वारंवार ओढवून घेत

असतो. आचार-हीन मनुष्य नंदन-वनांत गेला तरी तेथेंहि तो घाण करून ठेवल्याखेरीज रहायचा नाहीं. उलट मलमूत्राच्या शास्त्रीय विल्हेवाटीचा जाणकार नरकाचेंहि नंदनवन करूं शकेल. "केरसुणी खापर खोरें । धन्य धन्य हीं अवजारें" असें जें सेनापति बापटांनीं गाइलें आहे, त्याचा अर्थ हाच. नंदनवन निर्मिण्याचें सामर्थ्य त्या औजारांत आहे, म्हणून तीं धन्य. नुसतीं धन्य नाहींत; तर 'धन्य, धन्य' !

## आद्य शंकराचार्यांचें ज्योतिष्पीठ

जोशीमठ गांवाजवळच रस्त्यांत 'ज्योतिष्पीठस्य मार्गः' म्हणून पाटी दिसली. म्हणून त्या आडवाटेनें शेतें तुडवून उंचावर वसलेल्या जोतिष्पीठाला गेलों. तेथें आद्य शंकराचार्यांनीं ज्या वृक्ष-मुळाशीं बसून तपस्या केली तो वृक्ष आणि त्यालगत असलेलें त्यांचें एक छोटेसें शिवालय पाहिलें. "श्रुति-स्मृति-पुराणानां आलयं करुणालयम् । नमामि भगवत्–पादं शंकरं लोक-शं-करम् । " म्हणून दंडवत् नमस्कार घातला आणि क्षणभर बसून ब्रह्मतेजानें झळकणारी त्यांची निःशेष-जाड्यापहा मूर्ति चित्त-चक्षूंसमोर आणिली. त्यांनीं अधर्म आणि विधर्म यांचें भारतावर आलेलें परचक्र परतवून स्वधर्म दिग्-विजयी केला. अधर्माचें वा विधर्मांचें आक्रमण पुन्हां होऊं नये म्हणून, आणि हें प्रवर्तिलेलें स्वधर्म-चक्र अखंड चालावें म्हणून, चारी दिशांत चार मठ स्थापिले. वैदिक मार्गाला लोपवून टाकणारी नास्तिक वादांचीं जंगलें तोडून आम जनतेसाठीं तो मार्ग निष्कंटक केला. हें त्यांचें धर्मस्थापनारूप महनीय चरित्र चिंतिलें. आणि भारतांत सर्वत्र व भारता बाहेरहि भरून राहिलेला, त्यांनीं गाजविलेल्या वेदान्त-डिंडिमाचा 'ब्रह्म सत्यं, जगन् मिथ्या । जीवो ब्रह्मैव नापरः ॥ हा ब्रह्म-कटाह-भेदी आणि हृदय-वेधी घोष जणूं प्रत्यक्ष श्रुतिगोचर झाल्याप्रमाणें

पुलकित होऊन उठलों. जवळच जगन्मातेचें त्यांनींच स्थापलेलें एक मंदिर पाहिलें. शंकराचार्यांचें ' कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ' ह्या पालुपदाचें एक देव्यपराध-क्षमापन स्तोत्र प्रसिद्ध आहेच. त्यांत त्यांनीं आपण पंच्यांशीं वर्षांचे होऊन चुकलों आहों असें म्हटलें आहे. परंतु लोकांत तर शंकराचार्य बत्तीसाव्या वर्षीं समाधिस्थ झाले, अशी प्रसिद्धि आहे ! ह्यावरून सदर स्तोत्र आद्य शंकराचार्यांचें नसावें असा ऐतिहासिकांचा अभिप्राय आहे. 'जिविषेच् छतं समाः ' इत्यादि श्रुति-वचनें मानणारे शंकराचार्य, योगीश्वर शंकराचार्य, ज्ञानी शंकराचार्य इतक्या अल्पवयांत समाधि घेतील हें संभवनीय वाटत नाहीं. संभवनीय हें वाटतें कीं, ते १३२ वर्षांचे होऊन समाधिस्थ झाले असावे. ते कुठल्या तरी रोगानें अकालीं मेले असें मानणें तर चूकच होईल. अस्तु.

मंदिराच्या पिछाडीस एक वर्ग चाललेला होता. ९।१० वर्षें वयाचीं पहाडी ब्राह्मणांचीं ८।१० मुलें लघुकौमुदी शिकत होतीं. सहज त्यांची चांचणी पाहण्याच्या दृष्टीनें सर्वनाम-शब्द विचारले. पुस्तकांत छपाईच्या दोषामुळें 'भवत्'चें 'भवनू' झालें होतें. त्यामुळें त्यांनीं तसेंच पाठ केलें होतें. त्यांना ती चूक दाखवून व गुरुजींची पाहून पुढें ज्योतिष्पीठांत गेलों. ज्योतिष्पीठ म्हणजे एक मोठी इमारत असून तिच्यांत ह्या उत्तरेकडील शंकरमठाची गादी आहे. पीठाधीश संन्यासी प्रयागाकडे गेले होते. बहुतेक ते तिकडेच राहतात; त्यांचे दोन सहाध्यायी वृद्ध पण मस्त संन्यासी मात्र तेथें होते. त्यांना कार्यक्रम विचारला असतां तो त्यांनीं सरळपणें सांगितला नाहीं. जानवें न घालणारे, अस्पृश्यता न पाळणारे, आम्ही तो ऐकायला पात्र नव्हतों ! सदर संन्यासी सेवाग्रामला येऊन गेलेले होते. मठांत एकूण चैतन्य आढळलें नाहीं. संन्याशांचीहि छाप चांगली पडली नाहीं. ' नमो नारायणाय ' करून मठ सोडला. मुलांनीं दाखविलेल्या जवळच्या वाटेनें

जोशीमठ गांवाला निघालों. जातांना मठापासून थोड्याच अंतरावर डाक-बंगला लागला. आमचे मित्र बाळासाहेब हिंडत होते. त्यांनीं हांक मारल्या-वरून तेथें गेलों. त्यांचा आग्रह मी तेथें थांबावें असा होता. पण इतर मंडळी पुढें धर्मशाळेंत उतरली असतील त्यांच्याकडे जाणें जरूर आहे असें सांगून मीं तें नाकारलें. थंडी चांगलीच होती. कांहीं गरम पेय मिळाल्यास हवेंच होतें. त्यांनीं आपल्या नोकराला चहा करायला सांगितलें. आणि मला घेण्याबद्दल विनंती केली. मी चहा घेत नव्हतों आणि गोसेवा-संघाचा सभासद म्हणून गव्येतर दुग्ध आणि दुग्धजन्यें न खाण्याचा माझा नियम होता. मित्राच्या आग्रहामुळें, परिस्थितीच्या दाबामुळें अर्थात् आवश्यकते-मुळें आणि नियमांत असल्या प्रसंगीं कांहींशी सूट असल्यामुळें मी रुकार भरला. 'यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान् बुधः' हें वचनहि माझ्या डोळ्यासमोर होतेंच. बुध म्हणजे विवेकी पुरुषाला नियम आणि त्याचे अपवाद ओळखतां यायलाच पाहिजेत. तसा हा हिमालयांतील प्रवास मला अपवादाचा प्रसंग वाटला. सर्व व्रतें, वैकल्यें आणि नियम मनोनिग्रहरूपच होत. तो साधल्यावर, तसा आत्मविश्वास उत्पन्न झाल्यावर, मग नियमांचें नियमत्व अर्थात् गुलामगिरी उरत नाहीं. 'विधेयात्मा प्रसादं अधिगच्छति' ह्या भगवदुक्तीचा तरी अर्थ हाच आहे. अस्तु.

## बाळासाहेबांच्या चहाचें प्रीतिपान

आम्ही डाकबंगल्याच्या जाळीदार अर्थात् निर्मक्षिक दालनांत टेबलाशीं गोष्टी बोलत बसलों होतों. बाळासाहेबांच्या नोकरानें ट्रे आणून ठेवला. चिनी मातीच्या तोटीदार भांड्यांत चहाचें उकळतें पाणी होतें आणि दुधाचा व साखरेचा असे दोन डबे होते. दुधाचा डबा पाहून मला जरा नवल वाटलें. बाळासाहेब म्हणाले, मी असल्या प्रवासांत 'कन्डेन्सड् मिल्क' चे आणि इतर खाद्य पदार्थांचे डबे बाळगतो. बाहेर मिळणाऱ्या दुधाच्या

शुद्धतेविषयीं खात्री नसते. हें दूध ऑस्ट्रेलियांतून आलेलें असलें तरी गाईचें आहे. एक छोटा चमचा चहाला पुरें होईल. असें म्हणून त्यांनीं मला चहा तयार करून दिला. साखरहि पिठी आणि त्यांनीं मुद्दाम आपल्यासाठीं तयार करवून आणलेलीच होती. प्रीतीशिवाय वाटसरला असा आग्रह कोण करणार ? आणि असा आग्रह कोण मोडूं शकेल ? "ददादि प्रतिगृह्णाति, गुह्यं आख्याति पृच्छति । भुङ्क्ते भोजयते चैव, षड्विधं प्रीति-लक्षणम्" म्हणतात. तीन कप चहाचें प्रीतिपान करून उठलों. उठतां उठतां त्यांनीं मला आपण उद्यां बदरीला न जातां घाटचट्टीपासून फुटणाऱ्या वाटेनें लोकपाल, हेमकुंड, पुष्प-दरी हीं स्थळें पहायला जाणार असें सांगितलें. लोकपाल हें शिखांचें तीर्थक्षेत्र असून मागील अवतारांत गुरुगोविंदसिंहानें तेथें तपश्चर्या केली होती अशी आख्यायिका आहे. हें स्थळ अतिशय सुन्दर असून तेथें हिम बहुतेक ९।१० महिने असतें. पुष्प-दरी जगत्-प्रसिद्ध असून जगांतील कांहीं नामांकित वनस्पतिशास्त्रज्ञ तेथें येऊन गेले आहेत, म्हणतात. अस्तु. मी तेथून निघून सरळ धर्मशाळेंत पोंचलों, तेथें आई आणि मंडळी केव्हांचीच येऊन बसलीं होतीं, आणि माझी वाट पहात होतीं. मी आधीं पोंचायचा तो उशिरा आलों. त्यामुळें तीं मजवर जरा नाराजलीं होतीं. मीं त्यांना शंकराचार्यांचा ज्योतिष्पीठ नामक मठ पाहिला वगैरे सांगितलें, तेव्हां तीं किंचित् शांत झालीं. त्यांनाहि पहायचा होता, तो परततांना दाखविला.

जोशीमठ हा गांव समुद्र-सपाटीपासून ६००० फूट उंचीवर वसला असून डाकघर, दवाखाना इत्यादि सर्व सोई येथें आहेत. अर्थात् गांव चांगला मोठा आहे. येथें नर-नारायणाचें सुवर्ण-कलश-मंडित मंदिर असून शेजारींच उद्धव, गरुड आदि भक्तमूर्तिहि आहेत. इतरहि देवतांचीं मंदिरें जवळच आहेत. शीत काळांतील बदरी-नाथाचें हेंच वास्तव्यस्थान आहे. अर्थात् हिमकाळांत त्याच्या चल मूर्तीची पूजा येथेंच होते. येथून कैलास,

मानस या तीर्थक्षेत्रांना जाण्याचा एक रस्ता, नीतिघाटा नामक, फुटतो. या स्थळांना जाणारे मला एक कीं दोन तरुणच भेटले. अस्तु. भोजनोत्तर हिशोब वगैरेचीं टिपणें करून आणि प्रार्थना करून आम्ही झोपीं गेलों.

## अलकनंदेची चंद्रप्रकाशांतील अद्भुत शोभा

दुसरे दिवशीं ता. २२।५।४६ ला नित्यक्रम आटोपून आम्ही निघालों. वाटेंतच मंदिर होतें. नरनारायणाचें दर्शन घेतलें. गांवापासूनच रस्ता उतरणीचा लागला. उतार उतार आणि भयंकर उतार ! दोन मैलांचा झिगझॅग उतार उतरून आम्ही १५०० फूट खालीं विष्णुप्रयाग तीर्थाला आलों ! येथें विष्णुगंगेचा अलकनंदेशीं संगम झाला आहे. घाटावर विष्णु मंदिर आहे. संगमापर्यंत उतरणें जपूनच करावें लागतें. संगमांत स्नान करणें त्याहूनहि कठिण. चट्टी नांव घेण्याजोगी नाहीं. दोन कीं तीन दुकानें आहेत. आईचें स्नानादि झाल्यावर आणि आमचें दुग्धपानादि झाल्यावर आम्ही पुढें निघालों आणि उतरलों तितकेंच उंच चढून ११ च्या सुमारास पांडुकेश्वरास पोंचलों.


पांडुकेश्वर हें ६००० फूट उंचीवर वसलेलें असून साधारण बरें गांव आहे. येथें योगबदरी व वासुदेव यांचीं दोन मंदिरें आहेत. मंदिरें जुनाट दिसतात. त्यावर एक पुसट शिलालेखहि आहे. जवळच अलकनंदेच्या पार शतशृंग पर्वतावर पांडु राजानें निवास केला होता आणि ऋषींचा शाप त्याला येथेंच झाला, अशी आख्यायिका आहे. अस्तु. दुपारची रसोई आणि भोजन करून आम्ही थोडी विश्रान्ति घेतली आणि निघालों. चढ अवघड होत चालला होता. पावसाचाहि रंग होता. थंडी वाजत होती. परन्तु नारायणदर्शनाच्या लालसेपुढें ह्या सर्व अडचणींचें कांहींच वाटत नव्हतें. हनुमान चट्टीवर रात्रींचा मुक्काम ठरला होता. तिला पोंचण्याच्या आधींच पाऊस सुरू झाला. नारायण स्मरणानें आंतून आणि पावसानें वरून भिजत भिजत आम्ही ६

वाजतां हनुमान् चट्टी गांठली. आई थंडीनें गारठून गेल्यासारखी झाली होती. तिला गरम गरम काढा आणून दिला आणि मीहि प्यालों. धर्मशाळेंत यात्रिकरूंची दाटी झाली होती. अलकनंदेच्या अगदीं काठींच धर्मशाळा. खोलींतून धर्मशाळेच्या मागच्या बाजूस अलकनंदेचे शतशः लहान-मोटे प्रपात दिसत होते. अलकनंदा येथें 'दृपद्'-वती दिसत होती. खडकांच्या असंख्य डोक्यांवरून तिचा प्रवाह पडत होता. तिची शोभा अद्भुत दिसत होती. "हे ऽ लकनंदे परमानंदे, कुरु मयि करुणां पादं वन्दे" असें गुण-गुणत मी तिच्या सौंदर्य-सागरांत पोहत होतों. रात्रींचा अंधार तिचें सौंदर्य झांकत होता. पण तारा-प्रकाशांत तें फांकतच होतें. आणि पहाटेच्या पूर्वीं चंद्राच्या चांदण्यांत तर त्याला नुसता बहर आला होता. अस्तु. रात्रीं भोजनोत्तर 'नारायण करुणामय शरणं करवाणि तावकौ चरणौ' म्हणून आम्ही झोपीं गेलों. उद्यां नारायणाचें दर्शन होणार या मनोरथपूर्तीच्या हर्षाचें आखात मनांत इतकें खोल गेलें होतें कीं, पुष्कळ वेळपर्यंत झोपच लागली नाहीं. हळूहळू नारायणानें आपली माया पसरवून विश्रान्ति दिली.

## डोंगर-माथ्यावरील बदरीनाथ

दुसरे दिवशीं ता. २३।५।४६ ला उठलों तों मनांत रात्रींचाच वेध होता. 'वालीन लोटांगण वंदीन चरण । डोळां मी पाहीन रूप तुझें' अशी उत्कंठा लागली होती. प्रातःस्मरणादि नित्यक्रम आटोपून चालूं लागलों. मनांत 'नारायण करुणामय शरणं करवाणि तावकौ चरणौ' ही षट्पदी रुंजी घालीत होती. आम्हांला फक्त पांचच मैल जावयाचें होतें. रस्ता मधून मधून बराच संकुचित होत होता. एका बाजूला नदी आणि दुसऱ्या बाजूला कडा. त्यांत पुन्हां मेंढ्यांचे कळप आणि मालानें लदलेले घोडे चालायचे, त्यामुळें केव्हां केव्हां अडचण होई. जातां जातां अनेक ठिकाणीं

अलकनंदा हिमावरणांतून पसार झालेली दिसली. हिमाचा ५।७ फुटांचा तरी जाड थर असेल. कोठें कोठें तो भंगला होता. कोणी साहस करून



बद्रीनाथ देवालयाचें महाद्वार

या तीरावरून त्या तीराला हिमाच्या झोलदार पुलावरून चालत जाऊं

शकता. मध्यंतरीं एक चहाचें दुकान लागलें. तेथेंच प्रातराश केला. चहा म्हणजे बिनदुधाचा गरम चहा घेतला. येथून एकाध मैल पुढें डोंगरमाथ्यावर आल्याबरोबर बदरीपुरी दिसूं लागली. सूर्यप्रकाश स्वच्छ होता. आकाश जवळ जवळ निरभ्र होतें. मंदिराचा सुवर्ण-कलश झळकत होता. परंतु दूर असल्यामुळें अगदीं स्पष्ट दिसत नव्हता. मनोमन साष्टांग दण्डवत घातला आणि किंचित् काळ वैकुंठलोकीं गेलों. परत आल्यावर पाय चालूं लागले. घरें दिसूं लागलीं. माणसें वाढूं लागलीं. अलकनंदेचा पूल लागला. पूल पार करून पुढें गेलों तों पुढें जवळच ऋषिगंगेचा छोटा पूल लागला. तो ओलांडला आणि बदरीनाथपुरींत आम्ही ९ वाजतां प्रविष्ट झालों.

आलेल्या यात्रेकरूंचें स्वागत करायला पंडे तयारच होते. कृपाशंकर पंड्याकडे आम्हांला जायचें होतें. तो हजर नव्हता म्हणून दुसऱ्या एका पंड्याकडे बंगाली मित्रांसह उतरलो. मागाहून कृपाशंकरजींनीं आम्हांला आपल्या घरीं नेलें. देवप्रयागहून श्रीलाल थपल्याल यांनीं आमच्याविषयीं त्यांना पत्र लिहिलें होतेंच.

## ' अद्य मे सफलं जन्म अद्य मे सफलाः क्रियाः '

प्रथम आम्हीं स्नानाची तयारी केली. बाजार-ओळ ओलांडून मंदिरासमोर गेलों. मंदिराच्या अगदीं समोरच खालीं कांहीं पायऱ्या उतरून गेलें असतां तप्तकुंड लागतें आणि जवळच अलकनंदा. आम्हीं प्रथम गरम पाण्यानें आपले कपडे धुतले आणि स्नानासाठीं तप्तकुंडांत उतरलों. गौरीकुंड येथील तप्तकुंडापेक्षां येथील कुंडांतील तप्तोदक सुसह्य आहे. कुंडांत यथेच्छ स्नान केलें. डोक्यांवर धाराहि घेतली. सबंध शरीर मोकळें झालें. थकवा पळाला. आईचें स्नान होईतों मी अलकनंदेच्या घाटावर बसून नर-नारायणाचें दर्शन करीत होतों. अलकनंदेच्या वाम तीरावर नर पर्वत असून दक्षिण तीरावर नारायण पर्वत आहे. नारायण पर्वताच्या पायथ्याशींच बदरीनाथाचें मंदिर आहे. मंदिरासमोर तप्तकुंडाशेजारीं अलकनंदेच्या अगदीं

तटावर एक मोठी शिला आहे. तिला नारद-शिला म्हणतात. तिच्याखालीं अलकनंदेंत डोह आहे, त्याला नारद-कुंड म्हणतात. परम भागवत देवर्षि नारदानें येथें तप केलें म्हणून नारद-शिला आणि नारद-कुंड हीं नांवें पडलीं आहेत. ह्या नारद-कुंडांतच शंकराचार्यांना बदरीनाथाची मूर्ति सांपडली आणि तीच मंदिरांत स्थापिली आहे अशी आख्यायिका कर्णोपकर्णिकेनें चालत आली आहे. आदल्या दिवशीं दुपारपासून वृष्टि होत होती म्हणून आज येथें सर्वत्र हिम होतें. सूर्यप्रकाशांत हिमशृंगें काय सुंदर दिसत होतीं ! आईचें स्नान होई तों दोनतीन पत्रें लिहून टाकलीं. सोबतच्या मंडळींचें स्नान झाल्यावर देवदर्शनाला गेलों. १० पायऱ्या चढून मंदिरांत शिरलों. मंदिरांत गर्दी फार नव्हती. मंदिर फार मोठें नाहीं. मंदिरांत एका पुढें एक तीन दालनें आहेत. पहिल्या दालनांत दर्शनार्थी यात्रेकरू जमतात. त्यांतील कांहींना दुसऱ्या दालनांत दर्शनासाठीं सोडतात. तिसरें दालन म्हणजे देव्हारा. त्यांत पुजाऱ्याशिवाय इतरांचा प्रवेश होत नाहीं. देवळाभोंवतीं इमारतीचा चौफेर कोट आहे आणि मध्यें प्रशस्त आंगण आहे. देवळाला प्रदक्षिणा या आंगणांतूनच घालावी लागते. मंदिराच्या समोर आंगणांत गरुडाची मूर्ति आहे. भिंतींत हनूमान् आहे. पंड्याबरोबर आम्ही दुसऱ्या दालनांत गेलों. समयांच्या मंद प्रकाशांत नारायणाचें दर्शन झालें. ' भेटीचेनि सुखें मनचि होय मुकें । तें रूप देखें परी बोलवेना. ' शांतपणें षट्पदीनें आळवून परत मुक्कामाला आलों. परततांना ' अद्य मे सफलं जन्म अद्य मे सफलाः क्रियाः ' अशी कृतकृत्यता वाटली असल्यास काय नवल ? बारा वाजून गेले होते. प्रसादाची वाट पहात होतों. कृपाशंकरजींचे चिरंजीव ललिताप्रसाद मंदिरांतून प्रसाद घेऊन आले. आम्हीं भोजन केलें आणि विश्रांति घेतली. थंडी वाजत होती म्हणून रजया घेऊन पडून राहिलों. रात्रीं मंदिरांत आरतीला गेलों. यावेळीं मूर्ति सुरेख शृंगारलेली होती. काळ्या पाषाणाची तुकतुकीत कृष्णमूर्ति. आजूबाजूला उद्धव लक्ष्मी इत्यादि होतीं. पंचारतीच्या

प्रकाशांत सुंदर दर्शन झालें. केदारनाथापेक्षां येथली व्यवस्था चांगली होती. आरतीहून परत आलों, पंड्याच्या घरीं जेवण केलें आणि भजन करून झोंपीं गेलों.

## श्राद्धविधींची 'ब्रह्मकपाल' शिला

दुसरे दिवशीं ता. २४।५।४६ ला आईनें आणि आमच्या सिंधी सोबत्यांनीं सकाळ श्राद्धविधींत घालविली. श्राद्धविधि 'ब्रह्मकपाल' नामक प्रचंड शिलेवर होतो. ही मंदिरापासून अर्धा–एक फर्लांगावर गंगेकांठींच आहे. येथें एकदां श्राद्ध केलें म्हणजे पुन्हां करावें लागत नाहीं. कारण सर्व पूर्वज मोक्षाला जातात. मोक्षाला गेल्स्याला तुमच्या श्राद्धपिंडाची आणि तर्पणाची तरी गरज काय ? शिवाय तुम्हांलाहि पुन्हां त्याचें कर्तव्य उरत नाहींच. कारण, तुम्हीहि मोक्षालाच गेलेले. जो मोक्षाला गेला 'त्याचें कर्तव्य संपलें.' म्हटलेंच आहे भागवतांत—

"तो देवता पितर वा ऋषि आप्त भूतें
ह्यांचा न सेवक नृपा ! न ऋणी असे तो ।
सर्वात्मना शरण जो चरणांस गेला
सांडूनि सर्व, शरणप्रद श्रीहरीच्या ॥"

जो हरि-चरणीं लीन झाला त्याला मग कुठलेंहि ऋण राहिलें नाहीं. देवऋण, पितृऋण, ऋषिऋण, मनुष्यऋण आणि भूतऋण हीं पांच ऋणें मनुष्याला जन्मतःच प्राप्त होत असतात. पण ह्या सर्वांची फेड हरिमयतेनें एकदमच होते. ( कारण, ह्या सर्वांचें मूळ हरि आहे. तो प्रसन्न झाला कीं इतरहि प्रसन्न झालेच. मुळाला पाणी घातल्यानंतर शाखांना पाणी घालावें लागत नाहीं. किंबहुना शाखांना पाणी घालणें म्हणजे पाणीच घालणें नव्हे. ) आणि ह्याचेंच नांव मोक्ष. मोक्षाची कल्पना ह्या कर्तव्यबंधामुळें आहे, ऋणकल्पनेमुळें आहे. जो नारायणाला जाऊन परत श्राद्ध करतो म्हणजे

संसारधर्म स्वीकारतो तो आपल्या पितरांना व आपल्यालाहि नरकांत ढकलतो यांत काय संदेह ? म्हणून पुन्हां श्राद्ध करण्याचा शास्त्रांत निषेध केला आहे. ह्या शिलेला ब्रह्मकपाल म्हणजे ब्रह्मदेवाची कवटी कां म्हणतात ह्याची कथा पुराणांतरीं कांहीं असेलच. पूर्वी ब्रह्मदेवाला पांच शिरें होतीं, शंकरानें त्यांतील एक तोडलें, अशी आख्यायिका आहे. त्याशीं तर हिचा संबंध नाहीं ? मला वाटतें, ब्रह्मकपाल म्हणजे सर्वोच्च पद एवढाच अर्थ अभिप्रेत असावा.

## हिमालयांतील हिमवासी साधु

आम्ही बदरीनाथपुरींत तीन दिवस आणि तीन रात्री काढण्याचें ठरविलें होतें. कारण तिहींशिवाय बहुवचन होत नाहीं. एकानें तर नाहींच पण अनेकानींहि आमचें समाधान होणारें नव्हतें. बहु काळ, असंख्यात काळ, नारायणचरणीं वास करण्याचें तें प्रतीक होतें. देवदर्शन आणि तीर्थविधि आटोपल्यावर आम्हांला साधुसंतांच्या दर्शनासाठीं, पुरी व पुरीच्या आसपासचीं स्थळें पाहण्यासाठीं, मोकळीक झाली. दुपारीं पाऊस पडल्यामुळें आम्ही पुरींतच जरा हिंडलों. बाजारांत दुकानें पाहिलीं. नारायणाचीं चित्रें, ढांक आदि खरीदलें. शिलाजित, चामरें, अजिनें आदि वस्तु विशेष होत्या. हलवायांचीं दुकानें पुष्कळ मिठाई हरतऱ्हेची पण महागडी. आम्हांला यापैकीं कांहींच नको होतें. केवळ पाहून घ्यायचें होतें, म्हणून हिंडत होतों. एक चंगी साधु एका दुकानावर बसलेला दिसला. दुकानदाराकडून खायप्यायचें आणि पैसा-अडका उकळीत होता. बाजारांतून फिरून आल्यावर देवळांच्या वाचनालयांत गेलों. त्रिमंत्री, व्हॉइसरॉय, राष्ट्रपति आणि जिना ह्यांचा समग्र पत्रव्यवहार ‘ हिंदुस्थान टाइम्स ’ मध्यें वाचायला मिळाला. रात्रीं आरतीला गेलों. आरतीहून आल्यावर पंड्याकडे भोजन केलें. भोजनोत्तर आमच्या शेजारीं एक कानडी वृद्ध जोडपें होतें त्यांच्याशीं थोडा वेळ गप्पागोष्टी केल्या. तीं दोघें पट खुलण्यापूर्वींच पंधरा दिवस

येऊन राहिलीं होतीं. येथें कोणी साधु, सत्पुरुष, आहे का म्हणून पृच्छा केली असतां त्यांनीं एका साधूचें नांव सांगितलें. त्यांच्याकडे तीं रोज जात असत. तो १०।१२ वर्षें झालीं हिमालयांत म्हणजे जेथील हिम कधींहि निःशेष नाहींसे होत नाहीं तेथें राहत आहे. अंगावर लंगोटीशिवाय दुसरें वस्त्र नाहीं. अंगाला राखहि फाशीत नाहीं. प्यायला भांडें नाहीं. म्हणजे अक्षरशः अकिंचन, पाणि-पात्र असा तो राहतो आहे. योगसिद्धीच्या गोष्टी त्याला आवडत नाहींत. योगाची किंमत कमी लेखतो. स्वतःला योगी म्हणवत नाहीं. जनांपासून अगदीं दूर राहतो. जेवायला तेवढा गांवांत येतो. आल्याबरोबर त्याला वाढून ठेवलेलें तयार असतें तें कालीकमलीवाल्यांच्या धर्मशाळेचे व्यवस्थापक देतात आणि तें तो हातांत घेऊन खातो. खाल्ल्याबरोबर हात धुतले कीं निघाला. कोणाशीं प्रायः रस्यानें बोलत नाहीं. कोणीं विशेष आग्रह केल्यास किंचित् बोलतो. गंगेच्या पैलतीरावर त्याला एक कुटी दिली आहे तिच्यांत राहतो. पण तिथेंहि तो फार थोडा वेळ असतो. बहुतेक वेळ एका मोठ्या खडकाच्या कडेला बसतो. मोठ्या पहांटे उठून दूर निघून जातो आणि गंगेच्या हिमजलांत पुष्कळ वेळ स्नान ध्यान करून मग येतो. त्याला हिमाची बाधा होत नाहीं, इतकेंच नव्हे तर अ–हिमाची बाधा होतो.गरम पेय प्यालें असतां त्याच्या अंगाचा दाह होतो. त्याच्या खोलींत त्याच्या शेजारीं बसलें असतां थंडी वाजत नाहीं. पण दूर झाल्याबरोबरच थंडी जाणवते. तो गंगोत्रीहून सरळ हिमांतून आला आहे– इत्यादि हकीगत त्यांनीं सांगितली. आई त्याच्या भेटीला गेली होती. मला जायला झालें नाहीं. पण तो जेवायला आला असतां त्याला मी पाहिलें आहे. रात्रीं नित्याप्रमाणें हरिस्मरण करून झोंपीं गेलों. झोंपतांना मी नारायणाला दृष्टांत देण्याची प्रार्थना केली होती. ब्राह्ममुहूर्ताच्या कांहीं काल आधीं नारायणानें मला तसा दृष्टांतहि दिला. परंतु त्याची वाच्यता थोडीच करायची आहे?

## व्यासांचा आश्रम व गणेशगुहा यांचें दर्शन

दुसरे दिवशीं २५।५।४६ ला मीं वसुधारेला जायचें ठरविलें. माझ्या सोबत एक मद्रासी ब्राह्मण आफ्रिकेंत युद्धांत काम केलेला होता. वसुधारा बदरीच्या पुढें पांच मैल हिमालयांत आहे. ब्रह्म-कपाल मागें टाकून १-१॥ मैल चालून गेल्यानंतर माना अथवा मणिभद्रपुरी दिसूं लागली. अलकनंदेचा पूल पार करून पुढें गेलों. पुलाच्या वरच्या बाजूस थोड्या अंतरावर सरस्वतीचा प्रवाह अलकनंदेस मिळाला आहे. ह्या संगमाला केशवप्रयाग म्हणतात. आम्हीं त्याचें दर्शन घेऊनच संतोष मानला. पुढें जरा चढून माना गांवास आलों. तो उजव्या बाजूस टाकून थोडें पुढें जातांच सरस्वती-वरील एक नैसर्गिक दगडी पूल लागतो. ह्यालाच भीमगोडा म्हणतात. ही प्रचंड शिला भीमानें ठेवली अशी समजूत आहे. म्हणून तिचें नांव भीमगोडा 'भीमगोडा' म्हणजे भीमाची टांग अशासारखा अर्थ होतो. ह्या भीमशिलेवर उभे राहून आम्ही वाहणाऱ्या सरस्वतीची शोभा पाहिली. सरस्वती स्वर्गातून पडून पाताळांत शिरते आणि तेथून भूलोकावर येऊन प्रवाहित होत आहे असें वाटतें. येथून जवळच वरच्या अंगास मुनि-विभूति व्यासांच्या शम्याप्रास नामक आश्रमाचें स्थान आहे. जेथें बसून व्यासांनीं द्विजवर्गासाठीं वेदाचे विभाग केले, प्राकृत जनतेला दुरूह वेदार्थ कळावा म्हणून भारतरूप इतिहासाची रचना केली आणि इतके लोक-कल्याणार्थ प्रयत्न करूनहि जेव्हां त्यांचें हृदय प्रसन्न झालें नाहीं तेव्हां आत्म-कल्याणासाठीं, स्वान्त-सुखासाठीं, नारदाच्या सूचनेवरून त्यांनीं भगवद्गुणगाथारूप भागवत रचिलें, तें हें स्थान. ही जलमयी सरस्वती एक वेळ आटेल, पण व्यासांची सरस्वती कधींतरी आटेल काय ?

भीमशिला ओलांडून गेल्यावर समोरच गणेशगुहा दिसते. गणेश महा-भारत लिहून घेण्यासाठीं व्यासांचा 'आदरें लेखकु जाला' होता, हें

वाचकांना स्मरतच असेल. व्यासाश्रम आणि गणेशगुहा मागें टाकून आम्ही पश्चिमेला वळलों आणि अलकनंदेच्या कांठाकांठानें चाललों. मनुष्यप्राणी अति विरळ झाला. माना गांवचे कांहीं शेतकरी आणि धनगर तेवढे दूर दूर शेतांत दिसत होते. कांहीं मजबूत आणि गुबगुबीत दिसणाऱ्या पहाडी स्त्रियाहि भेटल्या. प्रायः त्या सुती लहंगा, पूर्ण बाह्यांचा लोंकरी सदरा आणि लोंकरीचीच जाड ओढणी नेसतात. मंगोलियन वंशाची छाप त्यांच्या चेहऱ्या बांध्यावर दिसली. गोऱ्या, ठेंगण्या, गुलाबी पण जरा वसकट्या गालाच्या.

आम्ही जेथें चाललों होतों त्या वसुधारेपासून अलकापुरी दूर दिसणारी अथवा भासणारी होती. अलकापुरीच्या इतक्या जवळ राहणारे हे लोक यक्षच म्हटले तर तें खासच गैर ठरणार नाहीं.

## हिमालयांतील हिममय अलकापुरी

आम्ही आतां अगदीं हिमालयांत आलों होतों. चारी बाजूंस हिमाचींच गिरि-शिखरें. अलकनंदेवर हिमाचा पूल आणि आमच्या पायांखालींहि मधून मधून हिम येत होतें. तीन ठिकाणीं प्रत्यक्ष हिमानीवरून आम्हांला जावें लागलें. आम्ही प्रत्येक पाऊल दृष्टि-पूतच नव्हे तर यष्टि-पूतहि ठेवीत होतों! दोन गिरि-कूटांच्या कोपऱ्यांतून जे प्रवाह थिजून हिमानीचें रूप धारण करतात त्यांना हिंदींत 'गल' म्हणतात. आकाश सुरवातीला जरी मेघाच्छन्न होतें तरी सूर्य वर आल्यावर तें निवळत गेलें. आणि मग सूर्याच्या रुपेरी किरणांत चोहों बाजूंला हिमशिखरें अशीं कांहीं सुंदर दिसूं लागलीं कीं थोडा वेळ मी त्यांच्याकडे पहातच राहिलों. मधून थांबावें, फिरून चालू लागावें. रस्ता फार बिकट आहे, तेथें पाहण्यासारखें कांहीं नाहीं, आम्ही तेथें जाऊन उगीचच शिणलों, असें दोघा बंगाली बंधूंनीं मला सांगितलें होतें. पण मला मात्र वसुधारेला आल्याबद्दल फार आनंद होत

2 6 7 5 7 7

2 6 2

होता. 'गन्तव्या ते वसतिरलका' म्हणून पाठविलेला जरी कोणा विरही यक्षाचा मी संदेश-वाहक नव्हतों तरी आतां अलकापुरीच्या अगदीं जवळ येऊन पोंचलों होतों. वसुधारा दिसूं लागली. एका उंच कड्यावरून दोन सूक्ष्म प्रवाह पडतांना दिसत होते. आम्ही थेट वसुधारेच्या जवळ एका टेकडावर चढलों. परंतु पुढें धारेखालीं जायला हिमानीवरून चालून पलीकडे जावें लागत होतें. परत खालीं उतरून हिमानी ओलांडली. आणि पलीकडल्या टेकडावर चढलों. तेथें एका साधूनें आपला डेरा टाकला होता. आमच्या मित्रानें लगेच कपडे काढून स्नानासाठीं तयारी केली. मला पुण्याचा इतका सोस नव्हता. मित्राबरोबर धारेकडे मात्र मी गेलों. पण धारा होती कोठें ? धारा कड्यापासून पांच फूट असेल नसेल. पुढें तर वाऱ्याच्या प्रचंड झोता-मुळें तिचे तुषार बनून गेले होते. आणि ह्याच तुषारांचा सपका वाऱ्याच्या लहरीबरोबर अंगावर पडे. आमच्या मित्राचें स्नान झालें आणि माझें मार्जन झालें. पुण्यात्म्याच्या अंगावर धार पडते, पापी धारेच्या खालीं उभा राहिला तरी ती त्याच्या अंगावर पडत नाहीं, असा लोकभ्रम आहे. भाविक लोक अशा यात्रा करतात आणि त्यांच्या अंगावर अर्थातच ती धार पडते. असल्या यात्रा चोर, डाकू प्रायः करीत नाहींत आणि त्यांच्यावर धारहि पडत नाहीं, हें आहे तात्पर्य. अस्तु. स्नानोत्तर थोडा वेळ साधूंपाशीं बसलों. अलकनंदेचा मूलमार्ग, अलकापुरी, सत्यपथ-सरोवराची वाट इत्यादि बसल्या जागेवरून पाहून आणि एकान्त शांतीचा अनुभव करून परतलों. परततांना आमच्या बरोबर वऱ्हाडचे दोघे मराठी यात्रेकरूहि आले. पण मी जरी त्यांच्याशीं मराठींतूनच बोलण्याचा क्रम ठेवला तरी माझ्या दाढी वगैरे वेशावरून मी कोणी हिंदी भाषी कल्पून कीं काय ते माझ्याशीं आपल्या मोडक्या तोडक्या हिंदींतच बोलत होते. असा प्रकार अन्यत्राहि पुष्कळदा घडला. अस्तु. दुपारीं १॥ च्या सुमारास

आम्ही परत बदरीनाथाला आलों. सकाळीं प्रातराश करून गेलों होतों व पाथेयहि घेतलें होतें. पण तें तेथें खाण्याची आवश्यकता वाटली नाहीं. परत आल्यावर मी तप्त कुंडांत स्नान केलें आणि उशीर झाला असल्यामुळें हलवायाकडून घेऊन खाल्लें. आम्ही इतक्या लवकर येऊं आणि इतक्या मजेंत आमचा प्रवास होईल, अशी कल्पना कोणींच केली नव्हती. संध्याकाळ मी वाचनालयांत आणि इतर नव्या मित्रमंडळींच्या संगतींत घालविली. रात्रीं आरतीलाहि गेलों होतों. उद्यां सकाळीं आम्ही परत कूच करणार होतों म्हणून नारायणाचा निरोप घेतला आणि विनविलें,

तुझें नित्य सुख घ्यावें येणें मनें । असावें संधानें चरणाचेनि
ऐशी मज कृपा करीं गा विठ्ठला । म्हणविसी आपुला दास जरी
श्रवणीं तुझें नाम ऐकावें आवडी । चित्तें देउनी बुडी प्रेमडोहीं
नयनीं तुझें रूप देखावें सर्वत्र । व्हावें भूतमात्र सखे माझे
वदनीं तुझें नाम गावें निर्विकल्प । धरुनी तुझें रूप हृदयकमळीं
काया संतांपाईं जावी लोटांगणीं । हें भाग्य अनुदिनीं देईं बापा
मानाचा मज ओस अपमानीं उल्हास । देईं तुझा ध्यास सर्वकाळ
नामा म्हणे विठो तरीच शरणागत । नाहीं तरी पतित म्हणती मज ॥

घरीं येऊन भजन केलें आणि झोंपलों.

## 'जय बदरी विशाल की !'

दुसरे दिवशीं ता. २६।५।४६ ला सकाळीं ६ वाजतां आम्हीं धाम सोडलें. येथें दरवर्षी हजारों लोक येऊन जातात. गेल्या सालीं सुमारें ६०,००० यात्रा येऊन गेली. मे ते सप्टेंबर ह्या पांच महिन्यांत यात्रा चालते. मे जून या दोन महिन्यांत विशेष. अनुकूल काळ तोच आहे. देवस्थानाला दरसाल ३।४ लक्षांचें उत्पन्न होतें. व्यवस्था एक सरकारनियुक्त समिति पाहते. हिंदुमहासभेचे' उपाध्यक्ष बाबासाहेब खापर्डे हे तिचे चालू अध्यक्ष

आहेत. देवस्थानचे परंपरागत पुजारी रावळ-उपाधिधारी केरळचे नंबुद्री ब्राह्मण आहेत. त्यांनीं अनाचार आणि उधळपट्टी करून लोकक्षोभ ओढवून घेतला. त्यामुळें ही समिति नेमली गेली आहे. तिचें कार्य एकूण ठीक चाललें आहे. बदरिकाश्रमाची ही बदरीनाथ-पुरी बनली आहे. पूर्वीं हिला विशाला नांव होतें. पुराणांत तें प्रसिद्ध आहे. आणि ' जय बदरी विशाल की ' या जयघोषांत आज तें सांपडतें. त्याचा अर्थ विगत-शाला म्हणजे गृहशून्य असा होईल. परा-प्राचीन काळीं ती तशीच असणार. अथवा त्याचा अर्थ विशाल म्हणजे विस्तीर्ण पुरी असाहि होऊं शकेल. आणि खरोखर लोकैकनाथ विष्णूच्या पुरीहून मोठी अशी दुसरी कोणची राजधानी असूं शकणार ? पण ह्या दोन्ही अर्थांनीं आज ती तशी राहिलेली नाहीं. आज तेथें तीन-चारशें घरें झालीं आहेत आणि त्यामुळें तिला एक प्रकारें मर्यादाच आली आहे. ती अलकनंदेच्या चांगल्या रुंद खोऱ्यांत समुद्रसपाटीपासून १०, २४४ फूट उंच वसलेली आहे. बदरिकाश्रम-मंडळ ही नरनारायण ऋषींची तपोभूमि. विष्णूचे अवतार असलेले ते ऋषि-वर्य धर्मापासून प्रजापति दक्षाच्या मूर्तिनामक कन्येच्या पोटीं जन्मल्याची आणि निरंतर दुश्चर तपश्चर्येंत मग्न असतां त्यांचा तपोभंग करायला इंद्रानें पाठविलेला मदन आपल्या सेनेसह फजीत होऊन परत गेल्याची कथा, भागवतांत आलेली आहे. ह्या नरनारायणांचें उपास्य दैवत म्हणून बदरी-नाथ बदरिकाश्रमांत विराजमान आहेत. त्याचें आपल्याला दर्शन झालें ह्या आह्लाद-पूर्ण जाणिवेनें हृदय भरून आलें, शरीर रोमांचित झालें आणि प्रेमभरामुळें डोळ्यांतून अश्रु गळाले. हृदयांत त्याचें रूप धरून मुखानें ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हा मंत्र गुणगुणत निघालों. पांडुकेश्वराला दुपारचें भोजन केलें. माझ्या झरणींतील मसि संपली होती ती येथील एका सज्जन तरुणानें पुरविली. असलीं Little deeds of kindness कितीतरी आहेत. त्यांचें स्मरण करून पुढें चाललों. रात्रींचा मुकाम जोशी-

मठला केला. ही वीस मैलाची मजल आईला जड गेली असली पाहिजे. पण तारुण्यमदांत चूर असणाऱ्या मला वृद्धांच्या अडचणींचें भान कुठलें ? दुसरे दिवशीं ता. २७-५-४६ ला नित्याप्रमाणें निघालों. प्रथम आईला शंकराचार्यांचें ज्योतिष्पीठ आणि तपस्याभूमि दाखविली आणि तिथूनच पुढें रस्त्याला लागलों. दुपारीं भोजनादि गुलाबकोठीला उरकलें आणि रात्रींचा मुक्काम पीपलकोठीला केला. ही दोन्ही स्थानें मोठया चट्ट्यांचीं आहेत. यात्रेकरूंची गर्दी चांगलीच होती. पुष्कळसे आमच्या बरोबरच निघालेले यात्रेकरू बदरीनारायणास जात असलेले भेटले. त्यांच्यापैकीं थोडेच तुंगनाथाला जाऊन आलेले होते. त्यांच्याशीं गोष्टी करून आम्हीं हरिस्मरण पूर्वक झोपीं गेलों. झोंप आमच्या निढळाच्या घामाची कमाई असे. त्यामुळें तिची आराधना आम्हांला क्वचितच करावी लागे. आंथरुणावर पडलों कीं झोंप आणि गाढ झोंप. सकाळीं ४ लाच तिचा अंमल उतरायचा.

## व्रीहि नदीच्या कांठचा गोणाताल

दुसरे दिवशीं ता.२८।५।४६ ला सकाळीं चमोलीस जायला निघालों. चमोली दोन अडीच मैल राहिली असेल, रस्त्यांतच आमचे मित्र बालासाहेब भेटले. ते गोणातालला जायला निघाले होते. त्यांनीं आपण लोकपालला जाऊन आल्याचें आणि तेथील अद्भुत दृश्याचें वर्णन सांगितलें. एवढें सांगून ते मार्गस्थ झाले. मीहि जाऊन आलों असतों तर ? असा भाव माझ्या मनांत आल्याखेरीज राहिला नाहीं. पण 'गतं न शोच्यम्' असा विचार करून आणि ' स्थितस्य गतिश् चिन्तनीया ' या न्यायानें मी गोणाताल पहायला जावें असा विचार करूं लागलों. पण विचार निश्चित होईना. एक मन म्हणे, जाऊं द्या; पुढें पाहतां येईल. पुन्हां, वाटे, आली संधि वायां घालवणें योग्य नाहीं. हिमालयांत आपण

वारंवार यायचो नाहीं. अखेर आईची परवानगी घेऊन जायला निघालों. परत येईपर्यंत तिनें चमोलीला धर्मशाळेंत रहावें असें ठरलें. मी निघालों, पण मध्यंतरीं ते कितीतरी दूर निघून गेले होते. आतां सड़काहि नव्हती. पायवाटेनें दिशा लक्षांत ठेवून तडाख्यानें निघालों आणि दोन मैलावरील गांवांत शिरतांना त्यांना गांठलें. मी आल्याचें पाहून त्यांना सानंदाश्चर्य वाटलें. मीं म्हटलें, हिमालयांतील गिरि-दरी, नद-नदी आणि धबधबे पाहिले, एक सरोवरहि पाहून घेऊं असा विचार करून येण्याचें साहस केलें. त्यांनीं मोठ्या प्रेमानें स्वागत केलें आणि आम्ही निघालों. बालासाहेब, लोकपाळचा शीख साधु, मी आणि बालासाहेबांचे दोन नोकर असे आम्ही पांच जण होतों. शीख साधूचे आणखी दोघे साथीदारहि होते. रस्त्यांत ते मला भेटलेहि होते. मागें पडले ते पुन्हां आम्हांला दुसरे दिवशीं परततांनाच भेटले. गोणाताल चमोलीहून पूर्वेस १२ मैल दूर आहे. रस्ता अगदीं डोंगराळ आणि केव्हां केव्हां भयंकर चढ-उताराचा आहे. तथापि अधिकतर वाट नदीच्या कांठानेंच गेली असल्यामुळें चढउतार कमी आहेत. माझ्या कॅनव्हासच्या रबरी शूनें पूर्वींच राम म्हटला होता. त्यामुळें मी अनवाणी होतों. सबंध बारा मैल जाणें आणि पुन्हां येणें अनवाणी पायांना बाणाग्रांरून चालण्याप्रमाणें मरणप्राय झालें असल्यास नवल तें काय ? पण हौसेला मोल नाहीं म्हणतात. त्यामुळें इष्ट-प्राप्तीच्या आनंदांत अनिष्ट कष्टांचें दुःख बुडून जात होतें. प्रथम आम्ही एक प्रचंड टेकडी चढून उतरलों आणि बिरही नदीच्या कांठीं आलों. हें तर मीं एकाच वाक्यांत सांगून टाकलें, पण हें करण्यासाठीं आम्हांला दोन तास लागले! गोणाताल नदीचाच बनला आहे. नदीच्या दोन्ही बाजूचे डोंगर कंसाकृति होऊन त्यांनीं नदीचें पाणी अडविलें आहे. बिरही नदीचा बनला असल्यामुळें याला बिरही तालहि म्हणतात. गोणा गांवाजवळचा म्हणून

गोणाताल आणि दुरमी गांवाजवळचा म्हणून दुरमी ताल अशींहि त्याचीं नांवें प्रचारांत आहेत. नदीचें पाणी किती स्वच्छ होतें, किती शीतल होतें म्हणून सांगूं ?

## 'देव तारी तया मारील कोण ?'

कालची माझी एकादशी झालेली असल्यामुळें आणि आज हा खडतर प्रवास होत असल्यामुळें भूक मी म्हणत होती. बालासाहेबांनीं मला बिरही नदीवर प्रातराश म्हणून साखरपाणी दिलें. आमचा विचार गाडी गांवला-हें चमोलीपासून ६ मैलावर आणि गोणातालपासूनहि तितकेंच असें मध्यावर आहे—दुपारचें भोजन करण्याचा होता. परंतु मध्यंतरीं आम्हांला पुन्हां एक पहाड चढून उतरावा लागल्यामुळें तो विचार सोडवा लागला. आम्ही इतके थकून गेलों होतों कीं पाय चालायचा साफ इनकार करीत होते. तेव्हां बिरहीच्या कांठीं धोंडे मांडून नोकरांनीं सैंपाक करायला सुरवात केली. तोंपर्यंत बालासाहेबांनीं स्नानादि केलें आणि मी व साधुजी यांनीं विश्रांति घेतली. रस्त्यांत आम्हांला एक अंजिराचें झाड लागलें होतें. त्याचीं कच्चीं अंजिरें आम्हीं भाजीसाठीं तोडून घेतलीं होतीं. अंजिराची भाजी आणि रोटी ह्याच मुख्य केत. सैंपाक तयार होत आला इतक्यांत पावसानें गोंधळ उडवून दिला ! सर्व सामानसुमान घेऊन आम्हांला बचावासाठीं पळावें लागलें. जवळच वरच्या बाजूस डोंगर-पायथ्याशीं गोवाऱ्यांनीं टाकून दिलेले गुरांचे गोठे होते. त्यांच्यांत आश्रय घेतला. साधुजी त्यांत पहुडले आणि थोड्याच वेळांत कीसपाय जंतूंनीं त्यांना सळो का पळो करून सोडलें ! मी एका दगडावर जपून बसलों होतों. त्या अदृश्य रक्तपिपासु राक्षसांची मला चांगली कल्पना होती. त्यांच्यामुळें सबंध दिवस आणि रात्र साधुजींना चैन पडलें नाहीं. अस्तु. नेपाली आणि पहाडी नोकरांनीं आम्हांला भोजन आणून दिलें. भोजन करून आम्ही उठलों आणि पाऊसहि पळाला. 'कृपाळूपणें

असा धारिष्ट ' पाहिलें त्यानें. सुस्ती करून चालणार नव्हतें. रात्रीच्या आधीं आम्हांला तालावर पोंचलेंच पाहिजे होतें. पेट्रोल पिऊन निघालेल्या मोटारीप्रमाणें आम्ही वेगानें निघालों. रस्त्यांत आम्हांला गूजबेरीचें बनच लागलें. आम्ही यथेच्छ मुखशुद्धि केली आणि करीत चाललों. गाडी गांव बाजूला सोडून बिरहीच्या कांठाकांठानें आम्ही उत्तरेला वळलों. १०।१२ मैल चालून सायंकाळीं साडेपांच-सहाच्या सुमारास गोणा गांवाजवळ पोंचलों. गांव नदीच्या तीरापासून दूर उंचावर होता. पण नदीच्या या कांठावर एक शाळा अर्धवट बांधलेली पडली होती. जवळच एक पिठाची पाणचक्कीहि चालली होती. साधुजींनीं आपली भिक्षेची कटोरी भरून घेतली. ताल अद्याप दूरच होता. तिकडे जाणारे कांहीं पहाडी लोकही आम्हांला भेटले. पण ते आमच्यासाठीं कसचे थांबतात ! आम्हां थकलेल्यांना मागें टाकून हां हां म्हणतां ते दिसेनासे झाले. आम्हीहि आमच्या गतीनें सूर्यास्ताच्या सुमारास तालावर येऊन पोंचलों. त्याच दिवशीं गढवालचे जिल्हेसाहेबहि तेथें आल्याचें कळलें होतें. पण तो कोठें उतरला, डाकबंगला कुठें आहे, तें आम्हांला शोधतां सांपडलें नाहीं. सांगायलाहि कोणी नव्हतें. तेव्हां जंगलांतच तात्पुरता डेरा टाकला. दूर एक होडी तीराला लागलेली होती. पावसाचेंहि चिह्न दिसत होतें. वारा तर इतका होता कीं त्यांत टिकणें महामुश्कील ! निवाऱ्यासाठीं कांहीं गुहेसारखी जागा शोधली, पण आढळली नाहीं. एक होती तिचें तोंड वाऱ्याकडेच असल्यामुळें ती कामाची नव्हती. रात्र जंगलांत काढणें शक्यच नव्हतें. डोंगर चढून गेल्यास रामणी गांवांत सोय झाली असती. पण वाट घनदाट जंगलांतून आणि डोंगरचढणीची. तें शक्यच नव्हतें. तेव्हां परत गोणागांवच्या वाटेवरील शाळेंत जावें असें ठरलें. तलाव रुंदीला दोन-एक फर्लांग असेल नसेल; लांबीला पुष्कळ मोठा होता. नैनीतालपेक्षां हा दुप्पट आहे म्हणतात. पाणी अतिशय स्वच्छ होतें. एखाद्या

अति विशाल आरशाप्रमाणें असलेल्या ह्या तालाचें पाणी दोन डोंगरांच्या कुपीमुखांतून वाहत होतें. दृश्य अद्‌भुत होतें. पण तें नयन-मनो-हर सरोवर अधिक वेळ अनुभवण्यास अवकाश कुठें होता ? अंधार होत चालला होता, पावसाचे शिंतोडेहि येत होते आणि सुरक्षिततेसाठीं आम्हांला पळ काढणें जरूर होतें. आम्ही कांहींसे ठेंचाळत पण एकंदरींत सुखरूप वर उल्लेखिलेल्या शाळेंत येऊन पोंचलों. चांगलाच अंधार झाला होता. आम्ही येऊन पोंचलों आणि पाऊस जोरानें सुरू झाला. रस्त्यांतच त्यानें गांठलें असतें तर आमच्या फजितीला पार नव्हता ! पण 'देव तारी तया मारील कोण ?' आतां आम्हांस भुकेचा बंदोबस्त करावयाचा होता. पण पावसांत लांकडें कुठलीं आणायचीं आणि अंधारांत व पावसांत जायचें कुठें ? कळीच्या मशालीनें ( टॉर्चनें ) जागा कशी आहे तें पाहूं लागलों, तों एका कोपऱ्यांत काटक्यांचा ढीग आढळला आणि दुसऱ्यांत चूल ! झालें. आमचें काम सुरू झालें. आम्ही कल्पिलेली ही शाळा बहुतेक धर्मशाळाच असावी. निदान तिचा तसा उपयोग होत होता हें खास. दाल, रोटी आणि भाजी तयार झाली. दाल बीन्सची होती. हें 'टिन-फूड' चांगलें रुचकर आणि ताज्यासारखें होतें. भोजनोत्तर अंथरुणाची तयारी सुरू झाली. दरवाज्यांच्या फळ्यांचा पाटासारखा उपयोग झाला. कांबळें आणि बरसाती यांचें आंथरुण बनलें. प्रार्थना झाली. गरम गरम चहा पिऊन झोंपीं गेलों. इतका थकून गेलों होतों कीं संबंध रात्र एकाच सलंग झोंपेंत केव्हां संपली तें कळलें नाहीं !

## अप्रतिमल्ल खटमल आणि पूनमचंद यांचा पराक्रम

उठलों तेव्हां ता. २९।५।४६ चा अरुणोदय होत होता. आई वाट पहात असेल, बारा वाजेपर्यंत नाहीं, तर निदान २।३ वाजतां तरी चमोलीस पोंचलें पाहिजे, अशी तळमळ होती. पण शीख साधु हलायला तयार नव्हता. अखेर निघालों. वाटेंत डोंगर चढून उतरण्यापेक्षां नदीच्या कांठानेंच जातां

आल्यास पहावें असा बालासाहेबांचा विचार झाला. नदी येथून उतरतां येईल, तेथून उतरतां येईल, अशा प्रकारें शोधांत जवळजवळ दीड-दोन तास मोडले आणि उतार न मिळून घट्टकुटीप्रभात-न्यायानें पुन्हां आल्या वाटेनें परतून डोंगर चढून उतरावा लागलाच. चमोलीस अखेर साडे पांचच्या सुमारास पोंचलों. धर्मशाळेंत गेलों. मंडळी दिसली नाहींत. दुकानदाराकडे गेलों, त्यानें तीं पुढील चट्टीवर गेल्याचें सांगितलें. दुकानांतून घेऊन फराळ केला आणि तसाच पुढें निघालों. दोन अडीच मैलावरील मैठाणा चट्टीवर आईची आणि सोबत्यांची भेट झाली. पूनमचंदजी डोळ्यांत तेल घालून चमोलीहून येणाऱ्या यात्रेकरूंत मी येतों कीं काय तें पहात होते. मला रस्त्यावर पाहतांच त्यांनीं हांक मारली आणि मी चट्टींत पोंचल्यावर अर्धा तास आमचें बोलणें संपलें नाहीं. त्यांना सारी हकीगत सांगून झाल्यावर दुकानदारानें दिलेलें गरम गरम दूध पिऊन हरिस्मरणपूर्वक झोंपीं गेलों. रात्रीं झोंप आली नाहीं. चट्टींत आम्हींच तेवढे उतरलों नव्हतों. ढेकणांनींहि वसति केली होती. देवाधिदेवांनाहि ज्यांचें भय त्यांनीं मला पछाडल्यावर माझी बापड्याची स्थिति काय विचारतां ?

‘ कमले कमला शेते, हरः शेते हिमालये ।
क्षीराब्धौ च हरिः शेते, मन्ये मत्कुण-शंकया ॥ ’

[ लक्ष्मी जी कमलांत झोंपते, शंकर जो हिमालयांत निजतो, आणि विष्णु जो क्षीर-सागरांत पहुडतो तो, मला वाटतें, ढेकणाच्याच भीतीनें होय.]

हा श्लोक रचणाऱ्या कवीनें हिमालयाचा प्रवास केला नसावा. निदान आमच्या हिमालयाचा तरी खासच नाहीं. ज्यांचें रात्रभर आम्हीं आतिथ्य केलें त्या ढेकणांचा निरोप घेऊन ता. ३०।५।४६ ला सकाळीं मैठाणा सोडलें. कर्णप्रयागच्या अलीकडे गौचर गांवीं मोटारी मिळतात. तेथें प्रथम मोटार मिळविण्याच्या हेतूनें चमोलीहूनच यात्रेकरूंत स्पर्धा सुरू झाली

होती. रात्रीं गौचरला पोंचलों तेव्हां तेथें इतकी गर्दी होती, कीं सांगतां सोय नाहीं. कोंडवाडयांत मेंढरें कोंडावीं त्याप्रमाणें यात्रेकरू एकुलत्या एक दुकानांत भरले होते. चमोली ते श्रीनगर हा अलकनंदेच्या कांठचा प्रदेश चांगला सुपीक दिसला. शेतें खोऱ्यांत असल्यामुळें बरींच मोठमोठीं होतीं. मधून मधून लहान-मोठे बागहि होते. आम्हांला प्रथमच ह्या भागांत केळीं मिळालीं. दीड आण्यास एक. कैऱ्याहि मिळाल्या. केळ आणि आंबा हीं दोन अखिल-भारतीय फळझाडें होत. आ-से-तुहिमाचल तीं मिळतात. बहुतेक कुठलेंहि मंगलकार्य त्यांच्या पानांशिवाय होत नाहीं. हें बहुमानाचें स्थान त्यांना आपल्या उपयुक्ततेबरोबर अखिल-भारतीयतेमुळें मिळालें असलें पाहिजे. आम्ही गौचरला संध्याकाळीं पोंचलों आणि धर्मशाळेची चौकशी केली. पण धर्मशाळा बनत होती. उतारू एका दुकानदाराच्या माडीवर उतरले होते. इतरत्रहि थोडी सोय झाली असती. पण आईला परिश्रमामुळें किंचित् ज्वर आलेला होता. ती आल्याबरोबर तिला निजायला मिळावें म्हणून माडीच्या सजावजा जागेंत मीं आपलें कांबळें पसरून ठेवलें. जवळच दोघे-चौघे पहाडी सैनिक होते. ते म्हणूं लागले, ही जागा आमची आहे. येथें बसूं नका. मी त्यांना दुसरी व्यवस्था करीपर्यंत मला बसूं द्या असें सांगितलें आणि त्यांनींहि नाखुषीनेंच पण राहूं दिलें. आई आली, तिला पडून विश्रांति घ्यायला सांगितलें. त्या गर्दींत तिला तें प्रशस्त वाटेना. पण आग्रहामुळें पडून राहिली. इतक्यांत आमचे सिंधी मित्र पूनमचंदजी आणि मंडळी आली. आणि त्यांनींहि स्वाभाविकच तेथें तळ दिला. प्रवासांत सामान्यतः मी आधीं पोंचायचा आणि चांगली जागा मिळवून ठेवायचा. मागाहून मंडळी येऊन उतरायची. त्याप्रमाणेंच आजहि. पण पूनमचंदजींनीं तेथें सामान ठेवलेलें पाहिल्याबरोबर सैनिकांचें पित्त खवळलें आणि एकानें त्यांचें आंथरलेलें वस्त्र फाडून फेंकून दिलें. इतकेंच नव्हे, तर त्यांचें इतर सामानहि तो माडीवरून खालीं फेंकूं लागला. पूनमचंदजींना हा प्रकार

पाहून साश्चर्य राग आला असल्यास नवल नाहीं. ते जरी बरेच वयस्क होते आणि सैनिक जरी तरणाबांड होता तरी त्यांनीं त्याला उचलून एका निमिषांत खालीं दाबलें. आणि मग सैनिकाचे साथी, दुकानदार आणि आम्ही यात्रेकरू यांच्यांत जो दंगा झाला तो विचारूंच नका ! आनंदाची गोष्ट ही होती कीं दुकानदारानें आमचा पक्ष घेतला. सैनिकांना माझ्या दुकानांत येऊन माझ्या गिऱ्हाइकांशीं अशी दंगामस्ती आणि हडेलहप्पी करण्याचा काय अधिकार, असा त्यानें त्यांना सरळ जाब विचारला. तोहि एक माजी सैनिकच होता. त्यानें त्यांना अ ह्वान दिलें आणि आपल्या दुकानांत अशी मस्ती केल्याबद्दल पोलिसांच्या ताब्यांत दिलें. यात्रेकरूंना पुनमचंदजींनीं बदमाश सैनिकाला एका निमिषांत चीत केल्याबद्दल फार विस्मय वाटला. मी तेथेंच होतों, पण हा प्रकार केव्हां कसा झाला याचा मला पुष्कळ वेळ बोधच झाला नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं आमच्या साक्षी व्हावयाच्या होत्या. पण त्या भानगडींत आम्ही पडलों नाहीं. मोटारी होत्या पण त्या आम्हांला मिळण्यासारख्या नव्हत्या, म्हणून त्यांचा नाद सोडला. दुकानदारानें मोटार मिळवून देतों म्हणून आम्हांला आश्वासन दिलें होतें, पण त्यांवर विश्वसून आपला कार्यभाग बुडवून घेण्याची आमची इच्छा नव्हती. जे मोटारीवर विश्वसून राहिले ते एक-दोन दिवस गमावून बसल्याचें मागाहून आढळून आलें.

## यात्रेकरूंना लुटणारे पंडे व गुंडे

ता. २१-५-४६ सकाळीं ७ ला आम्हीं गौचर सोडलें. दुपारीं शिवानंदी ह्या चांगल्या चट्टीवर भोजन उरकलें आणि रात्रीच्या मुक्कामासाठीं रुद्रप्रयाग पुढील गुलाबराय चट्टीवर गेलों. आमचा पैदल यात्रेचा पहिल्या दिवशींचा म्हणजे ९-५-४६ चा मुक्काम येथेंच झाला होता. दुकानदारानें आम्हांला ओळखलें आणि यात्रा फार तडाख्यानें केल्याबद्दल तो

आमची तारीफ करूं लागला. त्याला जेव्हां मीं सांगितलें कीं मी तुंगनाथ, वसुधारा आणि गोणाताल ह्यांनाहि जाऊन आलों आहें तेव्हां तर त्याला विशेषच नवल वाटलें. आज आम्हांला घर सोडून बरोबर एक महिना झाला होता. माझा विचार यात्रा बरोबर एक महिन्यांत आटोपायची असा होता. पण तें घिसाड-घाईनेंच शक्य होतें. आतां काय, पैदल प्रवास फक्त एका दिवसाचा उरला होता. १-६-४६ ला श्रीनगरला पोंचलों कीं कीर्तिनगरहून मोटार मिळणार होती.

दुसरें दिवशीं ता. १-६-४६ ला सकाळींच नित्याप्रमाणें प्रातःस्मरणादि आटोपून आम्ही निघालों. थोडें दूर गेल्यावर आझाद हिंद फौजेंतील सैनिकाच्या दुकानांत दूध घेऊन प्रातराश केला आणि थोडा वेळ त्याच्याशीं गोष्टी करून पुढें कूच केलें. जेथें आमची चुकामूक झाली होती ती खांखरा चट्टी लागली. येथें तर आम्ही थांबलों होतों, तुमची खूप चौकशी केली होती वगैरे पूनमचंदजी सांगूं लागले. जलपान करून पुढील चढण चढून भट्टिसेरा चट्टींत उतरलों. एका दुकानदारानें आपल्या दुकानांत उतरण्याबद्दल गोष्ट केल्यावरून त्याच्या दुकानांत उतरलों. पण पुरेसा सौदा घेत नाहीं म्हणून तो आम्हांला मागाहून दुसरीकडे जा, म्हणूं लागला. तें आम्हीं नाकारलें. या यात्रेंत पंडे आणि गुंडे यात्रेकरूंना वाटमाऱ्यांप्रमाणें लुटतात असें म्हणावेंसें वाटतें. हे बनिया दुकानदार वस्तु भलत्याच महाग विकतात. इतकेंच नव्हे तर आपला मतलब साधण्यासाठीं पुरेसें जळण देत नाहींत, उतरूं देत नाहींत, भांडीं देत नाहींत. आणि इतरहि प्रकारांनीं यात्रेकरूंना सतावतात. यांना गुंडे म्हटल्यास तें खचित अतिशयोक्तीचें होणार नाहीं. गरजवंतास अक्कल नाहीं, ह्या न्यायानें यात्रेकरू सर्व सहन करतात. माझ्यासारखा एखाददुसराच सत्याग्रह करतो. भोजनादि आटोपून उन्हांतच निघालों. उन्हाचा चांगलाच ताप झाला. पण हा शेवटचाच

दिवस होता. वारंवार सांवलीचा आणि जलाचा आश्रय घेत संध्याकाळीं ६ ला श्रीनगरला धर्मशाळेंत दाखल झालों. धर्मशाळेच्या परिचित व्यवस्थापकांनीं आमचें चांगलें स्वागत केलें. आणि लगेच खोली उघडून दिली व सामग्री पुरविली. धर्मशाळेच्या प्रवेश-द्वारावरील फळ्यावर सुभाषबाबू जिवंत असून ते लवकरच प्रगट होतील अशी बातमी वाचली. शहानवाजांचाहि दौरा इकडे लवकरच होणार होता. अन्यहि पुष्कळ महत्त्वाच्या बातम्या वाचायला मिळाल्या. मोटारीबद्दल चौकशी करतां मोटार सकाळीं ७।८ ला कीर्तिनगराला अवश्य मिळेल, असें कळलें. त्यामुळें निश्चिंतता वाटली. येथें आमची पैदल यात्रा संपली. जाऊन येऊन एकूण सुमारें ३०० मैलाची पैदल यात्रा झाली. केदारनाथ, चमोली, आणि बदरीनाथ येथें एकूण जवळजवळ सहा दिवस आम्हीं विश्राम केला. म्हणजे आमची ही पैदल यात्रा एकूण १८।२० दिवसांत झाली. अर्थात् रोजची सरासरी चाल १५ मैलाची झाली असें म्हणतां येईल. हृषीकेश ते देवप्रयाग ४१॥ मैल आणि देवप्रयाग ते कीर्तिनगर १६ मैल, एकूण ५७॥ मैलाचा प्रवास येतांना मोटारनें झाला आणि उद्यांहि सदर परतीचा प्रवास तसाच व्हावयाचा योग. अस्तु. रात्रीं आनंददायक कष्टाची यात्रा संपल्याबद्दल समाधन मानून हरिस्मरणपूर्वक झोंपीं गेलों.

## तीर्थाटनांतील अंध कर्मठपणा व त्याची प्रतिक्रिया

दुसरे दिवशीं ता. २-६-४६ ला सकाळीं नित्याप्रमाणें प्रातःस्मरण करून सामनसुमान उचललें आणि कीर्तिनगरला कूच करून गेलों. मोटारी तयार होत्या. सहा जणांचीं थेट हृषीकेशचीं तिकिटें काढलीं. मोटारी ८॥ वाजतां सुटल्या. आमची मोटारबस देवप्रयागला १०॥ वाजतां पोंचली. देवप्रयागला गांवांत जाऊन ठेवलेलें सामान घेऊन आलों. परत मोटार निघायला पुष्कळ अवकाश होता. आईनें प्रयागांत स्नानादि

आटोपलें. कपडे भयंकर मळले होते. ते सर्व मीं एका ओढ्याकांठीं धुतले आणि स्नानहि तेथेंच केलें. पंड्यानें दूध मिठाई आणून दिली ती खाल्ली आणि मोटारीच्या निघण्याची वाट पहात जवळच्या उंचवट्यावरील छायेंत पडून राहिलों. ऊष्मा चांगलाच होत होता. भगवती भागीरथी आणि अलकनंदा यांच्या संगमाकडे पहात आणि आपली तीर्थयात्रा आठवून

"निर्जीवा दगडाची काय करशील सेवा। तो तुज निदेवा देईल काई
कवणें गुणें भुली पडली गव्हारा। तीर्थाच्या माहेरा नोळखसी
अष्टोत्तरशें तीर्थें जयाच्या चरणीं। तो तुझां हृदय-भवनीं आत्माराम
देव जवळीं असतां जासी आना तीर्था। मुकलासी आतां म्हणे ज्ञानदेवो॥"

हा अभंग आळवीत होतों. ही दृष्टि राखून यात्रा करणें वेगळें आणि आंधळेपणानें करणें वेगळें. आपल्या समाजाच्या अंगीं बराचसा आंधळा कर्मठपणा जडला आहे. हा प्रकार जुनाच आहे. याचा प्रतिकारहि तितकाच जुना आहे. 'काश्यां तु मरणान् मुक्तिः' इत्यादि अंधश्रद्धेला धक्का देण्यासाठींच तत्त्वज्ञ कबीर काशींतून उठून मगहरला जाऊन मेला. त्यापूर्वीं शंकराचार्यांनींहि "कुरुते गंगा-सागर-गमनं, व्रत-परिपालनमथवा दानम्। ज्ञान-विहीने सर्व-मतेन मुक्तिर्न भवति जन्म-शतेन" हा दणका दिलाच आहे. तरी सुद्धां तीर्थाटणादि प्रकार चालू आहे, ह्याचें कारण त्यांत कांहीं तथ्य आहे. तीर्थाटणादिकांत दोष शिरले म्हणून त्यांचा त्याग योग्य होणार नाहीं. त्यांची विचारानें आणि आचारानें शुद्धि करणेंच योग्य होईल. असे विचार,-तरंग चालले होते इतक्यांत मोटारी सुटण्याची वेळ झाली आणि आम्ही आपल्या जागा घेतल्या. संध्याकाळीं तीन तासाच्या मोटार-प्रवासा-नन्तर आम्ही हृषीकेशला पोंचलों. मार्गाचीं वांकडीं-तिकडीं वळणें आणि चढउतार, नदीचीं वांकणें आणि पात्राचा ठिकठिकाणीं संकोच व विस्तार प्रवाहाची उच्छृंखलता आणि त्यांतील वाहत चाललेल्या हजारों फळ्यांची जलक्रीडा, आजूबाजूच्या डोंगरांची, त्यावरील जंगलांची आणि पशु-

पक्ष्यांची विविध रम्य दर्शनें हीं सर्व पहात आणि मोटारीचे हबके अनुभवीत आमचा मोटार-प्रवास मोठ्या मजेंत संपला. धर्मशाळेंत जाण्याबरोबर आम्हांला एक लहानशी खोली मिळाली. तिच्यांत सामान ठेवून आम्ही गंगेवर गेलों. शौचादिकापासून निवृत्त होऊन मार्गांत थोडा वेळ रामायणी कथा चालली होती, ती ऐकली व आईनें कुण्डांत स्नानादि करून यात्रा-सुफल आटोपलें. गंगेचें व रामचंद्राचें दर्शन घेतलें आणि परत धर्मशाळेंत आलों. मी भोजन एका खाणावळींत केलें. हा खाणावळवाला जाते वेळीं चांगला परिचित झाला होता. त्यानें त्यावेळीं आणि आताहि विशेष आपुलकी दाखविली असें म्हटलें पाहिजे. रात्रीं आम्ही धर्मशाळेच्या प्रशस्त गच्चीवर झोंपलों. स्वच्छ आकाशांत तारका चमकत होत्या. जणूं आमची यात्रा निर्विघ्न पार पडल्याबद्दल त्या आमचें सस्मित वदनानें मूक अभिनंदन करीत होत्या. प्रार्थना करून हरिस्मरणपूर्वक देह शय्येच्या स्वाधीन केला आणि दिव्य तारकांच्या शीतल किरणांची रुपेरी चादर पांघरून आम्ही झोंपी गेलों.

## हरिद्वारच्या दीनदयालु शास्त्र्यांचा प्रेमाग्रह

दुसऱ्या दिवशीं ता. ३।६।४६ ला सकाळीं सिंधी सोबत्यांचा निरोप घेतला आणि बसनें हरिद्वारला आलों. ' हरिकी पायरी ' जवळील कुठल्या तरी राणीची धर्मशाळा आहे, तिच्यांतच उतरलों. जागा तळघराची मिळाली. खिडकीच्या खालीं गंगेचा प्रवाह होता. जगन्नाथानें म्हटल्याप्रमाणेंच ' न काका नाकाधीश्वर-नगर-साकांक्ष-मनसः ' असे पिंड खाऊन नित्यतृप्त दिसत होते. माकडेंहि चांगलींच धृष्ट दिसलीं. खिडकीच्या गजांतून आंत हात घालून सांपडेल ती वस्तु लांबविण्यांत पटाईत. खोलीला कुलूप घालून आणि परत येईपर्यंत आईला हरीच्या पायरीवर बसायला सांगून मी गुरुकुल-मध्यें मित्रांची भेट घ्यायला आणि सामान आणायला गेलों. दीनदयालु

शास्त्री आणि इतर मित्र यांची भेट घेतली. दीनदयालु शास्त्र्यांनीं मी आईसह निदान दोन आठवडे तरी गुरुकुलमध्यें रहावें असा आग्रह केला. आईला येथें जमत नसेल तर गांवांत तिची चांगली सोय करून देतों म्हणून सांगितलें. त्यांचें म्हणणें कीं माझ्यासारख्यानें अशा संस्थांत मधून मधून जाऊन राहिलें पाहिजे, आपला लाभ त्यांना द्यायला पाहिजे. शिवाय तिथूनहि पुष्कळ शिकण्यासारखें असतेंच. गुरुकुल-ग्रंथालय आणि मुख्यतः वैदिक विभाग ह्यांचें मला विशेष आकर्षण होतें. आईची राहण्याची इच्छा असती तर मी जरूर ८-१५ दिवस राहिलों असतों. पण प्रवासाच्या दगदगीमुळें तिची प्रकृति क्षीण झालेली होती. तिला खोकला आणि जरा ज्वरहि होता. ती घरीं जाऊन विश्रांति घ्यायला उत्सुक होती. म्हणून मला दीनदयालु शास्त्र्यांचा प्रेमाग्रह मोडावा लागला. त्यांचा निरोप घेतला आणि टांग्यांत सामान घालून घेऊन आलों. येतांना रस्त्यांत बुकिंग ऑफिसमधून दिल्लीचीं दोन तिकीटें काढलीं. दिल्लीच्या गाडीला बराच अवकाश होता. म्हणून कनखलला जाऊन आलों. बाजारांतून कांहीं सामान, माला, खडावा इत्यादि घेतलें. रस्त्यांत हरिभाऊ उपाध्याय भेटले. ते एक-दोन आठवडे सपरिवार रहायला आले होते. त्यांनीं गीताप्रवचनाच्या हिंदी भाषांतराच्या निमित्तानें राहून जा म्हणून सांगितलें. पण आमचा जायचा निश्चय झाला होता. ' हरिकी पायरी ' वर संध्याकाळीं आरतीला हजर झालों. ब्रह्मकुंडांत स्नान केलें. ह्याचें वर्णन सुरवातीलाच येऊन गेलें आहे म्हणून येथें त्याचा उल्लेख मात्र केला. आतां गाडीची वेळ होत होती म्हणून टांगा घेऊन सरळ स्टेशनवर गेलों. हमालदादा चांगला लाभला. त्यानें आम्हांला नीट बसवून आपली दीड रुपयाची दक्षिणा घेतली व आमची गाडी जणूं ' दिल्ली चलो ' म्हणून चालूं लागली.

# दिल्लीच्या हरिजन कॉलनींत

दुसरे दिवशीं ता. ४-६-४६ ला सकाळीं ९ च्या सुमारास आम्ही दिल्ली स्टेशनवर उतरलों. तांगा करून सरळ गांधी आश्रमाला गेलों. कालका भाई स्वागत करायला हजर होते. त्यांनीं आमचें सामान ठेवून घेतलें आणि आम्हांला दोन ग्लास लस्सी प्यायला दिली. शान्तिः पुष्टिस् तुष्टिश् चास्तु म्हणून आम्ही ती पिऊन खरोखरच शांत पुष्ट व तुष्ट झालों. सकाळींच दिल्लीला इतका ऊष्मा होता कीं बर्फाच्या घरांत जाऊन बसावें असें वाटत होतें. पण आम्ही तर बर्फाचें घर – हिमालय – सोडून आगीच्या घरांत–भट्टींत–येऊन पडल्यासारखे झालों होतों. येथें बर्फाच्या पोटांत बसणें तर शक्य नव्हतें, पण बर्फाला पोटांत बसवणें मात्र शक्य होतें. आाणि लस्सी पिऊन आम्हीं तेंच केलें. त्यामुळें आमची आंतली व बाहेरची अशा दोन्ही आगी शांत झाल्या. थोडी विश्रांति घेऊन स्नानादि आटोपलें आणि भोजन करून आलों. आईनें अर्थात् फलाहारच केला. एक गृहस्थ आम्हा दाक्षिणी मंडळींना पाहून मुद्दाम आमच्याकडे आला आणि त्यानें आपल्या घरीं चालण्याबद्दल पुष्कळ आग्रह केला. आईला तेथें मना-प्रमाणें सोवळयानें सर्व कांहीं करतां येईल, असें त्याचें म्हणणें. पण आईनें तें टाळलें. दुपारीं मी एकटाच हरिजन कॉलनींत रामदास गुलाटी आणि वियोगी हरि यांना भेटायला गेलों. खूपच दूर होतें तें. रामदासजींनीं आणि वियोगी हरिजींनीं आईलाहि रात्रीं येथेंच घेऊन यावयाचें ठरविलें. मनुष्य जाऊन तिला घेऊन आला. बिरलांनीं ही भव्य कॉलनी सुरेख बांधून दिली आहे. व्यवस्थाहि नमुनेदार वाटली. उन्हाळयाची सुट्टी असल्यामुळें मुलें थोडींच होतीं. भोजनोत्तर प्रार्थना झाली. प्रार्थनेंत वियोगी हरिजींच्या विनंती-वरून विद्यार्थ्यांना उद्देशून ३०।४० मिनिटें बोललों. हरिजनांना मुक्त नसलेल्या मंदिरांना मातृप्रीत्यर्थ मी कसा गेलों, त्यांत माझी काय दृष्टि

होती, इत्यादि विवेचन केलें होतें. वियोगी हरींना तें फार आवडल्याचें दिसलें. दुसरे दिवशीं त्यांनीं माझ्या हिंदी भाषेचीहि तारीफ केली. त्यांची स्तुति ऐकून मला ' निन्दन-स्तव-सत्कार-न्यक्कारार्थं कलेवरम् ' या भागवती उक्तीची आठवण झाली. कित्येकांना ज्याप्रमाणें दोषारोप करण्याची संवय असते तशी कांहींना गुणारोप करण्याचीहि कला अवगत असते. परंतु असे गुणारोप करणारे ' अवनितलिं थोडेच असती. ' अशा गुणग्राही थोड्यांत वियोगी हरींची गणना केली पाहिजे. परंतु खरा गुण तर निंदा आणि स्तुति ह्या दोहोंच्याहि पार राहण्यांतच आहे.

रात्रीं हरिजन कॉलनींत सुखशयन करून दुसरे दिवशीं ता.५-६-४६ ला आम्ही कॉलनीच्या घोडागाडींतून गांधी आश्रमांत परत आलों. आईला तेथें ठेवून आम्ही नव्या दिल्लींत सस्ता साहित्य मंडळांत गेलों. तेथें मार्तंड उपाध्यायांची भेट घेतली आणि माझा फुटलेला थरमॉस त्यांत नवीन री-फिल बसवण्यासाठीं त्यांच्या हवालीं केला. जयसिंहाची वेधशाळा पाहिली. पुष्कळच समजून घेण्यासारखें होतें. पण अवकाश कमी असल्यामुळें आणि समजावून देणारा हजर नसल्यामुळें तें जमलें नाहीं. तेथील शाद्वलांत (Lawn) फिरत असतां एक तरुण मजकडे आला आणि म्हणाला, आपण महाराष्ट्रीय आहां काय ? मीं होय म्हटलें आणि त्यानें कसें ओळखलें त्याचा विचार करूं लागलों. पण भाषा, वेश-भूषा • इत्यादिकांवरून तसें ओळखतां येईल असें वाटलें नाहीं. तेव्हां त्याला विचारलें असतां तो म्हणाला मीं तुमच्या वहाणांवरून ओळखलें. मला त्याची जरा गंमत वाटली. तो इन्फर्मेशन डिपार्टमेंटमध्यें फोटोग्राफरचें काम करीत होता. तेथून असेंब्ली वगैरे पाहून आम्ही दुपारीं १२ च्या सुमारास गांधी आश्रमांत आलों, भोजन केलें आणि जाण्याच्या तयारीला लागलों. कालका-भाईनीं वरधेचीं दोन तिकिटें काढून तयार ठेवलीं होतीं. तीन वाजतांच

स्टेशनवर जाऊन बसलों. गाडी सुटायची होती ५॥ च्या सुमारास, पण फलाट 'फुल्ल' होतें. इतक्यांत पूनमचंदजींची भेट झाली. तेहि त्याच गाडीनें मथुरेला जावयाचे होते. त्यांनीं मथुरेला चला म्हणून पुष्कळ आग्रह केला, पण आई तेथें जाऊन आलेली असल्यामुळें आणि मुख्य यात्रेंत अनेक अवांतर यात्रा करण्याची माझी वृत्ति नसल्यामुळें मी ते अर्थातच स्वीकारलें नाहीं. पूनमचंदजी वगैरे सिंधी मित्रांना आम्ही हृषीकेशलाच सोडलें होतें. अशा प्रकारें त्यांची आमची सोबत पूर्ण झाली होती. त्यांचा परत योग झाला आणि लवकरच वियोग होणार होता. पांथसमागमच होता तो. वास्तविक सर्वच समागम तसेच आहेत. म्हटलेंच आहे : "यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ । समेत्य च व्यपेयातां तद्वद् भूत-समागमः ॥ " ह्या ऋषिवचनाप्रमाणें आपण सर्व जण काष्ठवत् अस्वतंत्र असून समुद्रवत् संसारांत वायु-स्थानीय सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या लहरीनुसार आपले योगायोग घडत असतात. असो. आम्ही अलग झाल्यापासून घडलेल्या गोष्टी एकमेकांना सांगितल्या. हरिद्वारला गाडींत चढतांना कशी रेटारेटी झाली, त्यांत आईच्या पायाला कशी जखम झाली इत्यादि हकीगत सांगत होतों इतक्यांत फलाटावर गाडी आली आणि पाहतां पाहतां रिकामी गाडी पार भरून गेली. दुसऱ्या क्षणीं चढणाऱ्याला गाडी जणूं भरूनच आली असें वाटावें. आम्हांला देखील जेमतेम जागा मिळाली. काश्मीरला जाणारे एक सज्जन आम्हांला पोंचवायला स्टेशनवर आले होते. त्यांना वर्धेस तार करण्यासाठीं रुपया दिला आणि फलाटावर हवा खात गाडी सुटण्याची वाट पहात बसलों. थरमॉस घेऊन माणूस येणार होता. त्याचीहि प्रतीक्षा करीतच होतों. अखेर तो आला नाहीं आणि गाडी सुटली. डब्यांतील हवा भट्टींतल्याप्रमाणें तापलेली होती. बाहेरून उन्हाच्या तीव्र झळी येत होत्या. हिंदींत त्यांना लू म्हणतात. ह्या लूनें मनुष्यच नव्हे तर पशु देखील मरतात. आणि खरोखरच

एक तरुण मुलगा, वृद्ध आईसह कोठें चाललेला, मथुरा स्टेशनवर झळ लागून मेल्याचें दिसून आलें. त्याचें प्रेत स्टेशनवर काढलें होतें. अशा प्रकारें शीतोष्ण-सुख-दुःख-द अनुभव अनुभवीत दुसरे दिवशीं ता. ६-६-४६ ला सायंकाळीं सहा वाजतां आम्ही वरधा स्टेशनवर आलों. तार केलेली असल्यामुळें मंडळी स्टेशनवर येतील अशी अपेक्षा होती. परंतु तार वेळेवर पोंचेलच ह्याचा भरंवसा नव्हता; त्यामुळें उलटहि शक्यता होती आणि झालेंहि तसेंच. पण इतर कोणी असो कीं नसो, हमाल आमच्या स्वागताला हजर होते. त्यांनीं आमचें सामान व्यवस्थितपणें टांग्यांत ठेवलें आणि टांग्यानें आम्ही थेट घरीं दत्तपूरला दत्त म्हणून हजर झालों !

## यात्रेची सांगता

यात्रेहून घरीं परत आल्यानंतर १०।१२ दिवसांनीं यात्रेचें मावंदें करण्यांत आलें. मेहुणे श्री पंढरीनाथ पुराणिक, मामा श्री. त्र्यंबक बाबाजी सिद्धभट्टी आणि मावसभाऊ श्री. कृष्णाजी विनायक धरणगांवकर हे तिघे वेद-वादी अनायासें कार्यवाह लाभले होते. त्यानीं सर्व विधि निपुणतेनें करविले. इष्टमित्र तीर्थप्रसादासाठीं आले होते. जेव्हां वाढप सुरू झालें आणि ब्राह्मणांनीं त्रि-सुपर्ण-पाठाला सुरवात करून

"तस्य एवं विदुषो यज्ञस्य, आत्मा यजमानः, श्रद्धा पत्नी, शरीरं इध्मम्, उरो वेदिः, लोमानि बर्हिः, वेदः शिखा, हृदयं यूपः, काम आज्यम्, मन्युः पशुः, तपोऽग्निः, दमः शमयिता, दक्षिणा वाग्, होता प्राणः, उद्गाता चक्षुः, अध्वर्युर् मनः, ब्रह्मा श्रोत्रं, अग्नीन् यावद् ध्रियते सा दीक्षा, यदश्नाति तद् हविः, यत् पिबति तदस्य सोम-पानम्, यद् रमते तदुपसदः, यत् संचरति उपविशति उत्तिष्ठते च स प्रवर्ग्यः, यन् मुखं तद् आहवनीयः, या व्याहृतिः आहुतिः, यदस्य विज्ञानं तज् जुहोति, यत् सायं-प्रातर् अत्ति तत् समिधम्, यत् प्रातर्, मध्यंदिनं सायं च तानि सवनानि, ये अहोरात्रे ते

दर्श-पूर्णमासौ, ये अर्ध-मासाश् च मासाश् च ते चातुर्मास्यानि, ये ऋतवस् ते पशु-बन्धाः, ये संवत्सराश् च परिवत्सराश् च ते अहर्गणाः, सर्व-वेदसं वै एतत् सत्त्रम् । यन् मरणं तदवभृथः। एतद् वै जरामर्यं अग्निहोत्रं सत्त्रम् । य एवं विद्वान् उदगयने प्रमीयते, देवानामेव महिमानं गत्वा आदित्यस्य सायुज्यं गच्छति; अथ यो दक्षिणे प्रमीयते, पितृणामेव महिमानं गत्वा चन्द्रमसः सायुज्यं सलोकतां आप्नोति । एतौ वै सूर्याचन्द्रमसोर् महिमानौ ब्राह्मणो विद्वान् अभिजयाति; तस्माद् ब्रह्मणो महिमानं आप्नोति, तस्माद् ब्रह्मणो महिमानम् ॥

ॐ । सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।—

म्हणून समारोप केला, तेव्हां खरोखरच 'तो झाला सोहळा अनुपम्य' असा भाव सर्वत्र दुमदुमून गेला.

ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

अनुक्रमांक २८७५४
२८२
१५.१२.८१
ग्रा. क्र. 5925

## परिशिष्ट १

### प्रवासाचा समस्त वृत्तान्त

(१) काल : तारीख १।५।४६ ते ६।६।४६ एकूण दिवस ३७

(२) रेलवे प्रवास : वरधा ते हृषीकेश, येतां जातां

( हृषीकेश ते हरिद्वार मोटार )

(३) मोटार प्रवास : हृषीकेश ते कीर्तिनगर येतां जातां

(अंतर ५७॥. मैल),

(४) पैदल प्रवास :

| | मैल |
|---|---|
| कीर्तिनगर ते रुद्रप्रयाग | २१॥ |
| रुद्रप्रयाग ते केदारनाथ | ४८ |
| केदारनाथ ते चमोली | ५४ |
| चमोली ते बदरीनाथ | ४७ |
| बदरीनाथ ते चमोली | ४७ |
| चमोळी ते रुद्रप्रयाग | ४१ |
| रुद्रप्रयाग ते कीर्तिनगर | २१॥ |
| अवांतर— त्रिजुगीनारायण, तुंगनाथ, वसुधारा, गोणाताल आदि | ४० |
| एकूण मैल | ३२० |

( ५ ) **प्रत्यक्ष प्रवासाचे दिवस** : १९
( ६ ) **रोजची सरासरी पैदल चाल**: १६ मैल कांहीं फरलांग
( ७ ) **प्रवास-खर्च [ दोघांचा ]** : रुपये २५०-०-०


१४८—। **रेलवे, मोटार, भाडें**

२५।. वरधा ते दिल्ली रेलवे भाडें
६।= दिल्ली ते हरिद्वार रे. भा.
१ हरिद्वार ते हृषीकेश रे. भा.
१८। हृषीकेश ते देवप्रयाग मोटार भाडें
४।= देवप्रयाग ते कीर्तिनगर मो. भा.
१४।।।≡ कीर्तिनगर ते हृषीकेश मो. भा.
१।। हृषीकेश ते हरिद्वार मो. भा.
६।= हरिद्वार ते दिल्ली रे. भा.
२५। दिल्ली ते वरधा रे. भा.

१४८—।

१३।।.। **तांगाभाडें आणि हमाली**
४३।।- **सामान-खरेदी** थरमॉस, पॉकेट स्टोव्ह, बॅग; काठ्या, चित्रें पुस्तक, कंकण, कमंडलु, खडावा, माळा आदि
३९।— **धर्मदाय**
६३।।—। **भोजनखर्च** मुख्यतः दूध, मिठाई आणि शिधासामुग्री, (तूप, लाडू, सातू, तांदूळ, मसाला हें सामान बऱ्याच प्रमाणांत घरून बरोबर घेतलें होतें. )

२५०




खुलासा: स्केल: १ इंच = १६ मैल. गाडीचा रस्ता. यात्रेकरूंना पायवाट रस्ता.
---- सरहद्द. १ गढवाल संस्थान. २ ब्रिटिश गढवाल. ⊙ इस्पितळ. स्थानिक

REFBK-0007125